# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ४ - ५ |
| पृष्ठे | : | ८८ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**


**गणपत्रिका क्रमांक : ४०**


MAHMAR/19358/12/1/2000 TC

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पाचवे / अंक ४-५ / ऑक्टोबर-नोव्हेंबर २०००





व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पाचवे / अंक ४-५ / ऑक्टोबर-नोव्हेंबर २०००


संपादक

श्री. अचलकुमार टिल्लू

कार्यकारी संपादक

प्रा. मोहन पाठक

सहसंपादक

सौ. मंजिरी दांडेकर

सहाय्यक मंडळ

सौ. भारती जोशी

सौ. मनाली देवधर

सौ. विशाखा देशपांडे

कु. दिपाली भाटकर

कायदेविषयक सल्लागार

ॲड. सलिल बुटाला


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | ३ |
| २) | नामशेष झालेल्या नात्यांना संजीवनी देणारे 'प्रपंच' | श्री. संजीव ओक | ४ |
| ३) | काटेसावर (कविता) | कु. क्षमा वैद्य | ८ |
| ४) | हिंदुस्थानी अभिजात संगीत व आजचा तरुण वर्ग | श्री. चंद्रशेखर वझे | ९ |
| ५) | समर्थ रामदास (पूर्वार्ध) | सौ. मीरा लिमये | १५ |
| ६) | २०व्या शतकातील शैक्षणिक प्रगती | श्री. अचलकुमार टिल्लू | २१ |
| ७) | आणि टिन्नू मिळाला.... | सौ. मैत्रीयी शेवडे | २४ |
| ८) | चंद्र आणि रुपया (कविता) | श्री. विनोद कांबळी | २६ |
| ९) | डॉक्टर जेकिल ॲन्ड मिस्टर हाअिड | श्रीमती लीला जोशी | २७ |
| १०) | आठवण (कविता) | कु. क्षमा वैद्य | २९ |
| ११) | दिलवाडा मंदिरे व शिल्पकला | सौ. मंजिरी दांडेकर | ३० |
| १२) | श्रमसाफल्य (कविता) | श्री. अशोक करंदीकर | ३२ |


जीवन ही एक समरभूमी आहे. तेथे लहान मोठ्या जखमा होणारच.

| | | | |
|---|---|---|---|
| १३) | ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये चळवळी व विचारधारा | श्री. अनिल शाळीग्राम<br>श्री. प्रशांत देशपांडे | ३५ |
| १४) | मानसी तुझ्यासाठी ..... | श्री. संजय बोरकर | ४७ |
| १५) | मैत्री (कविता) | श्री. संजय बोरकर | ५७ |
| १६) | दिव्यत्वाची जेथ प्रचिती... | सौ. सुमेधा कुलकर्णी | ५९ |
| १७) | मुंबई हार्ट ब्रिगेड | श्री. संजय गुमास्ते | ६२ |
| १८) | .... आणि मी हास्यचित्रकार झालो | श्री. विवेक मेहेत्रे | ६३ |
| १९) | 'नात्यांचा गोफ' - ' प्रपंच' | सौ. विशाखा देशपांडे | ६९ |
| २०) | त्रिकोणमितीय गुणोत्तरांचे अध्ययन | सौ. विशाखा देशपांडे | ७५ |
| २१) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ८० |



**कार्यालय**

विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**

परफेक्ट प्रिण्टस्,
पुरीबाबा दर्गा रोड,
ठाणे ४०० ६०१.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्या प्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# सहस्त्रकातील शेवटचा सण

या सहस्त्रकातील मोठ्या प्रमाणावर साजरा होणारा हा अखेरचा सण. 'दीपोत्सव', 'दिवाळी', 'नेमेचि येतो......' या उक्तीप्रमाणे नेहीमप्रमाणेच साजरा होणारा. कविश्रेष्ठ केशवसुतानी 'दिवाळी' या आपल्या 'मनोरंजन' मासिकात नोव्हेंबर १९०० मध्ये म्हणजेच या आधीच्या सहस्त्रकाच्या अखेरीस प्रसिद्ध झालेल्या कवितेत आनंदात मग्न असणाऱ्या मानवाचे तपशीलवार केलेले वास्तव वर्णन वाचून त्याची प्रचिती यावी.

*घेऊनी घृत, दुग्ध ते विपुल ते गोदुमही साखर*
*प्रेमाने महिलाजनी बनविली खाद्ये किती सुंदर;*
*त्यांची सांप्रत रेलचेल अगदी पानात जी होतसे,*
*तुष्टी आणिक पुष्टी ती वितरनी प्रीती दुणावीतसे*

हे झाले वर्णन खाद्यपदार्थाविषयी. बाहेरच्या रांगोळ्या, रोषणाई बद्दल ते लिहितात

*रांगोळ्या दिसती प्रदोषसमयी दारापुढे काढिल्या,*
*दीपांच्या सदनापुढे उजळुनी पंक्ती तशा लाविल्या,*
*त्यांच्या ज्योति असंख्य त्या बघुनिया वाटे असे अंतरी*
*तारा या गगनातुनी उतरल्या की काय भूमीवरी !*

फटाक्यांविषयी त्यांनी सांगितले आहे

*बाळे सर्व फटाकड्या उडविती चित्तात आनंदुनी,*
*जाडे बारहि लाविती, धडाधडा त्यांचा उठे तो ध्वनी,*
*मोठे बाणही, चंद्रज्योति मधुनी, तया फूलबाजा, नळे*
*दारुकाम असे अनेकविध ते दृष्टी पडे, लाविले.*

पण त्याचबरोबर लक्ष्मीपूजना विषयी लिहिताना लोकांच्या भक्ती बद्दलचा गंभीर आशय ते ओझरता का होईना असा सांगून जातात.

*लक्ष्मीपूजन ते द्वितीय दिवशी रात्री गर्दी होतसे;*
*सोने आणि वह्या धनजिन तशी मांडून अर्चालिसे;*
*साह्याला विसरुन लोक धरिती भक्ती कसे साधनी*
*ये हा आशय अर्थहीन कविच्या चित्तात ते पाहुनी !*

दिवाळीच्या निमित्ताने होणारा कोट्यावधी रुपयांचा चुराडा, अन्न, वस्त्रांची लयलूट, फटाक्यांच्या आवाजामुळे व धुरामुळे होणारे ध्वनीचे व हवेचे प्रदूषण पाहिले की सर्वच अर्थहीन असल्याचे जाणवू लागते.

वरील सर्व गोष्टींप्रमाणेच वर्षानुवर्षे नियमित दिवाळीला प्रसिद्ध होणारी, मराठी मनाला हवीहवीशी वाटणारी व दिवळीतील फराळाबरोबरच चवीने वाचली जाणारी दिवाळी मासिके. 'दिशा' या विद्या प्रसारक मंडळाच्या नियतकालीकातही गेल्यावर्षीपासून या दिवाळी अंकाच्या निर्मितीत भाग घेतला.

गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही आम्ही या अंकात गोष्टी, कविता, प्रवासवर्णन, वैचारिक लेख, व्यंगचित्रे असे वाचकांच्या आवडीनुसार काही ना कांहीतरी साहित्य वा चित्रे देण्याचा प्रयत्न केला आहे.

यंदाच्या दिवाळी अंकाचे खास वैशिष्ट्य मानता येईल ते म्हणजे दूरदर्शनवरील प्रसिद्ध मराठी मालीकांपैकी 'प्रपंच' या मालीकेचा संपूर्ण परामर्श घेणारा 'तरुण भारत' या दैनिकाच्या रविवारच्या 'आसमंत' या साप्ताहिक पुरवणीचे संपादक श्री. संजीव ओक यांचा लेख व याच विषयावरील ठाण्यातील सरस्वती सेकंडरी शाळेच्या क्रीडा संकुलात ३० सप्टेंबरला या मालिकेची लेखिका व दिग्दर्शक प्रतिमा कुलकर्णी, इतर पात्रे यांच्याशी साधलेल्या सुखद संवादाचे वृत्तचित्र, या शिवाय अर्थव्यवस्थेवरील एक परखड विवेचन. हिंदुस्थानी अभिजात संगीताबद्दलची माहिती. 'दिलवाडा' मंदिराचे प्रवासवर्णनही यात आपल्याला आढळेल. प्रत्येक लेख आपल्याला खात्रीने नवीन कांहीतरी विचार देईल.

***दिशाच्या सर्व सभासदांना, जाहीरातदारांना,***
***हितचिंतकाना ही दिवाळी शांततेची,***
***सुख समृद्धीची व भरभराटीची जावो !***

'अज्ञानाच्या अंधारात ज्ञानाचे दीप उजळून

समृद्धीचा प्रकाश दाखविणाऱ्या दीपावलीचे स्वागत असो.

**अचलकुमात टिळू**
संपादक

जीवनाच्या अनुभवातूनच सुविचाराचा जन्म होतो.

# नामशेष झालेल्या नात्यांना संजीवनी देणारे 'प्रपंच'

श्री. संजीव ओक

*भव्य दिव्य सेट नाही, उंची श्रीमंतीचे अवाढव्य प्रदर्शन नाही, नाट्यपूर्ण प्रसंग नाहीत, तरीही अल्फा मराठीवरील 'प्रपंच' या मालिकेने स्वतःचा असा खास प्रेक्षकवर्ग निर्माण केला. समाजाची आजची मानसिकता, सद्यस्थिती व वास्तवाचा विचार करून या आदर्शवादी मालिकेचे केलेले हे विश्लेषण... संपादक*

*अण्णा या मुख्य आधारस्तंभाचे काम सुधीर जोशी यांनी समर्थपणे केले आहे. त्यांना सुहास जोशी, अमिता खोपकर, बाळ कर्वे, संजय मोने या प्रतिथयश कलावंतांबरोबरच शर्वरी पाटणकर, रसिका ओक, सोनाली पंडीत, भरत जाधव, सुनिल बर्वे या कलाकारांनीही तोलामोलाची साथ दिली आहे. अर्थात प्रतिमा कुलकर्णी यांच्या समर्थ लेखणीतून साकारलेले व काळजाला हात घालणारे संवाद यांचा ही मालिका मनाच्या गाभ्यापर्यंत पोहोचवायला मोलाचा वाटा आहे.*

दळणवळण क्षेत्रात झालेल्या क्रांतीने भारतातील 'दूरदर्शन'ची मक्तेदारी संपुष्टात आणली. 'झी', 'सोनी', 'स्टार' अशा विविध उपग्रह वाहिन्या दूरचित्रवाणी संचावरून केबल नेटवर्कच्या माध्यमातून घरोघरी शिरल्या. दूरदर्शनवरील रटाळ कार्यक्रमांना कंटाळलेल्या प्रेक्षकवर्गाला या वाहिन्या म्हणजे एक पर्वणीच होती. प्रेक्षकांची बदलती मानसिकता लक्षात घेऊन या उपग्रह वाहिन्यांवरील कार्यक्रमांचे आयोजन केले जात होते. तशातच या उपग्रह वाहिन्यांच्या प्रक्षेपणावर कसलेही निर्बंध नसल्यामुळे प्राथमिक अवस्थेत स्वैराचाराला प्रोत्साहन देणाऱ्या अनेक मालिका प्रक्षेपित केल्या गेल्या. 'स्टार' वाहिनीने 'देसी बोली' आत्मसात करण्यापूर्वी 'बोल्ड अँड ब्युटीफुल' प्रक्षेपित केली होती. 'बे वॉच' सारख्या ओंगळ देहाचं प्रदर्शन करणाऱ्या मालिकेचाही त्यात समावेश होता. 'स्टार' पहिल्यांदा 'स्टार इंग्रजी', 'स्टार स्पोर्ट्स', 'एम टी.व्ही.', 'सी टी.व्ही.', आणि 'स्टार चायनीज' अशा पाच वाहिन्यांचे प्रक्षेपण करीत असे. 'एम टी.व्ही.'बद्दल काहीही न बोललेलेच बरे. वादग्रस्त 'व्ही डेअर्स यू' सारखे कार्यक्रम दाखवणाऱ्या चॅनल व्ही चे मूळ त्या 'एम टी.व्ही.'तच होते. उपग्रह वाहिन्यांना मिळणारा वाढता प्रतिसाद लक्षात घेता त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत गेली. तसेच त्यांच्या प्रक्षेपणाच्या वेळेतही वाढ होत गेली. जवळजवळ सर्वच वाहिन्या २४ तास कार्यक्रम प्रक्षेपित करू लागल्या. याबाबतचे 'झी'चे उदाहरण पुरेसे आहे. 'झी'चे कार्यक्रम अगदी सुरुवातीला संध्याकाळी सात वाजता सुरू व्हायचे आणि रात्री एक वाजता संपायचे देखील. आज हे कोणाला सांगून खरे वाटणार नाही.

## आजचे वास्तव

इंटरनेटमुळे 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना आज प्रत्यक्षात येत असतांना युवावर्गावर मोहिनी आहे ती मात्र पाश्चिमात्य संस्कृतीची. त्यातच 'आम्ही दोन आमचा एक' चे युग आलेले आहे. भविष्यात सगळे नातेसंबंध बदलून जाणार आहेत. आज अस्तित्वात असलेली काका, मावशी, आत्या, मामा ही नाती अपरिहार्यपणे कालबाह्य होणार आहेत. समाजात चंगळवादी संस्कृती झपाट्याने फैलावत आहे. त्यामुळे आपल्याला सभोवताली दिसतो तो उघडपणे चाललेला स्वैराचार, उपभोगी वृत्ती, कोणाही सुजाण नागरिकाला अस्वस्थ करणारे हे चित्र.

प्रसारमाध्यमांचा उमलत्या वयांच्या मनांवर बरा-वाईट परिणाम हा होतच असतो, हे सत्य आहे. समाजात

आज ज्या वऱ्या वाईट प्रथा प्रचलित होऊ पहात आहेत त्या त्याचे द्योतक आहेत. एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्या, पैसा हेच आयुष्याचे एकमेव ध्येय आहे असे मानण्याची वृत्ती, ऐहिक सुखांना दिले जाणारे प्राधान्य, लहान वयात प्रेम म्हणजे काय याची व्याख्याही माहीत नसतांना त्याच्या नावावर चालणारे वासनांचे विकृत खेळ, वाढता हिंसाचार, झटपट श्रीमंत होण्यासाठी गुन्हेगारी मार्गांकडे वळणारी तरुण पिढी ही अशी अनेक उदाहरणे देता येतील.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे असताना व 'ग्लोबल व्हिलेज'ची संकल्पना साकार होण्याच्या अंतिम स्वरुपात असतांना मुलींचे लग्न हा विषय किती महत्वाचा ठरू शकतो?

## वाहिन्यांवरील मालिकांचे स्वरूप

आज विविध वाहिन्यांवरून ज्या मालिका प्रक्षेपित केल्या जात आहेत, त्यांचे वास्तववादी, कल्पनारम्य, रहस्यप्रधान, शोधमालिका, अवास्तववादी असे ढोबळमनाने वर्गीकरण करता येईल. अशा मालिकांचा प्रेक्षकवर्ग लक्षणीय आहे. अर्थात 'लोकप्रिय' मालिकांचे स्वरूप पाहिले तर 'विवाह' हा त्या प्रत्येक मालिकेचा केंद्रबिंदू असल्याचे लक्षात येईल. राजप्रासाद शोभेल असे भव्य घर, त्यातून झडणाऱ्या ओल्या पार्ट्या, श्रीमंतीचे अवाजवी प्रदर्शन आणि या पार्श्वभूमीवर घरातील मुलाचा किंवा मुलीचा विवाह असे थोडक्यात या मालिकांचे चित्रण करता येईल. बहुतांश मालिकांमध्ये पत्नीने पतीशिवाय राहणे म्हणजे काहीतरी धोक्याचे आहे, असा संदेश दिला जातो. त्यामुळेच विवाहाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त होते. परिणामी मग विवाहाचे महत्त्व प्रेक्षकांच्या मनावर ठसण्यासाठी पतीचे अन्य कोणाशी असणारे प्रेमप्रकरण, पत्नीच्या माहेरहून मिळणाऱ्या हुंड्यावर नजर ठेऊन केलेला विवाह, किंवा पती मनोरुग्ण असला तरी तिला पतीसोबत राहण्यासाठीची परिस्थिती निर्माण करणे असे काहीसे ढोबळ समीकरण झाले आहे.

काही मालिकांमधून विधवांच्या पुर्नविवाहाचा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला गेला. (थोडा है थोडे की जरुरत है), परंतु कदाचित समाजाला हे मान्य नसल्याने हा प्रश्न तितक्या ताकदीने आणि पुरेशा गांभियाने हाताळला गेलेला नाही. थोडक्यात सांगायचे झाले तर एकविसाव्या शतकात आपण प्रवेश करीत असलो तरी आपली मानसिकता एकोणिसाव्या शतकातीलच आहे. दुर्दैवाने प्रेक्षकांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न कोणीही करताना दिसत नाही. कथानक तेच राहते फक्त व्यक्तिरेखा बदलत जातात.

## जगावेगळा 'प्रपंच'

'प्रपंच' नावाची एक नितांत सुंदर मालिका 'अल्फा' या 'झी'च्या मराठी वाहिनीवरुन प्रक्षेपित केली जाते. साधेपणा हे या मालिकेचे वैशिष्ट्य म्हणता येईल. यात दिखाऊपणा नाही. उगाच भव्यदिव्य असे काही उभारण्याचा किंवा सांगायचा अट्टाहास नाही किंवा निरर्थक अशा तत्वांचा भडीमारही नाही. आपल्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना हा या मालिकेचा गाभा. 'प्रपंच' या मालिकेची कथा तशी अगदी साधी आणि सरळ. एक कुटुंबप्रमुख आणि त्याची दोन मुले व पाच नातवंडे यांची ही कहाणी. या कुटुंबप्रमुखाचा आणखी एक मुलगा आहे पण तो नोकरीसाठी परदेशी राहणारा. त्यामुळे 'आश्रय' या घराभोवती संपूर्ण कथानक फिरत राहते. या सर्वांच्या सोबत कुटुंबप्रमुखाची बहिणही आहे. सुना, नातवंडे सर्वजण कुटुंबप्रमुखाच्या शब्दाबाहेर नाहीत.

या दोन मुलांची असणारी एकूण पाच मुले व त्यांच्या समस्या यांचे चित्रण या मालिकेत आहे. अर्थात या समस्या म्हणजे अन्य मालिकांमध्ये दाखवतात तशी संकटांची मालिका नाही. ठरवून काहीतरी नाट्य घडवायचे आणि प्रेक्षकांना त्या नाट्याचीच मोहिनी घालायची असंही या मालिकेत घडत नाही.

**नातेसंबंधांचे अनन्यसाधारण महत्त्व**

'प्रपंच'चे यश त्यातील नातेसंबंधांच्या घट्ट विणीला आहे. आजचा विचार केला तर 'प्रपंच' या मालिकेतील एकत्र कुटुंब वास्तववादी वाटत नाही. परंतु काही काळापूर्वी आपल्याकडे हीच पद्धत रूढ होती. शहरीकरणाची अपरिहार्य गरज म्हणून 'ब्लॉक संस्कृती' उदयाला आली. आजच्या शहरीकरणाच्या युगात 'एकत्र संस्कृती' अस्तित्वात येणे शक्यच नाही. त्यातच बदलते नातेसंबंध, कुटुंबातील घटकात पडत जाणारा वाढता मानसिक दुरावा, यामुळे ही मालिका पाहतांना काळीज गलबलते आणि काहीतरी अमूल्य असे आपण गमावलेले आहे, याची क्षणोक्षणी मनाला बोच लागून राहते.

एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झालेला असल्यामुळे ही मालिका पाहतांना प्रत्येकाला त्यातील कोणत्या ना कोणत्या पात्रामध्ये स्वत:चे प्रतिबिंब दिसते. पालक व पाल्य यांच्यातील सुसंवादाचा जो अभाव आढळतो, तो किती महत्वाचा आहे, हे या मालिकेतून सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**मध्यमवर्गीयांची मानसिकता**

सर्वसाधारण मध्यमवर्गीयांची मानसिकता तपासून पाहिली असता असे लक्षात येते की, आपला मुलगा डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावा असेच प्रत्येकाला वाटत असते. तसेच आपल्या मुलीला चांगले स्थळ मिळावे ही मानसिकता समोर ठेवूनच या मालिकेचे लेखन करण्यात आले आहे. पाच नातवंडे ही पाच समस्यांचे प्रतीक आहेत. अधिकाधिक पैसे मिळवणे हे ध्येय असणारा प्रशांत, नंदूचे शिक्षण, लतिकाचे लग्न, अलकाचे नाट्यवेड आणि कलिकाचे मोठे होणे यातून या समस्या प्रभावीपणे मांडल्या गेल्या आहेत.

यातील नंदूचे शिक्षण कमी झालेले आहे, परंतु कोणतेही यंत्र त्याच्याशी बोलायला लागते. अलकाला नाट्यक्षेत्रात स्वत:चे करिअर घडवायचे आहे. अमेरीकेतील स्थळ सांगून आले म्हणून लतिकाचे घाईगर्दीत लग्न करून देण्यात येते. पण त्यातून समस्या निर्माण होतात. यातील कलिकाचा प्रश्न हा थोडा वेगळा परंतु अत्यंत महत्त्वाचा आहे. मुलाचे किंवा मुलीचे मोठे होणे हा सर्वात संवेदनाक्षम भाग असतो. घरातील व सभोवतालच्या वातावरणाचा या वाढीवर परिणाम होत असतो. कलिका मोठी होत असताना घरात ज्या काही घडामोडी घडत आहेत, त्यांचा तिच्यावर परिणाम हा निश्चित होत आहे.

**आदर्शवादाचे उत्तम उदाहरण**

आजच्या युगात मुलगा बापाला बाप म्हणेनासा झालेला आहे. हे आजचे विदारक सत्य आहे. आई वडिलांनी खस्ता खाऊन मुलाला मोठे करायचे आणि त्याच मुलाने मोठे झाल्यावर आईवडिलांना रस्त्यावर आणायचे असे प्रकार सर्रास घडत आहेत. यापेक्षा विदारक प्रकार वर्षामागे मुंबईत घडला होता. वडिलांच्या नावावर असलेला फ्लॅट त्यांनी आपल्या नावावर करावा याकरता मुलाने त्यांना अन्नपाणी न देता एका खोलीत डांबून ठेवले होते. विद्येच्या माहेरी पुण्यनगरीत काही वर्षांपूर्वी नातवाने काही 'शे' रूपयांसाठी आपल्या आजीचा गळा घोटला होता. ही सर्व उदाहरणे वानगीदाखल दिलेली आहेत.

आज आईवडिल दोघेही नोकरीनिमित्त घराबाहेर असतात. मुलांकडे पाहणारे, त्यांच्यावर लक्ष ठेवणारे असे कोणीही नसते. पहिल्यांदा आजी-आजोबा घरात असायचे. आताच्या पिढीला ते घरात नको असतात. आई वडिलांनी आपली सर्व कर्तव्ये पार पाडावीत, मुलांना चांगले शिक्षण द्यावे, त्यांची हौस मौज भागवावी, त्यांना चांगली नोकरी मिळेपर्यंत त्यांची जबाबदारी उचलावीआणि मुलाने मात्र स्वत:चा संसार थाटला की त्यांना खड्यासारखे बाजूला करावे असेच आज घडत आहे. त्यामुळे घरातील उमलत्या वयांच्या मुलांवर संस्कार करायला कोणीही नाही

ही परिस्थिती आहे. संस्काराची व्याख्या आजच्या पालकांना करता येणार नाही. कारण शहरीकरणाची अपरिहार्य बाब म्हणून दिनक्रमच बदलून गेलेला आहे. मुलांनी शाळेतून आल्यावर हातपाय धुवावेत, थोडावेळ बाहेर खेळून आल्यानंतर पुन्हा स्वच्छ हातपाय धुऊन देवासमोर बसावे, शुभंकरोती, रामरक्षा म्हणावी, घरातील सर्वांना वाकून नमस्कार करावा, त्यानंतर जेवावे आणि झोपावे. पहाटे लवकर उठून अभ्यास करावा असे चित्र किती घरातून पहावयास मिळते!

शुभंकरोती, रामरक्षा यांच्या नित्य स्मरणाने 'कर्ता करविता तो राम' हे मुलांच्या मनावर बिंबवले जाते. वास्तवाचा स्वीकार करण्यास भविष्यकाळात हे फार महत्वाचे ठरते. त्याशिवाय पाप-पुण्याच्या संकल्पना निश्चित होतात, हेही नाकारता येणार नाही. थोरांसमोर आपण नम्र व्हायचे असते हे घरातील सर्वांना वाकून नमस्कार करण्याने प्रत्येक दिवशी मनावर बिंबवले जाते.

पण प्रत्यक्षातील चित्र वेगळेच आहे. घरात काही तासांकरिता आलेला चौथा मनुष्य ज्या कुटुंबात रुचत नाही, त्यांची मानसिकता अशी पटकन बदलेल? कारण आज मुलांना घरात हवे असतात ते अत्याधुनिक व्हिडीओ गेम्स, नव-नव्या सीडीज्.

त्यामुळेच 'प्रपंच' ही आदर्शवादी मालिका ठरते. या मालिकेच्या लेखिका आणि दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी यांना समाजातील या विदारक परिस्थितीवरच भाष्य करावयाचे आहे. पालक आणि पाल्य यांच्यातील सुसंवादाला किती महत्व आहे, हे त्यांना ठसवायचे आहे. त्याशिवाय पैसा या संकलपनेला अवास्तव महत्त्व प्राप्त होत आहे, त्यावरही त्यांना टिप्पणी करावयाची आहे. सृष्टीचे काही निश्चित नियम आहेत, त्यांचे पालन केल्यास माणूस नक्कीच सुखी होईल, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे.

**करिअर कसे घडते**

यातील अलकाला नाट्यवेड आहे, ती त्यात काहीतरी करू इच्छिते, नंदूचे शिक्षण कमी असले तरी गॅरेजमध्ये काम करून त्यात तो समाधानी आहे. कलिकाने तर बारावीत नव्वद टक्के गुण (विज्ञान शाखेत) मिळवूनही कला शाखेत प्रवेश घेतला आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील दहावी आणि बारावी ही दोन वर्षे अत्यंत महत्वाची असतात. आठवीपासून त्यांच्या मनावर त्याप्रमाणे संस्कार घडवायला सुरुवात होते. या दोन परीक्षांकरता दरवर्षी लाखो परिक्षार्थी असतात. आणि यातील प्रत्येक जण स्वत:चे नाव गुणवत्ता यादीत झळकावे यासाठी प्राणांतिक प्रयत्नात असतात. त्यांच्यासाठी ही परिक्षा जीवन मरणाचा प्रश्न असते. अर्थात काही वेळा त्यांच्या इच्छेविरूद्ध पालक त्यांच्यावर आपली महत्वाकांक्षा लादतात हा भाग वेगळा. 'करिअर' घडवण्याची मध्यमवर्गीयांची जी एक निश्चित मानसिकता आहे, त्याचे हे दुर्दैवी फळ आहे.

अर्थात कलिका, नंदू, अलका यांनी चाकोरी सोडून घेतलेल्या निर्णयाने सर्वसामान्यांचे डोळे उघडतील ही अपेक्षा!

**मायबापा...**

माणसाला समाजात काय चालले आहे याची नेमकी जाण हवी. प्रत्येकाला ती असतेच असे नसते, तरी समाजात जे काही चालले आहे त्याकडे निदान डोळे उघडे ठेवून प्रत्येकाने पाहिले तरी त्याच्या विचार प्रणालीत बदल होऊ शकतो. आज प्रत्येकाची विचारांची बैठक पक्की नाही. जीवनाकडून आपल्याला नेमके काय हवे, हे प्रत्येकाला माहित नसल्यानेच सगळे प्रश्न निर्माण होतात. प्रत्येकाने 'स्व' ला ओळखून त्याप्रमाणे वागल्यास समस्या काही प्रमाणात नक्कीच सुटतील.

---

कुटुंबातील संस्कारांची वीण घट्ट हवी.

'प्रपंच' या मालिकेत आदर्श कुटुंब दाखवण्यात आले आहे. प्रत्यक्षात असे कुटुंब हे अशक्यप्रायच आहे. मुळात नातेसंबंध किंवा रक्ताच्या नात्यांची वीण ही दिवसेंदिवस अधिकाधिक पातळ होत चाललेली आहे. आजच्या एकुलत्या एक पिढीला फारसे नातेवाईकच माहीत नाहीत. त्यामुळेच कोणासाठी खस्ता खाणे हेही त्यांना माहीत नाही. स्वाभाविकपणे मागच्या पिढीला आपल्या नातेवाईकांकरिता जी एक प्रकारची आंतरिक ओढ असायची, ती या पिढीला नाही. कारण यांचे मनोविश्व पूर्णत: वेगळे आहे. भविष्यकाळात तर या नातेसंबंधांवर दूरगामी परिणाम झालेला आपल्याला दिसून येणार आहे. आज अस्तित्वात असलेली काही नाती भविष्यात नामशेष झालेली असणार आहेत आणि ही खरी शोकांतिका आहे. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करतांना भावभावनांना काहीच स्थान नसणार आहे.

त्यामुळे 'प्रपंच' पाहतांना प्रेक्षकाला 'आश्रय' या घरातले वातावरण पाहून आपण हे गमावले आहे, याची जाणीव व्हायला हवी हा प्रतिमा कुलकर्णी यांचा हेतू होता. काही अंशी तो सफलही झालेला आहे. कोणताही 'ड्रामा' नसतांना ही मालिका त्यामुळेच यशस्वी ठरली. त्यामुळेच 'मायबापा...' हे शिर्षकगीत सुरू झाले की, प्रेक्षक नकळत देशमुख कुटुंबात शिरतात आणि स्वत:ला त्यात शोधायला लागतात. या मालिकेचे हेच सर्वात मोठे यश आहे, असे त्यामुळेच म्हणता येते.

**श्री. संजीव ओक**

४०१, रामचंद्र सदन, राम मंदिरामागे, डोंगरपाडा,

विरार (प.), मुंबई ४०१३०३

## काटेसावर

चहुबाजूला धूळ होती
घाण होती
प्रदुषणाच्या ह्या जगात
त्याची कुणाला जाण होती.
पण तरीसुद्धा स्वत:ला सावरत
काल एक काटेसावरीचं
झाड लाल बुंद होत होतं.
निष्पर्ण असून सुद्धा
फुलून झालं होतं लाल
नी नुकतच एका चिमणीने
त्यावर घरटं बांधल काल
आजुबाजूच्या मेलेल्या जगात
जिवंतपणाची साक्ष देत
स्वत: फुलत दुसऱ्याला फुलवत
काल एक काटेसावरीचं
झाड लाल बुंद होत होतं
आपल्या अंगाखांद्यावर
पक्षांना झुलवत
एकाकी ह्या रूक्ष जगात
निसर्गाची साक्ष देत
आज एक काटेसावरीचं
झाड लाल लाल बुंद होतं
सिमेंटच्या ह्या जंगलात
आपल्याला सावरत धुंद होतं.

**क्षमा वैद्य**
तृतीय वर्ष (विज्ञान)
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
ठाणे

# हिंदुस्थानी अभिजात संगीत व आजचा तरुण वर्ग

श्री चंद्रशेखर रघुनाथ वझे

*आजच्या तरुणाला हिंदी चित्रपट संगीत आवडते. उडत्या चालीच्या गीतांचे आकर्षण असते असे आपण म्हणतो, परंतु संस्कार केला तर अभिजात संगीतही या तरुणांना आवडू शकते याबद्दल थोडेसे. -संपादक*

पौर्वात्य संगीत व पाश्चिमात्य संगीत अशी संगीताची दोन प्रकारात विभागणी संगीताच्या जागतिक क्षेत्रात केली जाते. भारतीय अभिजात संगीत हे पौर्वात्य संगीत म्हणून गणले जाते. केवळ पौर्वात्य संगीतातच नव्हे तर जागतिक पातळीवर भारतीय अभिजात संगीताची गणना उच्चस्तरीय अभिजात संगीत कला म्हणून केली जाते. एकाच देशात संगीताच्या दोन स्वतंत्र प्रणाली अस्तित्वात असलेला भारत हा जगाच्या पाठीवर एकमेव देश आहे. प्राचीन व अर्वाचीन संस्कृती भारतीय संगीताला लाभलेली आहे म्हणून त्याचा स्तर मोठा असे नाही. तर सांगितिक रसनिष्पत्ती व भावाविष्कार यासाठी भारतीय संगीतात रुजलेली व प्रगल्भ झालेली रागसंकल्पना ही सर्वांसाठीच एक आकर्षणाची व कुतुहलाची गोष्ट आहे. आज भारतीय कलाकारांचे देशाविदेशात कार्यक्रम होतात त्याला अभारतीय रसिकांची वाढती उपस्थिती तसेच अनेक विदेशी तरुण -तरूणी कलावंत मंडळी भारतीय संगीत शिकण्यासाठी भारतात येऊन राहतात, काहींनी तर स्वत:चे छोटे मोठे कार्यक्रम सादर करण्याइतकी तयारी केली आहे. या सर्वांतून एक निष्कर्ष नक्कीच निघतो की भारतीय संगीताला जागतिक पातळीवर लोकमान्यता मिळत आहे.

जगत्मान्यता मिळत असलेल्या या संगीताची प्रत्यक्ष भारतीय जनमानसातील प्रतिमा हा मात्र एक कोड्यात व पेचात टाकणारा प्रश्न आहे. कारण एकीकडे मोठ्या कलाकारांच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भारतात प्रतिसाद मिळत असताना तरुण व उदयोन्मुख कलावंतांच्या कार्यक्रमाला अतिशय थंड प्रतिसाद मिळताना दिसतो. किंवा मोठ्या संख्येने उपस्थिती लाभलेल्या एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित किमान साठ टक्के रसिकांना कार्यक्रमाविषयी वा संगीताविषयी प्रश्न विचारला असता त्यांना कलाकारांची नावे व त्यांनी सादर केलेल्या रागांच्या नावाव्यतिरीक्त (ती सुध्दा उद्घोषणेच्या वेळेस जागरूकतेने त्यांनी ऐकले असल्यास) इतर कोणतीही माहिती सांगता येत नाही. पण तरीसुद्धा त्यांनी आनंद लुटलेला असतो. हा आनंद त्याला नेमका कशातून मिळतो तर कलाकारांनी केलेल्या केवळ सांगितिक कसरती मधून. सांगितिक कसरत हा कोणत्याही संगीताचा पायाभूत घटक होऊ शकत नाही मग अशा स्थितीत जनमानसातली प्रतिमा फार तकलादू असल्याचे वाटायला लागते. ह्याला कारणे खरोखरच अनेक अणि गुंतागुंतीची असल्याने विषय वरवर जरी साधा वाटत असला तरी गंभीर आहे. त्यामुळे केवळ एका लेखामधून पूर्ण विषय समजून घेणे कठीण आहे. प्रस्तुत लेख भारतीय अभिजात संगीतातील हिंदुस्थानी अभिजात संगीत प्रणालीच्या अनुषंगाने लिहीला आहे. लेखामधून विषयाशी संबंधित आजची तरुण पिढी, अध्ययन करणारा व अध्यापन करणारा असे दोन्ही वर्ग व एकंदर संगीत प्रणाली ह्या काही महत्वाच्या घटकांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न आहे.

संगीत क्षेत्राकडे आकृष्ट होणाऱ्या तरुण वर्गाचे मुख्यत: दोन गट आढळतात. एक केवळ छंद म्हणून संगीत शिकणारा गट तर दुसरा चरितार्थ आणि करिअर म्हणून

---

शब्दांच्या मान्यापेक्षा प्रत्यक्ष कार्यातच जास्त सामर्थ्य असते.

संगीत शिकणारा गट. पहिल्या गटाची संख्या मुख्यत: दुसऱ्या गटापेक्षा अधिक आहे. दोन्ही गटांचे संगीत क्षेत्रात येण्याचे दृष्टिकोन हे भिन्न आहेत. त्या भिन्न दृष्टिकोनांसाठी भिन्न प्रकारचे अभ्यासक्रम वा शिक्षण प्रणाली भारतात दुर्दैवाने अस्तित्वात नाहीत. त्यामुळे 'सब घोडे बारा टक्के' ह्या उक्तीप्रमाणे दोन्ही गट एकाच साच्यातून भरडले जातात.

भारतीय संगीत कला ही प्रामुख्याने गुरुमुखी कला आहे. श्रुती, त्यांचे दर्जे, स्वर, स्वरस्थान, त्यांचे दर्जे यातून निर्माण झालेली रागसंकल्पना तसेच लय, लयीचे दर्जे, ताल संकल्पना, ह्या सर्वांचे सादरीकरण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आवाजाचा लगाव, आवाज साधना ह्या गुरूशिवाय अवगत होऊ शकत नाही. त्यामुळे गुरू संगीत शिक्षा प्रणालीतला सर्वांत महत्वाचा घटक आहे.

गुरूकुल परंपरा ही भारतीय संगीत शिक्षा पध्दतीची अत्यंत जुनी परंपरा. ज्ञानार्जन पूर्ण होईपर्यंत गुरूच्या सान्निध्यात राहायचं आणि ज्ञान संपादन करायचं. महत्त्वाचा फायदा म्हणजे गुरूचा सततचा सहवास लाभल्यामुळे गुरूचे संगीतातील आचार विचार, त्याचं सादरीकरण, सादरीकरणातले बारकावे इ. सर्व गोष्टी जवळून अनुभवण्यास व आत्मसात करण्यास मिळतात आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गुरू जवळच असल्याने काही चुका वा त्रुटी आढळल्या तर लगेच त्या दुरुस्त केल्या जातात.

परंतु आजच्या आर्थिक अस्थिरतेच्या परिस्थितीत कोणत्याच गुरूला अगदी नाणावलेल्या गुरूलाही चार दोन शिष्य (उत्तम भविष्य असलेले) आपल्या घरात ठेवून त्यांचे सर्वतोपरी संगोपन करणं केवळ अशक्य कोटीतले असल्याने गुरूकुल पद्धत ही जवळ जवळ अस्तित्वात नसल्यातच जमा आहे. प्रत्यक्ष गुरूकडे राहून शिकण्याची गुरूकुल पद्धत अस्तित्वात नसली तरी एकाच गुरूकडे सलग दहा/बारा वर्षे जाऊन संगीत शिक्षण घेताना आजचा तरूण वर्ग दिसतो ही सुद्धा एकप्रकारे गुरूकुल पद्धतच म्हटली पाहीजे. अशी गुरूकुल पध्दत आज ह्या घडीला सर्वत्र मोठ्या प्रमाणात आढळते.

गुरूकुल पद्धतीव्यतिरिक्त संगीत विद्यालये (शासकीय, बिनशासकीय), विद्यापीठ स्तरावर संगीत विभाग स्थापून परीक्षा पद्धतीवर आधारित डिप्लोमा, डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएशन वगैरे संगीत विषयक वर्ग शहरी भागात ठिकठिकाणी तसेच खेड्यातून सुद्धा आढळतात. ह्या व्यतिरिक्त आकाशवाणी, दूरदर्शन, कॅसेटस् ह्या निरनिराळ्या प्रसार माध्यमांद्वारे बऱ्याच सांगितिक गोष्टी, सांगितिक शैली ऐकायला मिळतात. एकंदर अशी प्राप्त परिस्थिती बघता कोणालाही वाटेल की सर्व काही अलबेल आहे परंतु प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वाटते तशी अलबेल नाही. अतिशय गंभीर, शोचनीय आहे. ह्याला संगीताकडे आकृष्ट होत असलेला तरूण वर्ग जबाबदार नाही तर संगीत क्षेत्रातले कलाकार व संगीत शिक्षण क्षेत्रातली धुरंधर मंडळी त्याला जबाबदार आहेत.

खाजगी संगीत शिक्षावर्ग चालविणारे शिक्षक / संचालक हे अधिकतर कोणत्या ना कोणत्या महाविद्यालयातून वा विद्यापीठातून परीक्षा देऊन प्रशस्तिपत्र प्राप्त केलेले विद्यार्थी असतात. ह्यांना स्वत:ला हार्मोनियमचा रेडीमेड आधार स्वर घेतल्याशिवाय 'सा' (षड्ज) लावता येत नाही ते विद्यार्थ्याला काय स्वरज्ञान देणार. तुम्ही म्हणाल की मग हे शिक्षक राग, बंदिशी वगैरे कसे शिकवतात. सोपे आहे हार्मोनियमचे आधारस्वर बरोबरीला वाजवून समोरच्या विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमातल्या रागांचे अलंकार, ताना/पलटे व बंदिशी रेटून घ्यायच्या. परीक्षेत तेवढेच गायले/वाजवले की विद्यार्थी उत्तीर्ण होतो. मग कॉलर ताठ करून संचालक/शिक्षक सांगतात आमच्या संगीत शिक्षा वर्गातले ऐंशी टक्के विद्यार्थी अमूक अमूक परीक्षा उत्तीर्ण झाले व विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या कौतुकाने सांगतात आमचा बाळ्या नं!

---

एखाद्याच्या पहिल्याच भेटीत प्रथमदर्शनी जे मत होते त्याला फार महत्त्व असते.

विशारद आहे.'' त्याच गायन/वादन म्हणजे आनंदी आनंदच असतो हे सांगायला नकोच. अर्थात ह्या सगळ्यात बिचाऱ्या बाळ्याचा दोष नसतो त्याला जसं शिकवलं जातं त्याप्रमाणे तो गातो किंवा वाजवतो.

'दगडापेक्षां वीट मऊ' या म्हणीप्रमाणे खाजगी संगीत वर्गापेक्षा महाविद्यालयीन वा विद्यापीठांच्या संगीत विभागाची स्थिती त्यामानाने बरी असली तरी अंतिमत: हातात येणारा निकाल वा संगीताच्या दृष्टीने होणारी प्राप्ती ही नगण्य स्वरुपाचीच आहे. विद्यालयीन वा विद्यापीठीय संगीत विभागात कार्यरत असलेला शिक्षक वर्ग स्वत: जरी चांगला गाणारा वा वाजविणारा असला तरी त्याला त्याच्याकडे शिकायला आलेल्या विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने गायन/वादन शिकवण्यापेक्षा वर्षभराचा कार्यक्रम पूर्ण करण्यावर भर द्यावा लागतो. कारण परीक्षा पद्धतीप्रमाणे अंतिम निकालात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जर कमी झालं तर विद्यार्थी संख्या रोडावण्याची आणि परिणामी संगीत विभागाचा कारभार सुरळीत चालवणे मुश्कील होऊन शिक्षकांच्या रोजगारावरती परिणाम होण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. तसेच तन मन वेचून काम करण्यापेक्षा काम उरकण्याची वृत्ती, व्यवस्थित आणि पद्धतशीरपणे मार्गदर्शन देण्यासंदर्भात आढळणारी अनास्था किंवा व्यवस्थित मार्गदर्शन देण्याच्या तंत्राचा अभाव या गोष्टीही अंतिमत: होणाऱ्या नगण्य प्राप्तीला जबाबदार आहेत.

महाविद्यालयीन किंवा विद्यापीठीय संगीत विभाग वा खाजगी संगीत शिक्षणवर्गांबरोबरच व्यावसायिक वा नामवंत गुरूकडे जाऊन संगीताची तालीम घेताना विद्यार्थी आढळतात. ह्या व्यावसायिक वा नामवंत गुरूंकडे अनेक प्रचलित, अप्रचलित, अनवट रागांच्या निरनिराळ्या बंदिशींचा भरणा, खजाना असतो, विद्यार्थ्याला त्यांच्याकडून हा खजाना नक्कीच मिळतो. निरनिराळ्या प्रचलित, अप्रचलित, अनवट रागांची माहिती विद्यार्थ्याला होते. त्या रागांच्या व्याकरणाची उकल विद्यार्थ्याला होते. विद्यार्थी ठाकठीक स्वरूपात गायन/वादनाची मांडणी करू शकतात. परंतु स्वत:ची छाप किंवा वैयक्तिक सादरीकरणाचा ठसा उमटवू शकत नाहीत असं बऱ्याच अंशी आढळत. ह्याला महत्त्वाच कारण म्हणजे संगीताचा मुलाधार, म्हणजे ध्वनी वा आवाज या मूळ तत्वाच्या सखोल अभ्यासाची वानवा. ज्या प्रमाणे एखादी मूर्ती घडवतांना मातीची व दगडाची वैशिष्ट्ये, गुणधर्म विचारात घेऊन मूर्ती घडवावी लागते, तसेच शिकायला आलेल्या विद्यार्थ्याच्या आवाजाचा गुणधर्म, पोत व वकुब ओळखून त्याप्रमाणे त्याचा आवाज घडविणं महत्वाचं ठरत. आवाज लगाव आणि संगीतातील घराणी यांचा एकमेकांशी अतिशय घनिष्ट संबंध आहे. आवाज लगावातील फरकामुळे घराणी अस्तित्वात आली असं म्हटलं तर जास्त संयुक्तिक ठरेल. त्यामुळे विद्यार्थ्याच्या आवाजाचा गुणधर्म ओळखण्याबरोबरच विद्यार्थ्याचा स्वत:चा आवाज त्याच्या स्वत:च्या कावूत आणण महत्वाचं ठरतं. तसं जर झालं तर विद्यार्थी कोणत्याही घराण्याची शैली आत्मसात करून स्वत:ची छाप उमटवू शकतो. पण तस घडताना फारच क्वचित दिसत. ह्याला कारण म्हणजे हे नामवंत गुरू स्वत: एका साच्यातून, चाकोरीतून, मुशीतून तयार झालेले असतात. त्यांची चाकोरी वा मूस समोरच्या विद्यार्थ्याला व्यवस्थित बसेल ह्याची शक्यता कमीच. पण नकळतपणे ह्या गुरूकडून विद्यार्थ्याचा आवाज गुणधर्म लक्षात न घेता चाकोरीचा अट्टाहास केलेला दिसून येतो. आजपर्यंतच्या इतिहासात (संगीताच्या) बालगंधर्व व मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर या दोन भिन्न शैलीच्या आवाज गुणधर्माच्या दिग्गज गायकांचे गुरू कै. प. भास्करबुवा बखले ह्या संगीततज्ञ व कलाकाराचा उल्लेख वरील विषयासंबंधात करण अत्यंत आवश्यक आहे. कारण या थोर गायकाने आग्रा, ग्वाल्हेर व जयपूर या तीन गानशैली आत्मसात केल्या होत्या व पूर्ण मैफल केवळ एकाच शैलीने, त्यात

---

दुसऱ्या शैलीची झलक सुद्धा त्यांच्या सादरीकरणात येत नसे असं अनेक पुस्तकात नमूद आहे. गायन शिक्षण देण्याच्या संदर्भात विचार करताना आवाज शास्त्राचा अभ्यास त्यांनी केला होता हे निश्चित आहे कारण बालगंधर्व व मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर दोघेही त्यांचेच शिष्य असून सुद्धा स्वत:च्या आवाज गुणधर्मांप्रमाणे स्वतंत्र शैलीने गात असत.

भारतीय संगीताच्या पूर्वसुरींनी (संगीत रत्नाकर वगैरे संगीत ग्रंथातून) आवाजशास्त्र व त्याच महत्व विदीत केल आहे परंतु पुढच्या काळात त्यावर विचार मंथन वा उहापोह म्हणावा त्या प्रमाणात झालेला दिसत नाही. दुर्दैवाने आजही या विषयाची विशेष दखल घेतली जात नाही ही अतिशय चिंतेची बाब आहे. आजचे प्रथितयश कलाकार यांच्याकडेही अनेक विद्यार्थी तालीम घेण्यासाठी जातात परंतु या मूळ विषयाला अनुसरून विचार करून अध्यापन करताना फारच कमी कलाकार दिसतात. त्यांच्या बाततीत या संदर्भात तीन कारणं प्रकर्षाने जाणवतात.

१) ही मंडळी त्यांच्या कार्यक्रमातच एवढी व्यस्त असतात की अध्यापन ह्या विषयासंदर्भात वेळ द्यावयास त्यांना फारच कमी फुरसत मिळते.

२) शिकवण्याची एक वृत्ती (Temperament) असावी लागते.

३) स्वत: अध्ययन करून एखादी गोष्ट आत्मसात करणं एकवेळ सोप आहे पण समोरच्या व्यक्तीला तीच गोष्ट समजावून सांगण म्हणजेच अध्यापन ही बाब जरा वेगळी आहे.

त्यामुळे ह्या दिग्गज कलाकारांचे विद्यार्थी आपल्या गुरूची नक्कल करतांना आढळतात. काही झालं तरी नक्कल ही नक्कलच राहते ती अस्सल होवूच शकत नाही. त्यासाठी ध्वनी/आवाज शास्त्राचा मुलभूत विचार विद्यार्थ्यांला शिकवणे किंवा त्यानुसार त्याला घडविणे महत्वाचे आहे.

कै. पं. वसंतराव देशपांडे ह्या थोर गायकाचे ह्या संदर्भातील बोल खूप काही सांगून जातात. ते म्हणतात ''सगळेच जण सांगतात की नवोदित कलाकारांनी जबरदस्त रियाज करायला हवा पण कसा करायचा हे कोणीच सांगत नाही. त्या कलाकाराला स्वत:ला जेव्हा उमगत तेव्हा त्याच्या उमेदीच वय सरलेल असत.''

तसेच डॉ. अशोक रानडे ह्या संगीत तज्ञानी एकदा एका व्याख्यानात म्हटलं होत की '' उस्ताद बडे गुलाम अली खान व पं. डी. व्ही. पलुस्कर या दोन कलाकारांना अपघाताने आकार मिळाला''. म्हणजे ह्या दोन कलाकारांना सुदैवाने त्यांच्या स्वत:च्या आवाज गुणधर्मांची ओळख झाली. त्यांनाही या विषयाचे कुणाकडून विशेष मार्गदर्शन मिळाले असे घडले नाही. परंतु असे सुदैव सगळ्यांच्याच वाट्याला येईल असे नाही.

एकंदरीत दिव्याखाली अंधार अशी आज तरी परिस्थिती आहे. ह्यावर उपाय योजना म्हणजे आज अस्तित्वात असलेल्या संगीत शिक्षा पद्धतीत, परीक्षा पद्धतीत व अभ्यासक्रमात फेरफार घडवून आणणे महत्वाचे आहे. आजचा अभ्यासक्रम हा केवळ छंद वा कानसेन घडवण्याच्या दृष्टीने ठीक आहे. परंतु ह्या क्षेत्रात चरितार्थ किंवा करिअर/प्रोफेशन करण्याच्या दृष्टीने येणाऱ्या विद्यार्थ्यांची सुप्त इच्छा, त्यांचा झुकाव किंवा त्यांचा ओढा नेमका कोणत्या गोष्टीकडे आहे (Orientation) याची व्यवस्थित चाचपणी करून त्याप्रमाणे त्याला अभ्यासक्रम उपलब्ध करून देण महत्वाचं आहे. ज्या विद्यार्थ्यांना रागनियम, संगीत शास्त्र, आवाज शास्त्र, श्रुती, लय-ताल विचार वगैरे चिंतनात्मक वा तात्विक बाबींमध्ये विशेष रस वा ओढा असेल अशा विद्यार्थ्यांना (Musicology-Theor y-Oriented) संगीत शास्त्र या संदर्भातला विशेष अभ्यासक्रम आखून मार्गदर्शन मिळावे ज्यामुळे भारतीय

ग्रंथ म्हणजे काळाच्या विशाल समुद्रातून माणसाला घेऊन जाणारी जहाजे आहेत.

संगीत व संगीत शास्त्र प्रगल्भ होण्यास, समृद्ध होण्यास मदत होईल. तर ज्या विद्यार्थ्यांचा कल संगीत सादरीकरणाकडे आहे, ज्यांना निसर्गदत्त कलात्मक गुणांची देणगी मिळालेली आहे व ज्यांची मेहेनत घेण्याची तयारी आहे अशा विद्यार्थ्यांसाठी संगीत शास्त्र व आवाज शास्त्राबरोबर मुख्यत्वे सादरीकरणात्मक अभ्यासक्रम आखून त्याप्रमाणे त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे. ज्यामुळे भविष्यात स्वतंत्र प्रतिभेचे कलाकार तयार होण्यास हातभार लागेल. ह्या सर्व गोष्टी झट मंगनी पट ब्याह इतक्या सोप्या नाहीत. त्यासाठी सर्व लहान मोठे कलाकार, आजची संगीत तज्ञ मंडळी, तरुण वर्ग ह्यांनी एकत्र येऊन सर्व सकारात्मक/नकारात्मक बाबींचा सखोल विचार करून त्याप्रमाणे पाऊल उचलणे अत्यंत आवश्यक आहे.

आज सर्व कला या लोकाश्रयावर अवलंबून आहेत तेव्हा लोकांमध्ये जागृती व जनमानस खऱ्या अर्थाने संगीत कला व शास्त्र या दृष्टीने जास्तीत जास्त प्रमाणात सज्ञान होणं आवश्यक आहे. अन्यथा या सर्व बिकट परिस्थितीतून वाट काढू पाहणारे तरुण कलाकार कलेद्वारा आपले योगदान पूर्णपणे देऊच शकणार नाही. आज या घडीला जे तरुण संपन्न कुटुंबातून आलेले आहेत किंवा ज्यांना शिष्य व पट्टशिष्य म्हणून बलयांकित गुरूच वलय लाभल आहे वा ज्यांच्या पाठीशी एखादी मोठी व्यक्ती वा संस्था खंबीरपणे उभी आहे अशा तरुण कलाकारालाच जास्तीत जास्त लोकांसमोर येण्याचा योग मिळतो ही वस्तुस्थिती आहे. उपरोल्लेखित तरुणांव्यतिरीक्त तरुण कलाकाराचा साधा कार्यक्रम आयोजन करण्यासाठीसुद्धा नामवंत वा बिगरनामवंत संस्था पुढे येऊ इच्छित नाहीत हा सर्वात मोठा दैवदुर्विलास आहे.

सरकारी व निमसरकारी काही संस्था तरुण कलाकारांना पुरस्कार, शिष्यवृत्त्या किंवा फेलोशिप द्वारे प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करत आहेत परंतु हे सर्व प्रयत्न भारतासारख्या खंडप्राय देशात तुटपुंजे आहेत.

या व अशा अनेक छोट्या मोठ्या अडचणींना तोंड देत आजच्या तरुण कलाकाराला मार्ग काढायचा आहे आणि मार्गक्रमण करायचं आहे. आजचा तरुण वर्ग बुद्धीमान व तेज आहे तेव्हा त्यानेच याबाबतीत पुढाकार घेऊन स्वतः जागरूक होऊन जनजागृती घडविणे आवश्यक आहे. अन्यथा संस्कृत भाषेप्रमाणे आमचीच कला आमच्या पुढच्या पिढीला शिकवण्यासाठी आम्हाला अमेरिका, जर्मनी वा ऑस्ट्रेलिया वगैरे देशात पाठवावे लागेल.

**श्री. चंद्रशेखर रघुनाथ वझे**
आंबेकर वाडा, गुरुद्वारा पाठीमागे,
रामबाग लेन नं. ४, कल्याण - ४२१३०४.
फोन नं. - (९११)३२५५२८

•••

With Best Compliments from

**NORMANS ROSS & CO.**
**INTERBANK FOREIGN EXCHANGE BROKERS**
**CALCUTTA - NEW DELHI - MUMBI**

**Head Office** : A-3/8, Gillander House,
8, Nataji Subhas Road, CALCUTTA 700 001.
Tel. Nos. 2201193 / 2201708 / 2204814
Tlx. Nos. 2446 / 7932 / 7136 NROS IN
Fax No. 2201707

1109, Indra Prakesh,
21, Barakhamba Road, New Delhi 110 001.
Tel. Nos. 3323797 / 8 /9
Tls. Nos. 63300 / 61976 NORM IN
Fax No. 3710088

94, Mittal Chambers,
Nariman Point, Mumbai 400 001.
Tel. Nos. 2029653 / 2837602
Tls. Nos. 81041 / 80143 NROS IN
Fax No. 2837337



राजेश : बाबा! तुम्ही मला इलेक्ट्रीशीयन का बनवतात ?
बाबा: तुझ्या शाळेच्या निकालातील मोठ मोठे दिवे बघून.




पोलीस : साहेब ! या दोघांना दधा पकडून आणलय. हे आपसात जोरात भांडत होते.
इस्पेक्टर : हे का भांडत होते. यांच आपसात काही वैर आहे का?
पोलीस : हो साहेब ! एक B.ed. आहे तर दुसरा त्याच शाळेत असून D.ed.आहे.

---

जितक्या अपेक्षा कमी, त्या प्रमाणात मनाला शांतता अधिक लाभते.

# समर्थ रामदास (पूर्वार्ध)

सौ. मीरा लिमये

*समर्थ रामदास स्वामींच्या जीवनाचा धावता परिचय आणि जडणघडणीचा वेध घेणारा हा लेख विचार प्रवृत्त करणारा असा आहे. - संपादक*

सन १६०८ चैत्र शु. नवमी, रामनवमी मराठवाड्यात औरंगाबाद जिल्ह्यातील जांब गावाच्या गावात राममूर्ती समोर सूर्याजीपंत कीर्तन करीत होते. रामजन्माचा क्षण जवळ आला. यावर्षी रामजन्माच्या कीर्तनाची सेवा आपल्या हातून घडते की नाही याची काळजी सूर्याजीपंतांना होती. कारण राणूबाईचे दिवस भरत आले होते. परंतु रामरायाने सेवा करवून घेतली आणि त्याच क्षणी रामराय स्वत: त्यांच्या घरात प्रकट झाले. गेली ३६ वर्षे दोघे पती-पत्नी सूर्यनारायणाची उपासना करत होते. ईश्वर उपासनेत लीन, विलीन, तल्लीन झाली होती. आणि या उपासनेला तपश्चर्येला पुत्ररत्नाचे फळही मिळाले. कृष्णजन्माच्या वेळी ज्ञानदेवांच्या रूपाने तर श्रीराम जन्माच्या वेळी समर्थांच्या रूपाने भगवंत पृथ्वीवर आला.

परित्राणाय साधूनाम विनाशाय च दुष्कृताम् ।

धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

सूर्यनारायणाचा प्रसाद म्हणून नाव नारायण ठेवले. साऱ्या जांब गावाला आनंद झाला. सूर्याजीपंतांचा जांबेमध्ये सर्वत्र सात्विक दरारा होता. विवाहानंतर २४ वर्षांनी त्यांना पहिले पुत्ररत्न प्राप्त झाले. तो गंगेचा प्रसाद म्हणून त्याचे नाव गंगाधर ठेवले होते.

ठोसरांची मुले ही साऱ्या जांबेची मुले. सतत या नारायणाला कोणी ना कोणी घेऊन जात असे. झोपेल तेवढीच त्याच्या पाठीला विश्रांती. नारायण रांगू लागला.नजर चुकवून केव्हाच तो अंगणात जाई व मातीचे तोबरे भरत असे.

मुलाचे मातीवरील प्रेम हे त्या मातेला कसे समजणार? बाल नारायणाच्या रूपाने जांबेला गोकुळाचे स्वरूप प्राप्त झाले. नारायण १० वर्षांचा झाला. ते वय खेळण्या बागडण्याचे, मारून मुटकून अभ्यासाला बसविण्याचे. नारायण अतिशय बुद्धीमान होता आणि अती बुद्धीमान मुले ही मातापित्यांना नेहमी समस्या असते. त्यांची बौद्धिक भूक पूर्ण करणे अवघड असते. नारायणाला शिकवण्यासाठी एका अध्यापकाची योजना केली होती . परंतु वर्षभरातच या अध्यापकाने सूर्याजीपंतांना सांगितले की, मला जे ज्ञान होते ते सारे मी त्याला शिकवले आहे. कोणा आचार्यांकडे याला पाठवा. सूर्याजीपंतांनी 'हं' म्हटले. पण त्यांच्यामते मुलांनी आपल्यासारखे कुळकर्णीपद सांभाळावे व गृहस्थाश्रम स्वीकारून परमार्थ साधावा. हिमालयासारखे उत्तुंग व्यक्तिमत्त्व ते छोट्याशा कुंचल्याने रंगवत होते. नारायणाच्या मनी काही वेगळेच होते. ते समजण्याचा समजुतदारपणा मातपित्यांजवळ होता परंतु तो स्वीकारण्यासाठी जे मनाधैर्य लागते ते मात्र वात्सल्यामुळे दडले होते. परिणामी नारायण अत्यंत हूड झाला. दिवसभर या झाडावरून त्या झाडावर, या घरावरून त्या घरावर उड्या माराव्या, डोहात डुंबावे, गावातील पोरे गोळा करून गावकऱ्यांना त्रास द्यावा. एकूण काय नारायण हे ठोसर कुटुंबाला पडलेले कोडे होते. तो जसा टोकाचा अल्लड होता तसा गंभीरही होता. त्याने घराभोवती बाग केली होती ती पाहून लोक स्तिमित होत असत. गंगाधर स्वामींसाठी अंबडचे देशमुख आपली मुलगी घेऊन येणार हे कळताच नारायणाने विटांची सुरेख बैठक केली होती. लग्नात पंक्तीत ताक लागेल अशी चर्चा नुसती त्याने ऐकली

तावडतोब शेजारी पाजारी ११ घरी रिकामी गाडगी नेऊन दिली आणि दुसऱ्या दिवशी सारे ताक घेऊन घरी आला. अशा या वागण्यामुळे त्याच्यावर रागावताही येत नसे.

एकदा राणूबाई (आई) त्याला रागावल्या. दिवसभर त्याने आईला तोंड दाखवले नाही. संध्याकाळ झाली राणूबाई काळजीत पडल्या. शोधाशोध सुरू झाली. नारायण सापडला तो अडगळीच्या खोलीत. येथे काय करतोस विचारल्यावर 'चिंता करतो विश्वाची' असे त्याने उत्तर दिले. आईने त्याला प्रपंचाची चिंता करण्यास सांगितले पण या पोराचा प्रपंच विश्वव्यापी आहे याची तिला काय कल्पना?

नारायण तसा स्वाभिमानी होता. एकदा सूर्याजीपंत पूजा करत असतांना मुसलमान अधिकाऱ्याने त्यांना तावडतोब बोलाविले, तेंव्हा मोठ्या स्वाभिमानाने त्यांनी नोकरी सोडली पण रामाची पूजा अर्धवट टाकली नाही. या घटनेचा ठसा नारायणाच्या मनावर होता. भोवताली जे काही घडत होते ते नारायणाच्या मनाला सलत होते. पण राणूबाईंना त्यातले काही कळत नव्हते.

नारायणाचे चित्त अधिक बंडखोर व्हावे, उदासीन व्हावे, अंतर्मुख व्हावे अशी एक घटना घडली. सूर्याजीपंतांचे निधन झाले. माणूस देवाघरी गेला तर त्यात एवढे आक्रोश करण्यासारखे काय आहे? देवाघरी जातो म्हणजे कोठे जातो? या प्रश्नांना कोणाजवळही उत्तर नव्हते. भगवान बुद्धांची धीरगंभीर वाणी मात्र त्याच्या कानात घुमत होती. 'जग हे दुःखमय आहे. आसक्ती हे दुःखाचे मूळ आहे. अनासक्त रहाणे हा मुक्तीचा मार्ग आहे.'

वडिलांच्या आकस्मित मृत्युमुळे नारायणाचा अल्लडपणा संपला. तो गंभीर झाला. आईला त्याची अधिक काळजी वाटू लागली. परंतु गंगाधर स्वामींनी मात्र त्याला ओळखले होते. हा मुलगा संसारात रमणार नाही हे ते जाणून होते. पण हे राणूबाईंना कसे समजावून सांगावे हे त्यांना कळत नव्हते.

सूर्याजीपंतांनंतर गंगाधरपंत कुळकर्णीपद सांभाळू लागले. वडिलांचा आध्यात्मिक वारसा देखील त्यांनी घेतला. लोक त्यांना श्रेष्ठी म्हणू लागले. अनेकांनी त्यांच्याकडून अनुग्रह घेतला. नारायणानेही भावाकडे अनुग्रह मागितला. परंतु श्रेष्ठी म्हणाले, तू अजून लहान आहेस आणि तुझा योग अन्यत्रच कोठे दिसतो. नारायण उदास झाला आणि त्याची ही अवस्था पाहून आईला काळजी वाटत असे. सामान्यांच्या मातांप्रमाणेच राणूबाईंनीही नारायणाकडे लग्नाचा लकडा लावला. लग्नाचा विषय काढताच नारायणाला राग येत असे. एकदा तर रागावून तो वडाच्या झाडावर जाऊन बसला. आईने हाक मारल्यावर त्याने झाडावरून खाली डोहात उडी मारली. डोहातील दगड लागून नारायणाच्या कपाळाला मार बसला होता. कपाळावरचे हे आघात सतत जणू काही राणूबाईंना सांगत होते, लग्नाचा विषय काढाल जर खबरदार!

श्रेष्ठी देखील राणूबाईंना सांगत असत की, पोर हेकट आहे. त्याच्या लग्नाच्या भानगडीत पडू नकोस. परंतु नारायणाबद्दलच्या प्रेमापोटीच एकदा नारायणाला जवळ घेऊन राणूबाई म्हणाल्या, 'नारोबा, तुझ्या वडिलांनी मला अंतर दिले पण तू आता माझ्या मनाला दुःख देऊ नकोस.' आईबद्दल नारायणाचे मनात अनुकंपा होती. तेव्हा नारायण आईला म्हणाला, 'तुझ्यासाठी मी प्राणसुद्धा देईन. तुझ्या मनाला दुःख होईल असे मी कधीही करणार नाही.'

कैकयीने जसे दशरथाकडून दोन वर मागून घेतले तसे राणूबाईंनी नारायणाकडून वचन घेतले आणि त्या वराप्रमाणे नारायण लग्न मंडपात बोहल्यावर चढण्यास तयार झाला. नारायण मुत्सद्दी होता. त्याच्या होकारात मिष्किलपणा होता. आई आनंदली. तिने नारायणाच्या विवाहाची तयारी सुरू केली. वधू होती सख्खी मामेबहीण.

नारायणाच्या मनात योजना तयारच होती. बिचाऱ्या आईला त्याची काय कल्पना? आपण योजलेल्या या योजनेत यश यावे यासाठी नारायणाने रामावर भार टाकला. अनेक स्त्रियांना सुखी करण्यासाठी त्याने आपल्या आईला कष्टी केले. यथावकाश मुहुर्ताचा क्षण जवळ आला. नारायण आणि गंगाधर यांची दृष्टीभेट झाली. त्या दोघांनी मांडलेला डाव फक्त नियतीलाच माहीत होता. 'सावधान' शब्द ऐकताच बोहल्यावरील नारायणाने 'साप-साप' असा ओरडा केला आणि झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन तो तिथून निसटला. गंगाधर स्वामींनी राणूबाईंची व इतरांची समजूत घातली. तेथेच त्या नववधूचा कुळकर्ण्यांच्या मुलाशी विवाह लावून दिला. त्याकाळी विवाह म्हणजे पालकांनी आपापसात केलेला करार होता.

इकडे राणूबाई नारायणासाठी झुरत होत्या, पण श्रेष्ठींनी त्यांचे सांत्वन केले. 'नारायणाला देवदर्शन झाले की तो नक्की परत येईल आणि तुला देखील रामदर्शन घडवेल' या आशेवर राणूबाई दिवस कंठत होत्या.

नारायण जांबला आला. हनुमंताचे दर्शन घेऊन, आशिर्वाद घेऊन त्याने गोदातीर गाठला. स्नान करून अंगाला लावलेली हळद धुतली. वस्त्रे टाकली आणि आता तो रामाचा दास झाला. परत एकदाच त्याने जांबेकडे पाहिले, आईची क्षमा मागितली आणि नाशिकची वाट चालू लागला. कुठ जायच? काय करायचं? सारा रामावर भार. त्याचे मन त्याला सांगत होते. 'जयास वाटे सुखचि असावे। तेणे रघुनाथ भजनी लागावे। स्वजन सकलही त्यागावे। दुःख मूळ जे। देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जिवलगांसी तुटी। सर्व अर्पावे शेवटी प्राण तोही वेचावा।

नारायण नाशिकजवळच टाकळीला राहू लागला. पहाटे तीन वाजता उठावे. स्नान संध्या सूर्यनमस्कार आटपून ६ ते दुपारी १२ या काळात गायत्री मंत्र व रामनामाचा जप करावा तोही गोदावरीच्या संगमस्थानी कमरेभर पाण्यात उभे राहून. पुढे ५ घरी भिक्षा मागावी. ती गोदावरीच्या पाण्यात बेचव करावी. रसनेलाही चांगल्या खाण्याची चटक लागू नये म्हणून हा प्रपंच. खाऊन झाल्यावर थोडी विश्रांती घेऊन मग काळ्यारामाच्या मंदिरात मान्यवरांची प्रवचने ऐकावी. काही ग्रंथांचे वाचन करावे, चिंतन करावे व सारी कर्मे श्रीरामाला अर्पण करावी.

अशी नारायणाची दिनचर्या. मन-मेंदू-मनगट यांचा समन्वय होता. ज्याला सामाजिक कार्य करायचे आहे त्याचे आरोग्य उत्तम असले पाहिजे. म्हणून रामदास रोज दोन तास सूर्यनमस्कार घालत. असे १२ वर्षे केले. 'अभ्यासे प्रकट व्हावे, नाहीतरी झाकोनी असावे, प्रकट होऊनी नासावे हे बरे नव्हे.' समर्थांना तेथेही त्रास देणारी माणसे होती. याच काळात रामदासांनी करुणाष्टके लिहिली. सर्व काही सहन करण्याची बुद्धी ते रामरायाजवळ मागत. 'दैन्य पुरविना कोणी। उगेचि जन हासति। लौकिक राखता येता। बुद्धि दे रघुनायका।

पुढे पुढे मात्र गावकऱ्यांचे रामदासांबद्दलचे मत बदलले. अर्थात त्यातही काही वात्रट मंडळी होतीच पण रामदास बधले नाहीत. त्यांनी एक अद्‌भूत नाट्य घडवले. तेथून जवळच असलेल्या गावातील एक गृहस्थ मरण पावले. खर तर ते जिवंत होते पण खेडेगावात वैद्य मिळाला नाही कोणा कुडमुडू वैद्यांनी त्यांचे निधन झाल्याचे निदान वर्तवले. घरात कोलाहल माजला. प्रेत दहनासाठी टाकळीला आणले. वात्रट मंडळींनी, 'आमच्या गावात एक बालयोगी आला आहे. तो तासन्‌तास ध्यान करतो. त्याची दृष्टी पडली तरी मेला माणूस उठून चालू लागेल' असे सांगितले. आधीच हळव्या झालेल्या मंडळींनी रामदासांना बोलावले. रामदासांचा योगसाधनेचा अभ्यास चांगला होता. नाडीपरीक्षा उत्तम होती. त्यांनी सांगितले की हे गृहस्थ जिवंत आहेत व ते दाखवण्यासाठी त्यांच्या नाकाशी सूत धरले. पुढे नाशकात चांगल्या वैद्याला दाखवून

---

लोकमत हे नित्य अस्थिर व दोलायमान असते.

ते गृहस्थ पूर्ववत झाले. हे गिरीधरपंत कुळकर्णी व त्यांची पत्नी अन्नपूर्णा यांनी आपला पुत्र समर्थचरणी वाहिला. समर्थांनी त्याचे नाव उद्धव ठेवले. टाकळी परिसरात लोक समर्थांना मानू लागले. तेथे समर्थांनी अनेक धर्मग्रंथांचा अभ्यास केला. संस्कृत भाषेचा अभ्यास केला.

१६२० ते ३२ या १२ वर्षांच्या काळात तपश्चर्येच्या काळात एक महत्त्वपूर्ण घटना घडली. शहाजीराजांच्या भावजयीला निजाम सरदाराने पळवले. ही बातमी समर्थांना कळली तेव्हा त्यांना वाटले शहाजीसारख्या शूर सरदाराच्या भावजयीची ही कथा तर सर्वसामान्य स्त्रियांची व्यथा काय असेल? पुढे शहाजी राजांची भेट झाल्यावर त्यांनी हा विषय काढला व त्यांना विचारले, 'निजामाची चाकरी करता, त्या निजामाच्या राज्यात तुमच्या स्त्रियांनाही संरक्षण नसावे?' शहाजींनी शरमेने मान खाली घातली.

पुढे शहाजी व समर्थांचे अनेक गोष्टींसंबंधी बोलणे झाले. त्यावेळेस शिवाजी महाराजांच्या हातून हिंदवी स्वराज्यांची स्थापना व्हावी व समर्थांनी त्यांस मार्गदर्शन करावे, अशी इच्छा शहाजींनी व्यक्त केली. रामदासांनी आपला देशभ्रमणाचा मानस त्यांना सांगितला व त्यानंतर शहाजीराजांच्या मुलुखात कामाला सुरुवात करण्याचे समर्थांनी मान्य केले व ते निघाले. निघण्यापूर्वी उद्धवास त्यांनी एक मारुतीचे मंदिर बनवून दिले व तेथे मठ स्थापन करून त्यास मठपती नेमले. रामरायाचरणी प्रार्थना केली, 'कोमल वाचा दे रे राम, विमल करणी दे रे राम, प्रसंग ओळखी दे रे राम, धूर्तकला मज दे रे राम, हितकारक ते दे रे राम, जनसुखकारक दे रे राम, अंतर पारखी दे रे राम, बहुजन मैत्री दे रे राम.'

प्रवासात हनुमंताची देवळे बांधणे, मठ स्थापणे, योग्य मठाधिपती नेमणे, असे करत समर्थांचे देशव्यापी संघटनेच्या दृष्टीने कार्य चालू झाले. मध्येच काही घटनांनी ते व्यथित होत तर हिमालयाची उत्तुंग शिखरे, निळ्या पाण्याची सरोवरे पाहून त्यांना असे वाटे की निसर्गापुढे आपला टिचभर देह तो काय, असा विचार करून या देहाची बेडी फेकून द्यावी या इच्छेने त्यांनी एकदा दरीत उडी घेतली. पण रामरायाने त्यांना देहभानावर आणले व कर्तव्यांची जाणीव करून दिली. 'तुम्हासि जगदोद्धार करणे आहे, तुमची तनू हे आमची तनू , दोन तपे रक्षिली काया हे जगदोद्धारा कारणे' प्रत्यक्ष रामरायाने समर्थांना आपल्या कार्याची आठवण करून दिली. पुढे शीख धर्मगुरूंच्या सहवासात त्यांच्याशी देश व धर्म यासंबंधी चर्चा केली. ग्रंथसाहेबाचे अध्ययन केले. त्यात भगवद्गीतेतील सारे सिद्धांत असल्याचे लक्षात आले. पुढे सूफी संतांची भेट घेतली. अशाप्रकारे अनेक प्रांत, भाषा, चालीरीती यांचा त्यांनी अभ्यास केला व परत महाराष्ट्रात आले.

येथे समर्थ संप्रदायाचा मूलभूत संदेश समजतो. केवळ स्वत:च्या मुक्तीनंतर आपले जीवन परब्रह्मात विलीन न करता लोकांच्या उद्धारासाठी व धर्मसंस्थापनेसाठी देह झिजवावा. समर्थ दासबोधात सांगतात, 'आपण यथेष्ट जेवणे, उरले अन्न वाटणे, परंतु वाया दवडणे, हा धर्म नव्हे। जितुके काही आपणासि ठावे ते हळू हळू शिकवावे, शहाणे करूनि सोडावे। सकळ जन।'

समर्थ महाराष्ट्रात आले. तुळजापुरास आले असता मोगलांच्या भीतीने देवीची मूर्ती लपवून ठेवल्याचे त्यांना समजले. समर्थांनी लोकांना धीर दिला. नरहरी रामदासी याला मठपती केले. तुळजाभवानी पुन्हा स्थापन झाली.

तीर्थक्षेत्रांना भेटी देत समर्थ पैठणला आले. तेथे त्यांचे कीर्तन झाले. गेली २४ वर्षे ते आपले नाव, गाव जणू विसरले होते. पण जांबेचे पाटील कीर्तनाला आले होते. त्यांनी या नारायणाला ओळखले आणि कीर्तन संपल्यावर, 'आपली आई आपली वाट पहात आहे, वाट पहाता पहाता तिची दृष्टी गेली आहे' असे समर्थांना त्यांनी


सांगितले. समर्थांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. दुसऱ्या दिवशीच समर्थ जांबेला आले. हनुमंताचे दर्शन घेतले आणि घराच्या अंगणात उभे राहून 'ॐ भवती भिक्षां देहि' अशी गर्जना केली. त्याबरोबर त्यांची वहिनी व तिची मुले भिक्षा घेऊन आली. 'एवढ्याशा भिक्षेने हा गोसावी संतुष्ट होणार नाही' असे समर्थांनी म्हणताच रामनामाचा जप करणारी आई भिंतीचा आधार घेत उभी राहिली आणि म्हणाली, 'कोण माझा नारोबा का?' हे ऐकताच समर्थ धावतच माजघरात गेले आणि मातापुत्रांची भेट झाली. राणूबाईंना दिसत नव्हते. हाताने चाचपून त्या समर्थांचे रूप डोळ्यात साठवू लागल्या. पण त्यांच्या भावनेच्या गणितात नारायण कोठेच बसेना. त्यांनी नारोबाच्या लग्नाच्या वेळी त्यास आंघोळ घातली होती त्यावेळचे चिमुकले तोंड, डोळे आता दाढी मिशांच्या जंगलात हरवले होते. कोवळ्या दंडांनी आता पोलादाचे रूप धारण केले होते. त्यामुळे नुसत्या स्पर्शाने राणूबाईंचे समाधान होत नव्हते. भारताच्या आध्यात्मिक इतिहासातला हा हृदयद्रावक प्रसंग. समर्थांनी रामरायाचे स्मरण करून मातेच्या डोळ्यांना स्पर्श केला आणि काय आश्चर्य राणूबाईंना दृष्टी आली.

समर्थ घरी राहिले. देशभराची सारी परिस्थिती मातेला व श्रेष्ठींना सांगितली. पुढे आईला म्हणाले, 'आई, तुझ्यापेक्षा एक मोठी आई आहे. ती मला हाक मारत आहे. अनेक बांधव माझी प्रतीक्षा करीत आहेत. राष्ट्राच्या उत्थानाचा मला आशिर्वाद दे.' राणूबाई उठून आत गेल्या. फुलपात्रात पाणी आणले व नारायणावर पाणी साडून म्हणाल्या, 'खुशाल राष्ट्रासाठी आपले जीवन अर्पण कर.' २४ वर्षांपूर्वी पुत्राला अडकवून ठेवण्यासाठी विवाहाची बेडी पायात घालणारी माता आता मात्र कोणताही विरोध न करता पुत्राला व त्याच्या कार्याला आशिर्वाद देत होती. सामान्य माणसाचे अश्रू पुसण्यासाठी मातेने राष्ट्राच्या झोळीत आपला एक पुत्र टाकला.

**सौ. मीरा लिमये**
विश्वगिरी, विष्णूनगर,
नौपाडा, ठाणे-४००६०२
फोन-५४०७६२५

***

With Best Compliments From



RUCHIRA

PURE VEG. RESTAURANT

92/102, Kavim Building, Khadilkar Road, Girgaon, Mumbai 400 004.

इतरांना आपले सुख वाटणे यातच खरे सुख असते.




जीवनातील सर्वोच्च आनंदापैकी संभाषण हे एक होय.

# २० व्या शतकातील शैक्षणिक प्रगती

श्री. अचलकुमार दिह्व

*२०व्या शतकात शिक्षणाच्या दिशा कोणत्या होत्या यासंबंधी विचार करताना जाणलेली काही निरिक्षणे या लेखात नोंदली आहेत. - कार्यकारी संपादक*

**माध्यमिक शिक्षण**

माध्यमिक शिक्षण म्हणजे कुमारावस्थेच्या (Adolescent) गरजा पुऱ्या करण्यासाठी दिले जाणारे सर्वसामान्य, तांत्रिक, व्यावसायिक अगर विशेष शिक्षण होय.

**माध्यमिक शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टये :-** स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजाच्या नव्या गरजा लक्षात घेऊन माध्यमिक शिक्षणाच्या ध्येयाची व उद्दिष्टांची पुर्नमांडणी करण्याचा पहिला प्रयत्न मुदलीयार आयोगाने केला. त्यात मांडलेल्या नव्या गरजा.

१) लोकशाही नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पेलण्यास सिद्ध करणे, एक विशाल, राष्ट्रीय व निधर्मी दृष्टिकोन तयार करून विघटनात्मक प्रवृत्तींशी सामना देण्यास सज्ज करणे.

२) उत्पादन क्षमतेचा विकास करून त्याद्वारे राष्ट्रीय संपत्ती वाढविणे व जीवनमान उंचावणे.

३) शिक्षण पद्धतीद्वारा सांस्कृतिक पुनरुज्जीवन होण्यासाठी तीमध्ये आवश्यक बदल करणे.

**मुदलीयार आयोगातील माध्यमिक शिक्षणाची ध्येये**

१) व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास

२) व्यावसायिक कार्यक्षमतेचा विकास

३) नेतृत्व क्षमतेचा विकास

२३-२-१९७० च्या महाराष्ट्राच्या पुर्नरचनेसंबंधी धोरणविषयक निवेदनातील शिक्षणाची तीन प्रधान उद्दिष्टये

१) शिक्षण ही विद्याविषयक उच्च साधना. साधनेमुळे मानवाला सत्याचा शोध व सर्वोच्च जीवनविकास यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची स्फूर्ती मिळते.

२) व्यक्तीमधील अंत:स्थ शक्तीचा अत्युत्तम आविष्कार करण्यास साहाय्य करते आणि त्यामुळे शरीर, बुद्धी, भावना, व्यावसायिक कौशल्य, कलात्मक संवेदना व जीवन मूल्यांसंबंधीची योग्य जाणीव या बाबींचा त्यांच्या कमाल मर्यादेपर्यंत विकास करणे.

३) लोकांचे जीवन, गरजा व आकांक्षा यांच्याशी शैक्षणिक कार्यक्रमांचा योग्य समन्वय घातला म्हणजे राष्ट्रीय आकांक्षांशी सुसंगत असा राष्ट्रीय विकास घडतो. प्रत्येक व्यक्ती जबाबदार व उपयुक्त नागरिक बनते. तिच्यात आवश्यक वृत्तींचा व मूल्यांचा विकास होतो. राष्ट्रीय गरजांच्या संदर्भात आवश्यक असणारे निपुण मनुष्यबळ निर्माण होऊन जीवनाची आव्हाने पेलण्यास व आकांक्षा साकार करण्यास राष्ट्र समर्थ बनते.

**अ) स्वातंत्र्यपूर्व काल :**

**माध्यमिक शिक्षणाची वाटचाल :-** आजच्या माध्यमिक शिक्षणाची सुरुवात एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस ब्रिटीश सरकारने केलेल्या सर्वेक्षणाशी निगडित

आहे. मॅकॉलेच्या सुप्रसिद्ध खलित्यानंतर बेंटिंग सरकारने एक जाहीरनामा काढून इंग्रजी शिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला. युरोपीय साहित्य आणि विज्ञान यांचा भारतीयांत प्रसार करणे हा मुख्य हेतू असावा आणि म्हणून शिक्षणासाठी ठेवलेला सर्व निधी इंग्रजी शिक्षणावर खर्च करणे इष्ट असा त्यांचा उद्देश असावा. याचा परिणाम म्हणून युरोपीय साहित्य आणि विज्ञान यांचे शिक्षण देणाऱ्या शाळांची स्थापना झाली.

१८४४ लॉर्ड हार्डिंजने असे जाहीर केले की, इंग्रजी शाळांत शिक्षण घेणाऱ्या लोकांना सरकारी नोकरी प्रवेशास प्राधान्य द्यावे. आजच्या माध्यमिक शिक्षणातील पुस्तकीपणा व शिक्षणाची नोकरीशी निरगाठ या दोषांचे उगमस्थान या जाहिरनाम्यात बीजरूपाने आढळते.

इ. स. १९३६-३७ साली नेमल्या गेलेल्या ॲबट-वुड समितीने सर्वसाधारण शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या बरोबरीने विविध स्तरावर व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करण्याची शिफारस केली. तंत्रनिकेतन ही पदविका पातळीवरील शिक्षण संस्था हा त्या शिफारसीचा परिणाम होय.

१९४४ मध्ये नेमलेल्या सार्जंट समितीनेही माध्यमिक स्तरावर तांत्रिक शाळांची शिफारस केली.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारला या देशातील व्यावसायिक शिक्षणाचा विकास होऊ द्यावयाचाच नव्हता. या देशातील शिक्षण प्रत्यक्ष जीवनापासून जितके दूर व पुस्तकी राहील तितके ब्रिटीशांचे अधिपत्य स्थिर राहणार होते. त्यामुळे सरकारने फक्त समित्या नेमून अहवाल प्रसिद्ध केले. अहवालातील शिफारशी अमलात आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला नाही.

**आ) स्वातंत्र्योत्तर काळ :-** स्वातंत्र्योत्तर काळात माध्यमिक शिक्षणाला जी दिशा प्राप्त झाली आहे त्याचे बरेचसे श्रेय मुदलीयार आयोगाला द्यावे लागेल. माध्यमिक शिक्षणाचा सर्वंकष विचार करण्यासाठी हा आयोग १९५२ साली नेमला गेला. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाच्या दृष्टीने हे साल अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टये, अभ्यासक्रम, आकृतिबंध विविध प्रकारचे माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांचा परस्पर संबंध व माध्यमिक शिक्षणाचा प्राथमिक व उच्च शिक्षणाशी असलेला संबंध यांचा अत्यंत सविस्तरपणे विचार प्रथमच झाला.

मुदलीयार आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे बहुउद्देशीय शाळांची स्थापना, शालांत परीक्षेच्या अभ्यासक्रमात अनेक वैयक्तिक विषयांची अंतर्गत गुणदानाची सुरुवात, अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांना महत्त्व, बाह्य परीक्षेचे दोष कमी करण्याचे प्रयत्न इत्यादी अनेक सुधारणा झाल्या.

भारतीय शिक्षणाचा एकत्रित रीतीने विचार करून त्यात जरूर त्या सुधारणा सुचविण्यासाठी इ. स. १९६४ मध्ये कोठारी आयोगाची नेमणूक झाली.

कोठारी आयोगाने चार वर्षांचे प्राथमिक शिक्षण, सहा वर्षांचे माध्यमिक शिक्षण, दोन वर्षांचे उच्च माध्यमिक शिक्षण व तीन वर्षांचे पदवी शिक्षण असा हा आकृतिबंध सुचविला. (४+६+२+३)

आपल्या विद्यार्थ्यांना भारतीय पातळीवर होणाऱ्या विविध स्पर्धात्मक परीक्षांना विशिष्ट वयोमर्यादेच्या अटींमुळे बसणे अशक्य होऊ नये म्हणून दिनांक २४ ऑगस्ट, १९७१ रोजी महाराष्ट्र शासनाने दहा वर्षांच्या माध्यमिक शिक्षणाचा आकृतिबंध मान्य केला. इ. स. १९७२ च्या शैक्षणिक वर्षांत इयत्ता आठवीपासून हा नवीन आकृतिबंध चालू केला गेला. १९७५ मध्ये या आकृतिबंधानुसार पहिली माध्यमिक शालांत परीक्षा घेतली गेली.

---

सबब ही स्वतः लंगडी असूनही या जगात तीच सर्वात अधिक चालते.

महाराष्ट्र शासनाने मान्य केलेला आकृतिबंध व मुदलीयार आयोगाने सुचविलेला आकृतिबंध यात खालील दोन महत्वाचे फरक आहेत.

१) मुदलीयार आयेगाने सुचविलेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा अभ्यासक्रम ११ वर्षाचा असून माध्यमिक शिक्षणाचा एकूण कालावधी ३ (निम्न माध्यमिक) + (४ उच्च माध्यमिक) असा ७ वर्षांचा अपेक्षित आहे. तर महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार माध्यमिक शालांत परीक्षेत इयत्ता दहावी अखेर होते व त्यानंतर एक वर्षाचा वेगळा टप्पा म्हणून एक वर्षाचा उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम रहातो.

२) दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे मुदलीयार आयोग पुरस्कृत आकृतिबंधानुसार विद्यार्थ्याला आपला भविष्यकालीन व्यवसाय ठरवून त्याप्रमाणे ८ वी अगर ९वी तच विषयांची निवड करावी लागे. नव्या आकृतीबंधानुसार विद्यार्थ्याला ऐच्छिक विचार घेण्याची मुभा असली तरी उच्च माध्यमिक शिक्षणाच्या १ वर्षापर्यंत त्याला आपला पुढील व्यवसाय लक्षात घेऊन विषयांची निवड करावी लागणार नाही. इ. १ली ते १०वी चे शिक्षण म्हणजे सामान्य नागरिकाला आवश्यक असणारे शिक्षण.

महाराष्ट्राचे भूतपूर्व शिक्षणमंत्री नामदार मधुकरराव चौधरी यांनी नव्या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये फार प्रभावी भाषेत मांडली आहेत. दिनांक २७ डिसेंबर, १९७१ रोजी महाराष्ट्रातील विभागीय शिक्षण उपसंचालक व जिल्हा शिक्षणाधिकारी यांची जी परिषद मुंबई येथे झाली ती मध्ये ते म्हणाले, 'सामाजिक अभिसरणासाठी व अधिक ज्ञानप्राप्तीसाठी अत्यावश्यक असलेल्या भाषा, नागरिक, त्यांची जाणीव आणि कौशल्ये ही दोन्ही आत्मसात करण्यासाठी आवश्यक असलेले सामाजिक शास्त्र, विज्ञानयुगाशी सामना करण्याकरिता आणि संशोधन प्रतिभेला प्रेरणा देण्यासाठी आवश्यक असलेले गणित आणि विज्ञान, श्रमनिष्ठा, उत्पादन क्षमता व सामाजिक क्षमता यांचा संयुक्त विकास करणारा कार्यानुभव, सहिष्णुता, श्रमभावना व समाजनिष्ठा यांना आकार देण्याकरिता अत्यावश्यक असलेल्या समाजसेवा आणि बालवीर प्रवृत्ती, सुसंस्कृत जीवनाचा विशुद्ध आनंद अनुभवण्यासाठी आवश्यक अभिरुची निर्माण करणारी कला, शरीरसौष्ठव व आरोग्याचे जडण घडण करणारे शारिरिक शिक्षण असा हा सर्वलक्षी, समतोल अभ्यासक्रम माध्यमिक पातळीवर योजिल्यामुळे आधुनिक जीवनाच्या विविधांगी क्षेत्रांमध्ये पदार्पण करण्यासाठी सुयोग्य व संतुलित व्यक्तिमत्त्वाच्या युवक-युवतींची घडण त्याद्वारे होईल.'

**श्री. अचलकुमार टिल्लु**
कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

***

With Best Compliments from



**VIJAYALAXMI CONSTRUCTION**
GOVERNMENT CONTRACTOR, CIVIL CONTRACTOR,
INTERIOR DECORATOR
SPEL. : BUILDING REPAIR REHABILITATION MAINTENANCE
AND RENOVATION TECHNIQUE

**Santosh S. Tatkare**
(B.E., CIVIL, A.M.I.E., A.C.I., I.C.I.)
TEL.: 530 5688
PAGER NO. 9628 225055 / 9627 225055

5/3, Saibaba Nagar,
Shri Saidhan Co-op. Hsg. Soc. Ltd.
Mumbai Pune Road, Kalwa (Thane) 5

लेखक हे जनतेच्या आत्म्याचे इंजिनिअर आहेत.

# आणि टिन्नू मिळाला....

सौ. मैत्रेयी सुधीर शेवडे

*लहान मुलगा हरवतो आणि...... एक चटका लावणारी कथा. - संपादक*

सकाळचे ११ वाजून गेले होते. माझा स्वयपाक तयार होता. पण अजून जेवणं बाकी होती आणि एकदम समोरच्या घरातून गडबड ऐकू आली. मी साहजिकच खिडकीतून डोकावलं. समोर रहाणाऱ्या काकींकडे बऱ्याच दिवसांनी त्यांची एकुलती एक लेक सुमनबेन पती आणि मुलासकट आली होती. तिची सासू तिला माहेरी पाठवत नसे. त्यामुळे काकींना ती फक्त पत्रातूनच भेटत असे.

पण आज सकाळीच त्यांची लेक आली होती. बऱ्याच दिवसांनी जावई आल्यामुळे काकी स्वयपाकघरात गढून गेल्या होत्या. जावयासाठी काय करू आणि काय नको असं त्यांना झालं होतं. काम करता करता मायलेकींच्या गप्पाही जोरात चालू होत्या. काकी लेकीला कामाला हात लावू देत नव्हत्या. 'अगं तुझ्या घरी तू राबतच असतेस. चार दिवस माहेरी आली आहेस तर आराम कर. नुसत्या बसून गप्पा मार माझ्याशी.' सुमनबेनचा छोटा टिन्नू बाहेर खेळत होता. शहराच्या गजबजाटातून ह्या शांत खेडेगावात त्याला खेळायला मोकळी जागा मिळाली होती. लगेच त्याने शेजारपाजारचे ३-४ सवंगडीही जमवले होते. नेहमी प्रमाणे सगळे समुद्रावर जायला निघाले. समुद्र म्हणजे आमचं मागचं अंगणच. एवढा जवळ समुद्र, अगदी लाटांचा आवाजही कानावर पडतो. त्यातून आमच्या गावचा समुद्र मुंबईच्या समुद्रासारखा प्रदूषित नाही. ना तिथे माणसांची गर्दी ना भेळपुरीवाल्यांचा आरडाओरडा. कोणीही केव्हाही समुद्रावर जावं. छोटा टिन्नूही त्यांच्याबरोबर निघाला. लहान मुलं किती पटकन् दुसऱ्यांशी ओळख करून घेतात. त्यांच्यातील परकेपणाच्या भिंती किती सहज कोसळतात!

९ वाजता शेजारच्या मुलांबरोबर खेळायला गेलेला टिन्नू ११ वाजून गेले तरी परतला नव्हता. १० मिनिटापूर्वी बाकीची मुलं आली. टिन्नू शंख शिंपले गोळा करता करता केव्हा मागे राहिला ते त्यांना कळलेच नाही. मुलच ती आपल्याच नादात परत आली. पण काकींच घर दिसल्यावर त्यांना टिन्नूची आठवण झाली. त्यांनी विचारलं, 'टिन्नू आला का?' टिन्नूचे बाबा घाबरले ते म्हणाले, 'नाही. तुमच्या बरोबरच गेला होता ना!' सुमनबेनला आणि काकींना मात्र अजून त्यात काही विशेष वाटलं नव्हतं. कारण गावात तशी काहीच भीती नव्हती. घड्याळाच्या काट्याप्रमाणे धावायला हे काही शहर थोडीच होतं! मोकळेपणा मिळालाय खेळत असेल पोर, म्हणून त्या निश्चिंत होत्या. पण टिन्नूच्या बाबांना मात्र चैन पडत नव्हतं. पायात चपला सरकवून ते समुद्रावर निघाले. दुपारची ११-११॥ ची वेळ समुद्रकिनाऱ्यावर चिटपाखरूही नव्हतं. एक दोन कोळी लोक त्यांची जाळी विणत होते इतकच. समुद्रावर टिन्नू नाही. आजूबाजूलाही नाही म्हटल्यावर मात्र सुमनबेन आणि काकींच धाबं दणाणलं. अनोळखी गावात पोर जाणार कोणाकडे! शेजारपाजारची माणसं गोळा झाली आणि तीच गडबड ऐकून मी खिडकीत उभी राहिले होते. स्वयपाक तयारच होता. घरातल्यांची जेवणं झाली पण मला मात्र जेवणात रस वाटेना. कसे तरी चार घास पोटात ढकलून मी पुन्हा पुढच्या ओट्यावर जाऊन उभी राहिले. आता

जिथे सर्वांना खात्रीने 'भूत' भेटते अशी एक जागा आहे आणि ती म्हणजे 'व्याकरण'.

काकींकडला गोंधळ वाढतच चालला होता. तेवढ्यात काकी रडत रडतच आमच्या ओट्यावर येऊन बसल्या. कारण आमच्या ओट्यावरून लांबपर्यंतचा रस्ता दिसत होता. मी काकींना धीर देत म्हटलं, 'अहो येईल इतक्यात परत. कुठे जायला आपलं गाव कितीसं मोठं आहे.' रस्ता चुकला असेल तर कोणीतरी आणून पोहोचवेलच. कारण एव्हाना सगळ्यांना ही बातमी कळलीच आहे. पण काकींच्या आणि सुमनबेनच्या डोळ्यातले पाणी खळत नव्हतं. खास जावयासाठी केलेला गोडाधोडाचा स्वयंपाक तसाच पडून होता. टिनू हरवल्याची काळजी तर होतीच पण त्याहीपेक्षा त्या माऊलीच्या डोळ्यासमोर मुलीची सासू उभी रहात होती. टिनू सापडेल, पण ही गोष्ट सुमनबेनच्या सासूला कळली तर आपल्या मुलीची खैर नाही. नवऱ्याचं तणतणणं सुरूच झालं होतं. 'एवढ्या कसल्या गप्पा चालल्या होत्या? साधं एका मुलाकडे लक्ष.ठेवता येत नाही ?' अर्थात त्यावेळी हे महाशय रिकामेच बाहेर वाचत बसले होते. पण त्यांना कोण बोलणार?

आमच्या घरातील इतरांना अशा घटनेची वाटावी तेवढीच काळजी वाटत होती. ते मधून मधून काय ग मिळाला का? एवढं विचारून आपापल्या उद्योगात मग्न होत होते. पण मी मात्र त्या प्रसंगात पुरती गुंतून गेले होते. मला दुसरं काही सुचतच नव्हतं. गल्लीतली तरुण मुलं टिनूला शोधायला बाहेर पडली होती. पण माझं मन मात्र पुढच्या एकेक घटनांची चित्र रंगवत होते. टिनूचं काय झालं असेल? गेरावत येणाऱ्या लाटांनी टिनूला आपल्या कवेत... छे छे तसं नको व्हायला. मग कुठे गेलं असेल ते एवढसं पोर! सकाळपासून काही खाल्लं प्यायलं तरी असेल का? त्याला भूक लागली असेल, वाट चुकली असेल, कुठे तरी आई आई म्हणून रडत असेल आणि तेवढ्यात मनातला फिरता रंगमंच सुमनबेनच्या सासरचं घर दाखवत होता. खाली मान घातलेली दीनवाणी सुमनबेन आणि डोळे वटारून तिच्यावर आग पाखडणारी तिची सासू. मनातले विचार थांबत नव्हते.

दुपारचे दोन वाजले. आता मात्र सगळ्यांचाच धीर सुटत चालला. पोलीस कंप्लेंट करून झाली. पोलीसांनी आधी समुद्रावर तपासणी केली. तिथे रहाणाऱ्या कोळ्यांकडे चौकशी केली. एस्. टी. स्टॅंडवरही चौकशी करून झाली. होता होता चार वाजले. सुमनबेन आणि काकी डोक्याला हात लावून बसल्या होत्या. आजूबाजूच्या गुर्जर भगिनी जमल्या होत्या. कोणी मुलाकडे लक्ष नाही म्हणून तिला दटावत होत्या तर कोणी तिची समजूत घालत होत्या. तेवढ्यात २-३ मुलं धावत धावत आली. 'काकी काकी टिनू मिळाला. सुमनबेन टिनूमळी गयो.' आमच्या मनावरची मरगळ तात्काळ उतरली. आणि माझ्या डोळ्यांचा कॅमेरा पुढचा क्षण टिपण्यासाठी उत्सुक झाला. मुलं हरवल्याच्या कितीतरी घटना आपण ऐकतो. पण हरवलेल्या मुलाची आणि त्याच्या आईची भेट झाल्याचा क्षण आपण पाहिलेला नसतो. त्या घटनेचं मला साक्षीदार व्हायचं होतं. टिनू सापडला म्हटल्यावर आमच्या घरातल्या मंडळींच्या डोक्यावर जे थोडसं काळजीचं ओझं होतं ते ही उतरलं आणि घरातून चहा करण्यासाठी पुकारा होऊ लागला. पण मला अजून तेथून हलायचं नव्हतं. गोष्टीत वाचलेले माता पुत्रांच्या भेटीचे प्रसंग डोळ्यां पुढून सरकत होते. पुढे धावत आलेली मुलं सांगत होती आमच्या गावापासून थोडं पुढे असलेल्या एका गावात एका म्हातारीच्या झोपडीत पोलिसांना टिनू सापडला. आता तो तिथे कसा पोहोचला कोणास ठाऊक? मागोमाग एका माणसाच्या सायकलीवरून टिनू आला. सुमनबेननी त्याला खाली उतरवून हृदयाशी धरलं. माझ्या डोळ्यात पाणी तरारलं. माझ्या मनात जे चित्र उभं होतं अगदी तसचं घडलं होतं. पण... पण अगदी क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी सुमनबेननी त्या एवढ्याश्या पोराच्या पाठीत धपाटे घालायला सुरुवात केले. छे हे काय झालं? माझ्या मनातल्या चित्रातला शेवट गोड होता. टिनू तर सापडला त्यामुळे ती काळजी मिटली होती. म्हणूनच तिच्या डोळ्यासमोर तिची

थोरांच्या पावलावर पाऊल ठेऊन चालतांना ते थोर असल्याची अगोदर पक्की खात्री करून घ्या.

सासू उभी राहिली होती. अनेक वर्षांनी माहेरी आलेल्या त्या माहेरवाशिणीला आता बहुतेक कायमचंच माहेर अंतरणार होतं. तिच्या प्रत्येक धपाट्यातून तो राग, ती भीती व्यक्त होत होती. माझे डोळे पुन्हा भरून आले. आधी डोळे भरले होते ते एका आई आणि मुलाची भेट झाली ह्या आनंदानं. आणि आता भरले होते ते एका माऊलीची आणि तिच्या लेकीची ताटातूट होणार ह्या विचारानं.

**सौ. मैत्रेयी सुधीर शेवडे**

आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

०००

With Best Compliment From

**Mr. Naik**

## चंद्र आणि रुपया!

विधात्यानं चंद्र बनविला...
मानवाचं हृदय हेलावलं गेलं
पण डोकं मात्र निर्विकार राहिलं,
हृदयाला प्रेम सुचलं, डोक्याला रुपया सुचला,
हृदयानं काव्याचा डोलारा रचला,
डोक्यानं नाण्यांची रास रचली!
विधात्याला गंमत वाटली
त्यानं चंद्राला डाग दिला...
मानवाचं हृदय हेलावलं गेलं
पण डोकं मात्र निर्विकार राहिलं,
हृदयाचा प्रेमभंग झाला,
डोक्याला रुपयाचा फक्त डाग कळला,
हृदयानं काव्य टरकावलं,
डोक्यानं नोटा छापल्या!
विधात्याला वाईट वाटलं,
अन् एका अमावस्येच्या रात्री त्यानं
डागाळलेला चंद्रच पुसून टाकला...
मानवाचं हृदय हेलावलं गेलं
पण डोकं मात्र निर्विकार राहिलं
त्या काळोख्या रात्री हृदयानं आत्महत्या केली
अन् डोक्यानं अत्याचार केला!
विधाता हतबुद्ध झाला
अन् शून्य मनानं पुन्हा चंद्र घडवू लागला...
मानवाचं धडयातलं हृदय हेलावलं गेलं,
पण जिवंत डोकं मात्र निर्विकार राहिलं,
डोक्याने शांतपणे विचार केला
"किती मूर्ख आहे हा देव!
काय करतो आहे हे त्याचं त्यालाच कळत नाही!"
अन् त्या चंद्राकडे दुर्लक्ष करून
डोकं पूर्ववत विचार करू लागलं -
रुपये, आणे, पै मध्ये !

**-विनोद कांबळी**

# डॉक्टर जेकिल ॲन्ड मिस्टर हाअिड

**श्रीमती लीला जोशी**

*'मुक्तीच्या कैफात' हे व्यसनमुक्ती वरील श्रीमती लीलाताई जोशींचे पुस्तक लौकरच येत आहे. त्यातील चटका लावणारे एक प्रकरण - संपादक*

रात्रीचे साडे अकरा वाजले होते. माझी मोटरसायकल घराच्या दिशेने निघालेली होती. एका मित्राकडची पार्टी आटोपून मी घरी निघालो होतो. 'सरळ घरीच जा रे. वाटेत क्लबकडे वळू नकोस', असा सल्ला देणाऱ्या मित्राला मी ठासून सांगीतले होते, 'हो, हो, आता सरळ घरी जाऊन ताणून देणार. काळजी करू नकोस.' आणि खरोखरच मी घरीच जायचं ठरवलं होतं.

वाटेत रेड सिग्नल मिळाला. मोटरसायकल थांबली. पुढच्या चौकात गेल्यावर मी उजवीकडे वळलो की घरच्या रस्त्याला लागणार होतो आणि डावीकडे वळलो तर क्लबकडे जाणार होतो.

माझ्या मनातील मिस्टर हाअिडने चुळबुळ करायला सुरवात केली. डॉक्टर जेकिलने त्याला दटावले, 'छे! छे! उद्या ऑफिस आहे. लवकर घरी जायला पाहिजे. आणखी ड्रिंक्स घेऊन चालणार नाही.'

मिस्टर हाअिड त्याची समजूत घालू लागला, 'चलो यार. फक्त एक सोडा घ्यायचा. जेवण जरा जास्त झालय.'

हिरवा दिवा लागला आणि डॉ. जेकिलने गाडी उजवीकडे वळवण्याचा आदेश दिला. पण अचानक मिस्टर हाअिडने हाताचा ताबा घेतला. मोटरसायकल झटकन डावीकडे वळली!

कुठेतरी शरीरात एक कळ उठली. ती कळ उठण्याचे कारण एकच - डॉ. जेकिल ओरडण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्याचा आवाज बाहेर फुटत नव्हता. मिस्टर हाअिडने त्याचा गळा दाबण्यात यश मिळवलं होतं.

एक महिन्यानंतरची गोष्ट. शनिवारची रात्र म्हणजे कत्तलची रात्र! रमी, सिगरेटस्, बीअर - मस्त बैठक जमली होती. माझं नशिब जोरदार होतं. नोटांनी खिसा गरम झाला होता. मध्येच डॉ. जेकिलनं तोंड खुपसलं. -'बस्स् करा आता. फार झालं.' मिस्टर हाअिडने त्याची मानगूट पकडली. डॉ. जेकिलचा आवाज बंद झाला. मिस्टर हाअिडने मग खूप मजा केली.

असेच मग आणखी काही आठवडे गेले. महिने गेले. मिस्टर हाअिडला नवा मित्र मिळाला होता. त्याचं नाव 'ब्राऊन शुगर'. दोघांची छान मैत्री जमली होती. डॉ. जेकिल हतबल झाला. मिस्टर हाअिडने सारी सूत्रं आपल्या हातात घेतली.

आता जीवनाचं वळणच बदलून गेलं. मिस्टर हाअिडच्या हुकुमशाहीमुळे सर्वस्व गमावण्याची पाळी आली. माझी प्रिय पत्नी वैतागून, कंटाळून माहेरी निघून गेली. जातांना आमच्या तीन वर्षाच्या मुलालाही घेऊन गेली. माझ्यातल्या डॉ. जेकिलच्या खांद्यावर मान टाकून तिने आतापर्यंतचा संसार केला होता. मिस्टर हाअिडबरोबर राहण्याची तिला मुळीच इच्छा नव्हती. तिचे सारे प्रयत्न त्याने धुडकावून लावले होते. त्याच्या करामतींमुळे तिला जगणे देखील असह्य झाले होते. पत्नी निघून गेल्यामुळे मी अगदी एकाकी पडलो. पार खचून गेलो. निराश झालो.

माझ्या बेताल, बेपर्वाईच्या वागण्यामुळे माझी

नोकरी गेली. मी कर्जबाजारी झालो. मला पाहून मित्र तोंड फिरवून निघून जाऊ लागले. नातेवाईक मला पाहून दार बंद करू लागले. मिस्टर हाञिडच्या पंजातून सुटण्यासाठी मी अनेक प्रयत्न केले. डॉक्टरी उपचार केले, मानसोपचारही करवून घेतले. देवधर्म, अंगारे-धुपारे, गंडेदोरे, कुणी कुणी जे जे सांगीतलं ते ते सारं केलं. थोडासा गुण आला असं वाटायचं, पण पुन्हा पहिले पाढे पंचावन्न!

मधून मधून डॉ. जेकिल थोडी थोडी हालचाल करायचा. पण मिस्टर हाञिड महा वस्ताद. तो सारं काही स्वतःच्या मनासारखं करवून घ्यायचा. डॉ. जेकिलने रंगवलेलं सुखी संसाराचं स्वप्न केंव्हाच धुळीला मिळालं होतं. नजरेसमोरचं इंद्रधनुष्य पार विरून गेलं होतं आणि काळाकुट्ट अंधार समोर पसरला होता.

मग एक दिवस अचानक एक आशेचा किरण दिसला. बुडत्याला काडीचा आधार सापडला. एन्.ए. चे (Narcotic Anonymous) कार्यकर्ते माझ्या घरी आले. खूप गप्पा मारल्या संध्याकाळी नाखुषीनेच मी त्यांच्याबरोबर एन्. ए च्या मिटींगला गेलो.

एका प्रशस्त खोलीत माझ्यासारखी अनेक मंडळी जमलेली होती. मिटींग सुरू झाली आणि मी आश्चर्यचकित झालो. माझ्यासारखे व्यसनाधीन लोक आपापले अनुभव सांगत होते. त्यांचा मोकळेपणा, प्रामाणिकपणा पाहून मी चक्रावून गेलो. माझे अनुभव अशा रीतीने मी कुणाला सांगितले नव्हते.

त्या दिवशी रात्री घरी आल्यावर मी डायरीत लिहिलं, 'आज मला एक आशेचा किरण दिसला आहे.' मला जाणवलं की आत कोठेतरी खोलवर निपचित पडून राहिलेल्या डॉ. जेकिलने हालचाल करायला सुरूवात केली आहे. त्याच्या निस्तेज डोळ्यात एक चमक दिसायला लागली आहे.

त्या गोष्टीला आता दहा वर्षे होऊन गेली आहेत. एन्. ए. च्या कार्यक्रमातून मला जे मिळालं ते इतरांना देण्याचा मी प्रयत्न करतोय - ऋणमुक्त होण्यासाठी.

गेल्याच आठवड्यात एन्. ए. च्या मिटींगला येऊ लागलेल्या एका नवशिक्याने निराशेने उद्‌गार काढले, 'माझ्यात काही बदल होईल असं मला वाटत नाही. माझी गॉन केस आहे. होपलेस केस आहे.'

मी हलकेच त्याच्या खांद्यावर थोपटलं आणि म्हटलं, "अरे, पंधरा दिवस ओळीने तू 'डोस' न घेता स्वच्छ (Clean) राहिला आहेस. 'फक्त आजचा दिवस' म्हणता म्हणता काळ कसा भराभर निघून जाईल ते तुला कळणार सुद्धा नाही."

त्याच्याशी बोलतांना माझ्या सुधार कार्यक्रमाच्या वेळी ज्या डॉक्टरांनी मला मदत केली होती, त्यांचे शब्द माझ्या कानात घुमायला लागले. "फक्त आजच्या दिवस तू तुझ्या डोसापासून दूर राहिला आहेस हे काही कमी नाही. हा बदल महत्त्वाचा आहे. तुझ्या आयुष्याची दिशा बदलते आहे. हा बदल अगदी हळूहळू होईल पण तो निश्चितपणे नव्या दिशेने, नव्या मार्गाने होत आहे. नव्या क्षितिजाकडे जाणारी ती वाट आहे हे विसरू नकोस."

मित्रहो, हेच खरे महत्त्वाचे आहे, नाही का? एन्. ए. च्या कार्यक्रमातच अशी शक्ती आहे की तुमच्या आयुष्याला नवी दिशा मिळते. भरकटलेलं तारू योग्य दिशेने जायला लागते. फक्त आजच्याच दिवसाचा विचार करायचा. पण असे केल्यानंतर दिसून येणारा बदल मात्र आश्चर्यकारक असतो.

माझेच पहा ना. पूर्वीइतकी चांगली नाही पण बऱ्यापैकी नोकरी मला मिळाली आहे. माझी पत्नी मुलाला घेऊन घरी आलेली आहे. माझा संसार सुरळित चालला आहे. डॉ. जेकिलच्या हातात मी सारी सूत्रं दिलेली आहेत.

एक मात्र खरे की मिस्टर हाअिड ठार मेलेला नाही! तो माझ्या मनात कायमचा ठाण मांडून बसणार आहे हे मला चांगलं ठाऊक आहे.

पण आता मिस्टर हाअिडला काबूत ठेवण्यात मला यश आलेलं आहे, कारण मी अजूनही एन्. ए. च्या मिटींगला नियमितपणे जातो. त्या कार्यक्रमाचे काटेकोरपणे पालन करतो. माझ्या मनातला डॉक्टर जेकिल आणि मिस्टर हाअिड यांच्या मधील झगडा आता संपलेला आहे.

कालच रात्री मी १२ च्या सुमारास सेकंड शिफ्ट करून मोटरसायकलवरून घरी परत येत होतो. वाटेत रेड सिग्नल दिसला. मोटरसायकल थबकली. उजवीकडचा रस्ता घरी जाणारा होता. डावीकडचा रस्ता क्लबकडे जाणारा होता. हिरवा दिवा लागला. माझी मोटरसायकल क्षणार्धात आपोआपच उजवीकडे वळली. डॉक्टर जेकिलने हलकेच एक शीळ घातली.

('मुक्तीच्या कैफात' या आगामी पुस्तकातले एक प्रकरण)

**श्रीमती लीला जोशी**
मनसुवा, राम गणेश गडकरी मार्ग,
ठाणे (प)-४००६०२
दूरध्वनी: ५३३६६५४

***

'' आपण आमच्या अनाथलयाची काय सेवा करू शकता ?

''सेवा, ठीक आहे उद्यां माझ्या चार मुलांना आपल्याकडे पाठवून देतो.''

## आठवण

थंडगार पहाटेच्या वेळी
पाकळीवरचा दवबिंदू
अनंत आकाशाला
आपल्यामध्ये सामावत असतो
तेव्हा,
तेव्हा मला तुझी आठवण येते.
धडपडणारे हात जेव्हा
कुणाच्या हातांची वाट पहातात
किर्रकिर्र शांततेमध्ये
आपल्या माणसाचा आवाज
शोधतात, तेव्हा
तेव्हा मला तुझी आठवण येते.
माणसाच्या गराड्यातसुद्धा
मी स्वत:ला एकटी पहाते
निराशावादी चेहऱ्यामध्ये
जेंव्हा हसरा चेहरा पहाते
तेव्हा,
तेव्हा मला तुझी आठवण येते.
शांत शांत रात्री जेव्हा
कावऱ्याभोर आकाशातल्या
ताऱ्यांशी मी गप्पा मारते
तेव्हा,
तेव्हा मला तुझी खूप आठवण येते.

**क्षमा वैद्य**
तृतीय वर्ष विज्ञान,
बांदेडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे ४०० ६०१

# दिलवाडा मंदिरे व शिल्पकला

सौ. मंजिरी दांडेकर

*दिलवाडा येथील मंदिरामधील शिल्पकला हा शिल्पकलेचा एक उत्तम नमुना आहे. कला शिक्षकाच्या दृष्टीने घेतलेला शिल्पकलेचा हा रसास्वाद! -संपादक*

महाराष्ट्राच्या उत्तरेस गुजरातची सरहद्द संपून राजस्थानच्या प्रदेशात प्रवेश केला की दिसतात मोर, गाड्या ओढणारे उंट आणि माऊंट अबूच्या दिशेने आपली वाटचाल सुरू होते. पवित्र अरवली पर्वतांनी वेढलेले निसर्ग रमणीय माऊंट अबू हे राजस्थानचे प्रमुख आकर्षण आहे. माऊंट अबू या नावाची उत्पत्ती 'अर्बुदा' या नावावरून झाली. 'अर्बुदा' नावाच्या बलवान सर्पाने वसिष्ठ ऋषींच्या नंदिनी गाईची असुरापासून मुक्तता केली. हिमवानाचा पुत्र नंदिवर्धन याचे अर्बुदा साप हे वाहन होते. या अर्बुदा सापाच्या पराक्रमामुळे या स्थानाला माऊंट अर्बुदा हे नाव पडले.

प्राचीन काळी माऊंट अबू हे पुष्कळशा ऋषी मुनींचे आश्रयस्थान होते. या स्थानाबद्दल एक प्रमुख आख्यायिका सांगितली जाते ती म्हणजे वसिष्ठ ऋषींनी मानव जातीच्या पुनरुज्जीवनासाठी येथे यज्ञ केला होता. या यज्ञामुळे चौहान, सोलंकी, परमार, प्रथिहार या चार राजपूत अग्निकुल घराण्यांची निर्मिती झाली. अशा माऊंट अबूची भारतीय कलेला महान देणगी म्हणजे दिलवाडा येथील जैन मंदिरे.

ब्रिटीश कला अभ्यासक जेम्स टोड यांनी इ. स. १८८२ मध्ये माऊंट अबूच्या दिलवाडा मंदिरास भेट दिली. जेम्स टोड हे संगमरवरातील कोरीव काम पाहून थक्क झाले. ' दिलवाडा मंदिरे ही ताजमहालाहूनही सरस आहेत. भारतीय कलेतील तेजस्वी रत्ने आहेत. ताजमहालाची स्थापत्यकला उत्कृष्ट आहे तर दिलवाडा मंदिरातील संगमरवरावर बारकाव्यासह केलेले अलंकारिक कोरीव काम अतुलनीय आहे' - जेम्स टोड.

एक हजार वर्षे पुरातन जैन दिलवाडा मंदिरे संपूर्ण एकसंध संगमरवरातून खोदून कोरीव कामाने सजविली आहेत. या दिलवाडा मंदिरांमध्ये पाच मंदिरे अंतर्भूत आहेत. ही मंदिरे ११ व्या व १३ व्या शतकात बांधलेली असून मंदिराच्या निर्मितीत २०० वर्षांचा फरक आहे. ताजमहालासाठी वापरण्यात आलेले मकराना संगमरवर या मंदिरासाठी वापरण्यात आला आहे.

ही मंदिरे बाहेरून सपाट व काळपट दिसत असून आंब्याच्या वनराईने वेढलेली आहेत. बाह्य स्वरूपावरून मंदिराच्या आतील ऐश्वर्याची कल्पना कोणीही करू शकणार नाही. मुघल आक्रमकांपासून आतील देवतांचे संरक्षण व्हावे म्हणून अशी योजना केली होती. या सर्व मंदिरांसाठी १२.५३ कोटी रु. खर्च करण्यात आले. शिल्पकारांना बिदागी म्हणून कोरीव काम केलेल्या शिल्पाच्या वजनाइतकी चांदी व सोने देण्यात आले.

ही मंदिरे जैन धर्मातील वेगवगळ्या तीर्थंकरांना अर्पिलेली आहेत. मुख्य तीर्थस्थानावर स्थिर मुद्रास्थित १०८ योगींच्या प्रतिमा कोरल्या आहेत. मंदिराच्या गाभाऱ्यात जैन धर्मातील संस्थापकांच्या मूर्ती असून घुमटाकार छतांवर हिंदू देवदेवतांची शिल्पे कोरली आहेत. अशा प्रकारे या दोहोंचा उत्कृष्ट मिलाफ दिलवाडा मंदिरात

आढळतो. हे या मंदिराचे प्रमुख वैशिष्ट्य.

एकसंध संगमरवरातून शिल्प कोरून काढण्याचे जबरदस्त आव्हान शिल्पकारांनी यशस्वीरित्या पेललेले आहे. छत, भिंतींवरील कोरीव कामातून साकारलेल्या नर्तिका, वादन करणाऱ्या अप्सरा, देवदेवतांची शिल्पे मोहक आहेत. त्यामुळे मंदिरात शांत प्रसन्न वातावरणाबरोबरच तत्कालिन समाजातील सौंदर्य व कलासक्तीचा आविष्कार आढळतो. फर्ग्युसनच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'दिलवाडा मंदिरातील चकाकणारी संगमरवरी शिल्पे कलात्मकदृष्ट्या बेजोड आहेत. अबू शिल्पकारांनी संगमरवरातून इतक्या सहजतेने अलंकारिक कोरीव काम केले आहे की जणू ते प्लॅस्टीकच असावे असे भासते.'

विमल वाशी हे पहिले जैन मंदिर विक्रम संवत १०८८ रोजी विमल शाह यांनी दिलवाडा येथे बांधले. विमल शाह हे गुजराथच्या सोलंकी घराण्याचे पहिले राजे भीम देवाच्या दरबारी मंत्री होते. विमल वाशी हे मंदिर जैन मंदिराच्या स्थापत्य शैलीचे उत्तम उदाहरण आहे. मध्यवर्ती पवित्र स्थानामध्ये आदिनाथ या जैन धर्मातील पहिल्या गुरूंची मूर्ती आहे. भव्य सभागृह, स्तंभांची रचना, स्तंभावरील कमानी, ज्यावर ५२ लहान देवता कोरल्या आहेत अशा प्रकारचे या मंदिराचे स्थापत्य आहे. भिंतीवर व खांबांवर हत्ती, घोडे व नर्तिका कोरलेल्या आहेत. मंदिराच्या घुमटाकार छतावर संकेश्वर देवी, नृसिंह, अंबिका, दुर्गा, शिवपार्वती, कृष्ण या देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. देवतांच्या मूर्तीमध्ये त्यांचे मुद्राभाव, अलंकार, शरीर सौष्ठव अत्यंत बारकाव्यात कोरलेले आहेत. कृष्णलीलांमध्ये गोपं समवेत होळी खेळतांनाचे शिल्प कोरण्यात आले आहे. रंग उडवण्यासाठी पिचकारी म्हणून गाय बैलांची टाकाऊ शिंगे दाखवली आहेत.

दुसरे जैन मंदिर सुमारे २०० वर्षांनंतर विक्रम संवत १२८७ रोजी वास्तुपाल आणि तेजपाल या पोरवाड जैन कुटुंबातील दोन भावांनी बांधलेले हे लून वाशी मंदिर होय. हे दोन बंधू गुजराथचा राजा विराधवलर याच्या दरबारात मंत्री होते. हे मंदिर नेमीनाथ या जैन धर्मातील २२ व्या तीर्थंकराला अर्पिलेले आहे. लून वाशी मंदिरात या दोन भावांच्या पत्नींच्या स्मृत्यर्थ दोन वेगवेगळे स्तंभ उभारण्यात आले. मोठ्या जावेला जेठाणी व धाकट्या जावेला देवराणी असे म्हणतात. यावरून हे स्तंभ जेठाणीचा गोखरा व देवराणीचा गोखरा या नावाने प्रसिद्ध आहेत. जेठाणी गोखराच्या पायथ्याच्या भागात २५ हत्ती कोरण्यात आले आहेत व देवराणी गोखराच्या खालच्या भागात २४ हत्ती कोरले आहेत. या मंदिरातील कोरीव काम विमल वाशी मंदिरापेक्षाही सरस आहे. सूर्यफुले, लयदार गरबा नृत्य याचे कोरीव काम अलंकारिक पद्धतीने आकर्षकरित्या केले आहे. या मंदिरातील एका छतावर ६४ प्रकारच्या विविध नृत्यमुद्रा व अविर्भावातील नर्तिका कोरलेल्या आहेत.

सोलंकी स्थापत्य शैलीने बांधलेल्या शेवटच्या जैन मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे द्वारमंडपाच्या घुमटावरील लोलक होय. हे घुमटाकार छत हे दिलवाडा मंदिराचे आकर्षण बिंदू आहेत. घुमटाकार छतांवर कमलाकृती महिरपींचे कोरीव काम आहे. वेली, फुलांच्या नाजूक अलंकारिक आकृत्या संगमरवरातून अत्यंत कौशल्याने कोरल्या आहेत. प्रत्येक छतावर वेगवेगळा आकृतिबंध कोरला आहे. या आकृतिबंधात मध्यबिंदूपासून उत्सर्जन दाखवले आहे. म्हणजे पूर्ण उमललेले फूल ज्याप्रमाणे दिसावे त्याप्रमाणे ही छते दिसतात. काही छतांवरील महिरपीत वेली, फुले, प्राण्यांसहित विविध मुद्राभावातील देवदेवता कोरल्या आहेत. ही घुमटाकार छते जणू आध्यात्मिक चक्रे आहेत. यातून पूर्ण विश्वाची प्रतिकृती दर्शवली आहे. मानव प्राणी निसर्ग यांचे अतूट नाते व जैन धर्मातील अहिंसेची अमर शिकवण यातून प्रतीत होते. अशी सुंदर शिल्पांनी युक्त अशी मंदिरे पाहतांना प्रेक्षक स्वतःचे भान हरपून जातो. या

---

**कोणतेही काम अनेक लोकांनी एकत्र येऊन केले की ते सोपे होते व हलके होते.**

शिल्पकलेचा आस्वाद घ्यावा तेवढा थोडाच आहे. ज्या अनाम शिल्पकारांनी ही मंदिरे घडवली त्यांना मन:पूर्वक अभिवादन.

**सौ. मंजिरी दांडेकर**
कला शिक्षक, बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणग ४०० ६०२.

* * *

शिक्षक (विद्यार्थ्यांना उद्देशून) : "मुलांनो सांगा पाहू जग गोल आहे का चपटे?

एक विद्यार्थी : "जग ना गोल आहे ना चपटे. माझे पपा कधीच खोटे बोलणार नाहीत ते नेहमी म्हणतात जग ४२० आहे."

*With Best Compliments From*

**Smart Capital Consultant**

**Sunil K. Doshi**
1-301, Kukraja Palace,
Vallabh Baug Lane Extn.,
Ghatkopar (E), Mumbai 400 075.

## श्रमसाफल्य

देश आमुचा भ्रष्टाचारी
निंदा करिती त्याची सारी
तरि आम्हाला प्रिय कसा
शत्रु अमंगळ आळसाचा?
आळसाच्या ह्या उगमाचे
सतत तयाच्या वृद्धीचे
एकच कारण सर्वांचे
बालपणीच्या सवयीचे
अंकुर उद्भट आळसाचा
बालपणी नच जपण्याचा
एक मार्ग अभिमानाचा
खऱ्याखुऱ्या अभ्यासाचा
नको फुकाची प्रमाणपत्रे
नको विकतच्या पदव्या
परिश्रमाने यश मिळवुया
धडे श्रमाचे गिरवुया
नको कदापि लाज श्रमाची
नको शरम सत्याची
एकच पुजा सदा करावी
लेखन वाचन फुले वहावी

-अशोक ग. करंदीकर

निसर्ग, काल आणि नियम हे तीनच खरे श्रेष्ठ वैद्य आहेत.




संजू ! मू तुझ्या आधी आलो अस लीहायला सांगितले तर तु ते कसे लीहीशील.

पहिली पासून इंग्रजी



अरे गणपती बाप्पा मराठीतील आरत्या ट्रांन्सलेट करुन घेत आहेत.

With Best Compliment From

**Ravindra O. Shan**

**Mangalam Caterors**
Naovroji Hill Road, Dongri,
Mumbai 400 009.

With Best Compliments From

**Matoshri**
*Graphics*

**Computer Data Entry**
**D.T.P. Mar./ Eng. / Hindi**
**A/c's in Tally, Electronic Typing**
**Typewritter Machine Machanic / Servicer**

**Add.** : Damu-Patil Apt., Room No.2,
Ground Floor, 2nd Rabodi Koliwada,
Thane (W.)-400 601.
Tel. : 544 8008 / 543 5354

**J.S. Raul / M.S. Raul / T.S. Raul**

*With Best Compliments From*

**GANASHAKTI ENTERPRICES**
**APPAREL PROCESSORS**

**Pramod Chowdhary**

121/D, DURGA COMPOUND,
KANJURMARG (E.),
MUMBAI 400 042.
Tel. : 578 92 87 Pager : 9627 216733

With Best Compliments From

**ANAND XEROX**

❑ Xerox ❑ Jumbo Xerox ❑ Multi Colour Xerox
❑ Xerox Offset ❑ Ammonia Print ❑ R.T.F.
❑ D.T.P. ❑ Plotting ❑ Lamination
❑ Binding

Ram Niwas, Gokhale Road,
Thane 400 602.

**Tel. 540 8958 / 541 6690**

वेळ आणि भरती-ओहोटी कोणाची वाट पहात नाही.

# ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये चळवळी व विचारधारा

श्री. अनिल शाळीग्राम, श्री. प्रशांत देशपांडे

*सध्याच्या तंत्रज्ञानाने नविन ज्ञानाधारित अर्थव्यवस्था आणली आहे. तिचे स्वरूप जाणून घेणे हे सर्वच चळवळींना आवश्यक आहे. जुन्या व नव्या प्रश्नांकडे या नव्या संदर्भात पाहिले तरच त्या प्रश्नांवरील उपाययोजना, कृती होऊ शकतात. नव्या दृष्टी व कार्यपद्धती रूजू शकतात. -संपादक*

सुमारे पाचशे वर्षांपूर्वी गटेनबर्गने बायबल छापले त्याचा परिणाम पुढील इतिहासावर काय झाला ते आपल्याला माहीत आहे. विसाव्या शतकाच्या इतिहासाचा आपण अलगदपणे विचार करीत असलो तरी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षात रेडिओ, छायाचित्रण वगैरेसारखे असंख्य शोध एकदम पुंजक्याने आले. त्याचा पुढे झालेला परिणाम आपल्याला इतिहासापासून अलग करता येणार नाही.

संगणकाचा विकास जरी दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या काळात झाला असला तरी साधारणपणे १९७० पासून तीस वर्षांत जी तांत्रीक क्रांती झाली त्यातून आजचे, म्हणजे एकविसाव्या शतकातले माहितीयुग जन्माला येऊ घातलेले आहे. त्यात विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात फोफावलेल्या इंटरनेटच्या महाजालाचा देखील समावेश आहे.

आधुनिक इतिहास हा नेहमी असमान विकास पद्धतीने झालेला दिसून येतो. एकीकडे जागतिक खेड्याची भाषा बोलली जात असतांना अनेक समाज आदिम अवस्थेत राहीलेले दिसत आहेत. अशा वेळी तंत्रज्ञान नाकारण्याची किंवा स्वीकारण्याची सरळसोट भूमिका घेणे सोपे आहे. पण आज गरज आहे ती विज्ञान-तंत्रज्ञानाच्या बदलांची. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण यांच्या दृष्टीने दखल घेऊन चळवळीची योग्य धोरणे आखण्याची.

गेल्या तीस वर्षांत तंत्रज्ञानात जे बदल झाले आहेत ते ढोबळपणे माहिती तंत्रज्ञान म्हणून ओळखले जातात. हे बदल वरवरचे नसून त्यातून समाजाच्या घडीत मूलभूत स्वरूपाचे बदल घडण्याची शक्यता आहे. यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक व्यवस्थेला ज्ञानाधारित अर्थव्यवस्था असे म्हणता येईल.

पुढारलेल्या देशांनी नेहमीच असा आव आणला आहे की मागासलेल्या देशांचे पुनरूत्थान करण्यासाठी ते मदत देतात. अशा प्रकारचे संभ्रम निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक सिद्धांत देखील गुंफले आहेत. भांडवलाचा ओघ पुढारलेल्या देशातून मागासलेल्या देशात वाहत राहीला की मागासलेपणा दूर होईल, मागासलेल्या देशांनी जास्तीत जास्त प्रमाणात जागतिक व्यापारात भाग घेतला की त्यांचे दारिद्रय दूर होईल, वगैरे. त्यांना एक छापील पद्धतीचा, वैविध्य नसलेला जागतिक समाज तयार करायचा आहे. तो देखील त्यांचा वरवंटा फिरवून.

आपल्याकडे अशा समजुती पसरल्या आहेत की ज्ञानाधारित अर्थव्यवस्था म्हणजे डोळे मिटून केलेले जागतिकीकरण किंवा भरमसाठ प्रमाणात आलेला परकीय पैसा वगैरे आणि मग या गृहितकाच्या आधारे आपण माहिती तंत्रज्ञान, ज्ञानाधारित अर्थव्यवस्था यांना पाठिंबा किंवा विरोध सुरू करतो. पण प्रत्यक्षात ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेची व्याख्या एवढी सरळसोट तर नाहीच तसेच या गोष्टी महत्वाच्या असल्या तरी प्रथम क्रमांकाच्या मुळीच नाहीत.

ॲडम स्मिथने उगवत्या भांडवलशाहीची व्याख्या केली. मार्क्सने भांडवलशाहीची व्याख्या केली. आता गरज आहे या येऊ घातलेल्या नव्या सामाजिक, आर्थिक घडीची व्याख्या करण्याची. त्यात सध्या जगातले नामवंत अर्थशास्त्रज्ञ गुंतलेले आहेत. त्यात आघाडीवर आहे पॉल रोमर. त्याने केलेली ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेची व्याख्या मूळ स्वरूपात काटेकोर गणिती पद्धतीची आहे. या लेखात त्याचा सोप्या भाषेत प्राथमिक परिचय करून दिला आहे.

१९८६ साली पॉल रोमर याने जो प्रबंध प्रसिद्ध केला तो ऐतिहासिक ठरला. त्यात त्याने प्रथमच असे दाखवून दिले की भांडवल, मजुरी आणि मानवी कौशल्य याचप्रमाणे ज्ञान हा देखील उत्पादनाचा एक घटक आहे. नव्हे तो सर्वात प्रमुख घटक आहे. रोमरच्या सिद्धांतानुसार सर्वात प्रथम आणि सरळसरळ निघणारा निष्कर्ष म्हणजे मागासलेल्या देशांचा विकास ज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे होऊ शकतो, अन्यथा नाही. रोमरने आपल्या सिद्धांताला 'आंतरिक वाढीचा सिद्धांत' असे नाव दिले आहे. हा सिद्धांत मागासलेल्या देशांना आणि चळवळीला योग्य पद्धतीने लागू करण्याचा प्रयत्न केला तर जनतेच्या हाती ते एक प्रभावी शस्त्र होऊ शकते.

पण ही ज्ञानाची व्याख्या आपल्या पारंपारिक भारतीय व्याख्येपेक्षा थोडी वेगळी आहे. कशी ते आपण पाहूच. ज्ञानाच्या या भूमिकेमुळे अर्थव्यवस्थेत एक नवीन प्रकारचा नियम लागू होतो. तो म्हणजे 'वाढत्या परताव्याचा सिद्धांत'. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या पुढील विकासावर बरेच मोठे परिणाम होतात. अमेरिकेत मायक्रोसॉफ्टवर भरण्यात आलेला खटला समजण्यासाठी हा सिद्धांत लक्षात घेणे आवश्यक आहे.

याउलट यापूर्वी अर्थव्यवस्थेत 'घटत्या परताव्याचा सिद्धांत' मानला जायचा आणि तो जेव्हा ज्ञान, तंत्रज्ञानाची वाढ कमकुवत होती तेव्हा योग्य देखील होता. यातून आर्थिक एकाधिकारशाही आणि ज्ञानावरील एकाधिकार हे पुढील प्रश्न तयार होतात. हे सर्व आर्थिक सिद्धांत, त्यातून निर्माण होणारे प्रश्न उलटसुलट तपासून बघणे, त्यातील आपल्याला जे योग्य वाटेल ते मागासलेल्या समाजाला लागू करण्याचा प्रयत्न करणे, त्यावर चर्चा घडवून आणणे हे सर्व कार्यकर्त्यांपुढे एक आव्हान आहे.

मार्क्सवादी, समाजवादी, उदारमतवादी, विकासवादी, पर्यावरणवादी, स्त्री-मुक्तीवादी अशा कोणत्याही विविध चळवळीत आपण सक्रिय असू, आपण आपले सिद्धांत या नव्या बदलांच्या संदर्भात बघणे आवश्यक आहे. त्यातून चळवळीसाठी नवे प्रश्न, नव्या कार्यपद्धती, नवे दृष्टीकोन देखील निर्माण होऊ शकतात. नाहीतर आपण बदलत्या परिस्थितीपासून, जनतेपासून अलग पडण्याचा धोका आहे.

काही वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती की बहुराष्ट्रीय कंपन्या नवी संशोधने दाबून टाकून आपला एकाधिकार टिकवायच्या. आज याच कंपन्यांना आपला एकाधिकार टिकवण्यासाठी सतत नवी तंत्रज्ञाने आणावी लागत आहेत. जी बहुराष्ट्रीय कंपनी यात मागे पडेल, मग ती कितीही मोठी असो, ती बाजाराच्या बाहेर फेकली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

त्याचप्रमाणे मायक्रोसॉफ्टवर एकाधिकारशाही विरोधी खटला भरण्यात आला आहे. ती मायक्रोसॉफ्ट नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात कोठेही मागे नाही. उलट आघाडीवर आहे! अशा प्रकारचे एकाधिकारशाहीचे रूप जगाला नवखे आहे. तीस वर्षांपूर्वी एकाधिकारशाही, बहुराष्ट्रीय कंपनी अशी असते, असे कोणाला सांगितले असते तर त्याला वेड्यात काढले असते.

**तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण**

तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण हे आजच्या काळातील परवलीचे शब्द बनले आहेत. संगणक आणि

इंटरनेटमुळे उद्योगांमध्ये प्रचंड बदल घडून येत आहेत. माहिती तंत्रज्ञानाची एकीकडे वाढ होत असतांनाच दुसरीकडे जैविक तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या पाऊलखुणा दिसायला लागल्या आहेत. नव्या शतकाच्या सुरुवातीलाच माणसाच्या सगळ्याच शारीरिक जडणघडणीला कारणीभूत असलेल्या गुणसूत्रांमधील जीन्सचा नकाशा तयार करण्यात शास्त्रज्ञांना यश आले आहे. यामुळे वैद्यकशास्त्र तसेच एकूण जैविक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक क्रांतीकारी शोध नजीकच्या भविष्यात लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच बरोबरीने पदार्थ-तंत्रज्ञान (मटेरियल टेक्नोलॉजी), अवकाश तंत्रज्ञान याही क्षेत्रात जगभर आणि विशेषत: विकसित देशांमध्ये जोमाने संशोधन चालू आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेग आज इतिहासात पूर्वी कधीही नव्हता इतका जास्त आहे आणि तो सातत्याने वाढत आहे.

एकीकडे तंत्रज्ञानाची ही घोडदौड चालू असतांनाच दुसरीकडे जागतिकीकरणाची प्रक्रिया वेगात चालू आहे. जगातील विविध भागांमध्ये संपर्क प्रचंड प्रमाणात वाढत आहे. संपर्क तंत्रज्ञानामुळे, विशेषत: इंटरनेटमुळे जगभर माहितीची देवाणघेवाण प्रचंड जलद झाली आहे. १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर बाजार अर्थव्यवस्थेला दुसरा बलाढ्य पर्याय शिल्लक राहिलेला नाही. अमेरिकेच्या तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटनेच्या दबावाखाली पूर्वी खुल्या नसलेल्या अनेक देशांमधील अर्थव्यवस्थांची दारे झपाट्याने उघडली जात आहेत. त्यामुळे वस्तू आणि भांडवलाचा एका देशातून दुसऱ्या देशात जाण्याचा दर प्रचंड वेगाने वाढला आहे. विविध देशांमधील आयात कर, आयातीवरील आणि परकीय गुंतवणुकीवरील निर्बंध झपाट्याने कमी होत आहेत. अशा प्रकारची आर्थिक उदारीकरणाची नीती स्वीकारणाऱ्या देशांमध्ये भारताचाही समावेश आहे.

तंत्रज्ञान व जागतिकीकरण यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनावर होणारे बदल चांगले की वाईट याबद्दल विविध व्यक्तींची विविध मते असली तरी यामुळे काहीतरी अमुलाग्र बदल होत आहेत. याबद्दल अगदी परस्पर विरोधी विचारसरणीच्या लोकांमध्ये देखील एकवाक्यता आढळते. औद्योगिक क्रांतीनंतर माणसांच्या इतिहासात प्रथमच इतके सर्वस्पर्शी स्थित्यंतर घडून येत आहे. येणाऱ्या युगाला माहितीयुग म्हणून कित्येकजण संबोधतात. परंतु या युगात नव्या ज्ञानाच्या निर्मितीचे स्थान मध्यवर्ती असल्याने त्याला ज्ञानयुग म्हणणे अधिक बरोबर ठरेल. संपूर्ण अर्थव्यवस्थेला मुळापासून हलवून सोडणाऱ्या या झंझावाती परिवर्तनाच्या मागे दडलेल्या प्रेरणा कोणत्या आहेत? या बदलांमधून आकाराला येत असलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेचे चित्र कसे असेल? आजच्या विविध सामाजिक व आर्थिक गटांवर, तसेच जगातील विविध देशांवर या बदलांचा काय परिणाम होत आहे? भारतासारख्या देशापुढे कोणत्या संधी आणि धोके उभे राहत आहेत? भारतातील धोरणकर्ते आणि विविध सामाजिक चळवळींनी कोणत्या प्रश्नांकडे आपले लक्ष केंद्रित करावे?

या प्रश्नांची अंतिम उत्तरे माहीत असल्याचा दावा कोणीही करणार नाही. कुठलेही अंतिम सत्य मांडण्याचा प्रयत्न करणे हा या लेखाचा हेतूही नाही. पण गेल्या दहा-पंधरा वर्षांमध्ये परिवर्तनाचा वेध घेणारे बरेच संशोधन अर्थतज्ज्ञांनी केले आहे. यात स्टॅनफर्ड विद्यापीठातील अर्थतज्ञ पॉल रोमर आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी मांडलेला 'आंतरिक वाढीच्या सिद्धांताचे' स्थान उल्लेखनीय आहे. या कामामुळे ज्ञानमय अर्थव्यवस्थेच्या मूलभूत तत्वांबद्दलच्या आपल्या समजुतीत मोलाची भर पडली. औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या तर्कशास्त्रावर आधारित अनेक प्रस्थापित आर्थिक सिद्धांतांच्या मर्यादा या संशोधनाने उघड्या करून दाखवल्या आहेत. या नविन सिद्धांतांची ओळख करून देणे, त्याच्या आधारे आपल्या भोवताली

घडणाऱ्या गुंतागुंतीच्या घडामोडींचा उलगडा करण्याचा प्रयत्न करणे आणि या सिद्धांतातून मिळणाऱ्या दृष्टीचा वापर आपल्या देशापुढील विकासाच्या प्रशंड प्रश्नांचा विचार करण्यासाठी करणे. हे या लेखाचे मुख्य हेतू आहेत.

**आंतरिक वाढीचा सिद्धांत (एंडोजेनस ग्रोथ थेअरी):**

१९८६ मध्ये २७ वर्षे वयाच्या एका तरूण अर्थतज्ज्ञाने 'जर्नल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या अर्थशास्त्राच्या क्षेत्रात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या नियतकालात एक लेख प्रसिद्ध केला. लेखकाचे नाव होत, पॉल रोमर आणि 'इन्क्रिजिंग रिटर्न अँण्ड लाँग ग्रोथ' या लेखाचा विषय होता, मोठ्या कालावधीत अर्थव्यवस्थेची वाढ कशामुळे होते? काही देश आर्थिक प्रगतीच्या स्पर्धेत पुढे निघून जातात तर काही या स्पर्धेत मागे पडून दारिद्र्याचा शाप भोगत राहतात. असे का घडते? वास्तविक पाहता विविध देशांच्या आर्थिक प्रगतीच्या तफावतीच्या कोड्याने आधुनिक अर्थशास्त्राचा जनक मानल्या जाणाऱ्या अॅडम स्मिथपासून आजवरच्या असंख्य अर्थतज्ज्ञांना भुरळ घातली आहे. स्मिथच्या १७७६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचे नाव होते, 'एन्कायरी इन्टू द नेचर अँण्ड कॉजेस ऑफ वेल्थ ऑफ नेशन्स' 'काही राष्ट्रे श्रीमंत तर काही गरीब का?' याच प्रश्नाची चिकित्सा स्मिथने त्या पुस्तकात केली आहे. तब्बल दोन शतकानंतर रोमरने याच समस्येची उकल एका वेगळ्या पद्धतीने केली. त्याच्या सिद्धांतानुसार एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती ठरवणारा सगळ्यात महत्वाचा घटक असतो, तो म्हणजे त्या देशात निर्माण होणारे नवीन ज्ञान, नैसर्गिक साधनसंपत्ती, लोकसंख्या, भांडवल या सगळ्यांहून कितीतरी अधिक प्रमाणात नवीन ज्ञानाच्या निर्मितीचा त्या देशाच्या आर्थिक विकासावर आणि तेथील नागरिकांच्या जीवनमानावर परिणाम होतो. यापुढे जाऊन त्याने असे दाखवून दिले की, ही नवीन ज्ञानाची निर्मिती काही आपोआप, काळानुसार होत नाही, तर सामाजिक रचना, आर्थिक धोरणे या सगळ्यांचा नवीन संशोधनाच्या गतीवर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या ज्ञानावर परिणाम होतो. म्हणजे थोडक्यात आर्थिक प्रगती काही कुठल्या बाह्यशक्तीची करामत नाही तर माणसाच्या स्वत:च्या प्रयत्नांचे फळ आहे. अर्थव्यवस्थेची वाढ काही निर्जिव वस्तूंच्या ढिगाऱ्याप्रमाणे होत नाही, तर एखाद्या सजीवाच्या वाढीसारखी ती आंतरिक असते. म्हणूनच या सिद्धांताला रोमरने 'आंतरिक वाढीचा सिद्धांत' म्हणजेच 'एंडोजेनस ग्रोथ थेअरी' असे नाव दिले.

या एका सिद्धांतामुळे माणसामाणसांतील आर्थिक व्यवहारांकडे बघण्याचा आपल्या दृष्टीकोनातूनच आमूलाग्र बदल होईल. आजवर अर्थशास्त्राचा भर केवळ नैसर्गिक साधनसामुग्री, मानवी श्रम, भांडवल आणि यंत्रसामुग्री या उत्पादन प्रक्रियेतील घटकांचा जास्तीत जास्त क्षमतेने वापर करण्याकडे होता. मात्र या घटकांहून 'ज्ञान' हा सगळ्यात महत्वाचा आर्थिक घटक असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे इथून पुढच्या धोरणकर्त्यांना तसेच अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना ज्ञानाच्या अर्थशास्त्रावर आपले लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. नवीन ज्ञानाच्या निर्मितीसाठी आर्थिक प्रोत्साहने कशी निर्माण करायची, संशोधनातील आर्थिक अडसर कसे दूर करायचे, ज्ञानाचा प्रसार जलद गतीने समाजातील सर्व घटकांपर्यंत कसा करायचा, ज्ञानावरील अधिकाराचे वाटप कसे करायचे, बहुसंख्य लोकांना ज्ञाननिर्मितीच्या आर्थिक प्रक्रियेत कसे सहभागी करून घ्यायचे, हे आगामी काळातील मानवजातीपुढचे काही सर्वात ज्वलंत प्रश्न असणार आहेत.

**ज्ञान म्हणजे काय?**

आजकाल आपण वर्तमानपत्रातून, कित्येकांच्या भाषणातून 'ज्ञानयुग' हा शब्द अनेकवेळा ऐकत असतो. 'भारताने ज्ञानयुगातील महाशक्ती बनले पाहिजे', ज्ञानयुगात टिकून राहायचे असेल तर जागतिक स्पर्धेत आपण उतरले पाहिजे' वगैरे वगैरे. पण ज्ञान म्हणजे नेमके काय? ज्ञानयुग

आता येत असेल तर यापूर्वी ज्ञानाला काही किंमत नव्हती का? केवळ संगणक आणि इंटरनेटचे आगमन म्हणजे ज्ञानयुग आहे का? अजूनही निम्मी जनता निरक्षरतेत खितपत पडलेली असतांना दहावीस संगणक क्षेत्रातील यशस्वी कंपन्यांच्या जोरावर आपण ज्ञानयुगाचा डंका पिटायचा का? अशा प्रश्नांची वावटळ कधी ना कधी निश्चितपणे आपल्या डोक्यात उठली असेल. तुमच्या आमच्या मनातील हे प्रश्न अर्थतज्ज्ञांपुढील प्रश्नांइतकेच महत्वाचे आणि किंबहुना अधिक मूलभूत स्वरूपाचे आहेत. आंतरिक वाढीचा सिद्धांत आपल्याला या बाबतीत काय सांगतो ते पाहू.

अर्थशास्त्रीयदृष्ट्या ज्ञानाची व्याख्या काय आहे? आंतरिक वाढीच्या सिद्धांतानुसार कोणत्याही कल्पनेला किंवा सूचनांच्या क्रमावलींना ज्ञान तेंव्हाच म्हणता येईल जेंव्हा -

१) त्या कल्पना किंवा सूचनावलीला ती ज्या व्यक्तीला सुचली आहे त्या व्यक्तीहून वेगळे स्वतंत्र अस्तित्व असेल.

२) ती कल्पना व सूचनावली ज्या भौतिक वस्तूंच्या हालचालींसाठी किंवा पुनर्रचनेसाठी वापरली जाणार आहे त्या वस्तूंना भौतिकरित्या चिकटलेली नसेल.

३) आर्थिकदृष्ट्या सुलभ रितीने अनेक प्रती काढून तिचा प्रसार करता येईल.

उदा. एखाद्या इमारतीचा नकाशा, एखाद्या यंत्रावर कसे काम करायचे याची पुस्तिका, विविध विषयांवरील पुस्तके, एखाद्या नवीन शोधाचे पेटंट, एखाद्या नियतकालिकात छापून येणारा लेख, एखाद्या स्वयंचलित यंत्रावर नियंत्रण ठेवणारी संगणकातील आज्ञावली या सगळ्या गोष्टी आपल्या ज्ञानाच्या व्याख्येत बसतील. परंतु जुन्या काळातील एखाद्या आयुर्वेदिक वैद्याचे गुप्त राखलेले रोगनिदानाचे कौशल्य, ज्याची कोठेही आकृती काढलेली नाही असे एखादे अवजार किंवा यंत्र ज्ञान म्हणवून घेण्यास पात्र ठरणार नाही. क्रिकेट कसे खेळायचे याची अवकड शिकवणारी एखादी व्हिडीओ कॅसेट देखील ज्ञान या दरात मोडेल. पण सचिन तेंडूलकरच्या फलंदाजीचे कौशल्य ज्ञान म्हणता येणार नाही. कारण व्हिडीओ कॅसेटला त्या कॅसेटमध्ये खेळतांना दाखवलेल्या कोणत्याही खेळाडूहून वेगळे असे स्वतंत्र अस्तित्व आहे. तुलनेने सहजपणे तिच्या अनेक प्रती काढता येतात. मात्र तेंडूलकरचे कौशल्य कितीही अत्युच्च दर्जाचे असले तरी कायम ते तेंडूलकर बरोबर राहणार आणि त्याच्या प्रती काढता येणार नाहीत. एखादे पाककृतीचे वर्णन करणारे पुस्तक ज्ञान या सदरात मोडेल कारण त्या पुस्तकाच्या असंख्य प्रती काढता येतील. पण आजीच्या हातचे पुरणपोळी करण्याचे कौशल्य ज्ञानाच्या व्याख्येत बसणार नाही.

### मानवी भांडवल

मग तेंडूलकरचे खेळाचे कौशल्य, आजीच्या पुरणपोळी करण्यातील तरबेजपणा किंवा एखाद्या वैद्याची नाडी परीक्षेची हातोटी यांना ज्ञानयुगात काहीच किंमत नाही का? निश्चित आहे. पण अशा प्रकारच्या कौशल्यांसाठी अर्थशास्त्रात स्वतंत्र संज्ञा वापरली आहे. ती म्हणजे मानवी भांडवल. मानवी भांडवलाच्या संकल्पनेत वेळ, पैसा, परिश्रम यांची गुंतवणूक करून प्रयत्नपूर्वक मिळवलेली कौशल्ये अपेक्षित आहेत. मुळात भांडवलाची अर्थशास्त्रीय परिभाषा अशी आहे की, 'मानवी उत्पादनप्रक्रियेचा परिणाम असणारा असा घटक की जो आर्थिक प्रक्रियेत पुन्हा वापरला जातो.' नैसर्गिकरित्या आढळणाऱ्या कोणत्याही मालाला भांडवल म्हटले जात नाही. त्याचप्रमाणे नैसर्गिकरित्या एखाद्या माणसात असलेल्या गुणधर्मांना मानवी भांडवल म्हणता येणार नाही. ऐश्वर्या रॉयचे नैसर्गिक सौंदर्य मानवी भांडवल या सदरात मोडणार नाही, पण तिने विश्वसुंदरी स्पर्धेसाठी तयारी करतांना प्रयत्नपूर्वक मिळवलेली संभाषण आणि सादरीकरणाची

कौशल्ये, नंतर चित्रपटात काम करतांना मिळवलेले अभिनय कौशल्य या गोष्टी मानवी भांडवल या सदरात मोडतील. मानवी भांडवलाचा सिद्धांत (ह्यूमन कॅपिटल थेअरी) १९६४ साली गॅरी बेकर या अर्थतज्ज्ञाने मांडला. बेकरच्या संकल्पनांचा वापर रोमरने पुढे आपल्या आंतरिक वादीच्या सिद्धांतात केला.

## ज्ञान, प्रतिस्पर्धाविरहित आर्थिक घटक

ज्ञान आणि मानवी भांडवल या दोन संपूर्णपणे वेगळ्या स्वरूपाच्या गोष्टी आहेत. त्यांचे काही अर्थशास्त्रीय गुणधर्मदेखील निराळे आहेत. ज्ञान हा प्रतिस्पर्धाविरहित (नॉनरायव्हल) आर्थिक घटक आहे. म्हणजेच एका व्यक्तीने ज्ञानाचा वापर केल्याने त्याच ज्ञानाचा वापर करण्याची इतर व्यक्तींची संधी अजिबात कमी होत नाही. समजा मी एखादे पुस्तक वाचत असेन तर त्या वेळेला दुसरा वाचक ते कसे वाचू शकेल असा प्रश्न पडणे साहजिक आहे. पण या गोष्टीचे मुख्य कारण त्या पुस्तकातील मजकूर त्या पुस्तकाला भौतिकरित्या चिकटलेला आहे. सैद्धांतिकदृष्ट्या ज्ञान आदर्श स्थितीत तेंव्हा असेल जेंव्हा ते कोणत्याही वस्तूला भौतिकरित्या चिकटलेले नसेल. पण ही अवस्था दैनंदिन जीवनात आढळणे कठीण. म्हणूनच तडजोड म्हणून जर का ते ज्ञान ज्या वस्तूला चिकटलेले आहे तिच्या आर्थिक दृष्ट्या सुलभ रितीने प्रती काढता येत असतील तर आपण ते पुरेसे मानतो. आता झेरॉक्स यंत्र गल्लोगल्ली झाल्याने आपण कोणत्याही छापील मजकूराच्या हव्या तितक्या प्रती अगदी नगण्य खर्चात काढू शकतो. त्याहून चांगले उदाहरण म्हणजे ० आणि १ च्या सांकेतिक भाषेत साठवून ठेवणारी संगणकाची फ्लॉपी किंवा डिस्क. एकाच मजकूराच्या, चित्राच्या वा डिजिटल स्वरूपातील कोणत्याही दृक्‌श्राव्य कार्यक्रमाच्या हव्या तितक्या प्रती कमी खर्चात काढता येतात. आता हा खर्च कमी की जास्त हे कोण ठरवणार? जर का दुसरी किंवा त्यापुढच्या फ्लॉपीज् किंवा डिस्कस् तयार करण्याचा खर्च मुळातून पहिल्या फ्लॉपी वा डिस्कमधील डिजिटल घटक तयार करण्याहून अतिशय कमी असेल तर आर्थिकदृष्ट्या सुलभतेने प्रती काढता येण्याची अट पूर्ण होते असे मानण्यास हरकत नाही.

प्रतिस्पर्धाविरहित असणे हा भौतिकदृष्ट्या कोणत्याही वस्तूला चिकटले नसल्याचा ज्ञानाच्या गुणधर्मांचा परिणाम आहे. कोणतीही भौतिक वस्तू आणि कित्येक सेवा या प्रतिस्पर्धासहित गटात मोडतात. उदा. अन्नधान्य, वस्त्र, यंत्रसामुग्री इत्यादी. एकाचवेळी कोणत्याही भौतिक वस्तूचा अनेक ठिकाणी उत्पादन प्रक्रियेत वापर करता येत नाही. समजा एखाद्या यंत्राचा दोन ठिकाणी वापर करायचा तर यंत्राच्या संचालकांसाठी लागणाऱ्या सूचनावलींच्या जशा प्रती काढता येतात तशा यंत्रांच्या प्रती स्वस्तात छापता येत नाहीत. म्हणून त्या यंत्राला स्पर्धासहित आर्थिक वस्तू म्हणावे लागेल.

## वाढत्या परताव्याचा नियम

ज्ञानाचा इतर आर्थिक घटकांहून वेगळा असणारा गुणधर्म विशेष महत्वाचा आहे. यामुळे एकदा एखादे ज्ञान निर्माण करण्यासाठी जो खर्च होतो तोच काय तो प्रमुख खर्च असतो. नंतर त्या ज्ञानाचे वितरण करणे सोपे आणि आर्थिकदृष्ट्या स्वस्त असते. उदा. मायक्रोसॉफ्टच्या विंडोज या प्रसिद्ध संगणकीय कार्यप्रणालीच्या पहिल्या प्रतीच्या विकासासाठी लक्षावधी डॉलर्स संशोधनात खर्च झाले असतील. मात्र त्या सॉफ्टवेअरच्या पुढच्या प्रती काढण्यासाठी प्रत्येक प्रतीमागे तीनचार डॉलर्सहून अधिक खर्च नसेल. यामुळे प्रतिस्पर्धाविरहित असलेल्या ज्ञानाच्या असंख्य प्रती काढून त्या वितरित करण्याचा प्रयत्न मायक्रोसॉफ्ट करेल.

यामुळे एक गोष्ट घडून येते नवीन ज्ञानाचा प्रसार जितका होईल तितके फारसा खर्च न होता ते ज्ञान विविध वस्तू आणि सेवांच्या निर्मितीसाठी वापरले जाते. साहजिकच जसजसे अधिक प्रमाणात ज्ञान मोठ्या

प्रमाणावर पसरते तेवढा त्या ज्ञानावर आपल्याला जास्त परतावा मिळतो.

ही गोष्ट उल्लेखनीय आहे कारण मानवी श्रम, भांडवल यासारख्या जुन्या अर्थव्यवस्थेतील घटकांचे प्रमाण जसजसे अर्थव्यवस्थेत वाढत जाते तसतसा या घटकांवरील प्रति एकक मिळणारा परतावा कमी होत जातो. या नियमाला अर्थशास्त्रात 'घटत्या परताव्याचा नियम' (लॉ ऑफ डिमिनिशिंग रिटर्न्स) म्हणतात. याउलट ज्ञानावर मिळणारा परतावा वाढत जात असल्याने त्याला वाढत्या परताव्याचा नियम (लॉ ऑफ इन्क्रिजिंग रिटर्न्स) म्हणतात. ज्ञानाच्या वाढत्या परताव्याच्या नियमाचा विचार सर्वप्रथम १९६२ साली नोबेल पारितोषिक विजेता अर्थतज्ज्ञ केनेथ ॲरो याने केला होता. एकदा एखादे नवनिर्माण मोठ्या प्रमाणावर पसरले की, एखाद्या खाचेत पाचर बसावी तसे ते अर्थव्यवस्थेत घट्टपणे प्रस्थापित होते. यामुळे पर्यायी तंत्रज्ञाने आर्थिकदृष्ट्या सरस असली तरी बाजारात सहजगत्या शिरकाव करू शकत नाहीत. कारण बदलाचा खर्च व त्यापायी उद्भवणारे इतर खर्च त्यांच्या बाजारातील प्रवेशाच्या आड येऊ शकतात. या परिणामाला लॉक-इन-इफेक्ट म्हणतात.

वाढत्या परताव्याचा नियम आणि त्यात अंतर्गत असणारा लॉक-इन-इफेक्ट याचा अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो. तर मुळात नवनिर्मितीक्षम ज्ञान भरपूर असणाऱ्या देशांची आणखी नवनिर्माण करण्याची क्षमता वाढते तर उरलेल्या देशांमध्ये ज्ञानाची निर्मिती त्या प्रमाणात होत नाही. यामुळे विविध देशांतील ज्ञानाची दरी दिवसेंदिवस वाढत आहे.

एकीकडे ज्ञानाच्या प्रसारावरील परतावा वाढत असला तरी प्रत्यक्ष नवीन ज्ञानाच्या निर्मितीच्या प्रक्रियेत मात्र वाढत्या परताव्याचा नियम लागू होत नाही. म्हणजेच संशोधनात आपण काही पैसे घातले तर त्यातून त्या प्रमाणात ज्ञान निर्माण होईलच असे नाही उलट पुढे जास्त जास्त गुंतवणूक करायला आपण सुरुवात केली तर त्यामुळे वाढत्या प्रमाणात नवीन संशोधन होईल असे नाही.

### ज्ञानावरील एकाधिकार

ज्ञानाचा आणखी एक गुणधर्म म्हणजे ज्ञान निर्माण करणाऱ्या व्यक्ती वा कंपनीस काही प्रमाणात का होईना पण त्यावरील अधिकार स्वत:कडे ठेवता येतो. या पूर्वीच्या सिद्धांतांमध्ये ज्ञान हे सार्वजनिक मानले गेले. १९५६-५७ मध्ये रॉबर्ट सोली या नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थतज्ज्ञाने आपल्या सिद्धांतात ज्ञान सार्वजनिक मालकीचेच मानले होते. म्हणूनच त्याचा सिद्धांत आज जितक्या मोठ्या प्रमाणावर संशोधनावर खाजगी कंपन्या का खर्च करत असतील याचं स्पष्टीकरण देऊ शकत नाही. ज्ञान सार्वजनिक असल्याने सोलोच्या सिद्धांतात मायक्रोसॉफ्ट, ओरॅकल, इंटेल इत्यादी कंपन्यांनी आपापल्या क्षेत्रात निर्माण केलेल्या ज्ञानाधारित मक्तेदारींचे स्पष्टीकरण मिळत नाही.

ज्ञानावर खाजगी अधिकार दोन गोष्टींमुळे निर्माण होऊ शकतो. एक म्हणजे यासंदर्भातील कायदेशीर तरतुदींप्रमाणे आणि दुसरी खुद्द तंत्रज्ञानाच्या स्वरूपामुळे. ज्ञानाच्या अधिकारासंदर्भातील कायद्यांमध्ये पेटंट, कॉपीराईट यासारख्या तरतुदींचा समावेश होतो. दुसरा प्रकार म्हणजे प्रत्यक्ष तंत्रज्ञानाचा वापर ज्ञानाची गोपनीयता व अधिकार राखण्यासाठी वापरणे. उदा. मध्यंतरी मॅन्सॅन्टो या जैविक क्षेत्रातील कंपनीने टर्मिनेटर नावाचे तंत्रज्ञान निर्माण केले व त्यावरून बराच वादंग उठला होता. हे तंत्रज्ञान म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपण पुढे केलेल्या नवनिर्माणांवर तांत्रिक मार्गाने एकाधिकार प्रस्थापित करण्याचा कंपनीचा प्रयत्न होता.

पण रोमरच्या म्हणण्यानुसार कितीही प्रयत्न केले तरी ज्ञानावर कायम पूर्णपणे कोणालाही नियंत्रण ठेवता येत

नाही. याचे अगदी ठळक उदाहरण म्हणजे अण्वस्त्र तंत्रज्ञान १९४५ मध्ये जेव्हा विकसित झाले तेंव्हा ते रशियाला मिळू नये यासाठी अमेरिकेने जंग जंग पछाडले. पण तरीही या ज्ञानाचा रशियासहित अनेक देशांमध्ये प्रसार झाल्यावाचून राहिला नाही.

त्यामुळेच ज्ञानावर अंशत: खाजगी नियंत्रण असणे शक्य आहे असे आपण मानू शकतो.

### विकसनशील देशांवरील परिणाम

ज्ञानायुगाच्या आगमनाचा विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांवर काय परिणाम होईल हे पाहणे महत्वाचे ठरेल. आज जगातील १५ टक्के लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये बहुतेक सर्व ज्ञानाची निर्मिती होते. जगातील १/३ लोकांपर्यंत आज ज्ञान अजिबात पोहोचत नाही. त्यामुळे आरोग्य, सामाजिक समस्या, दारिद्र्य यांच्यावरील शक्यतेच्या कोटीतील उपाय देखील हे देश योजू शकत नाहीत. ज्ञानयुगाच्या आगमनाबरोबर ज्ञानाची वाढती दरी हा संपूर्ण मानवजातीपुढचा चिंतेचा विषय आहे. जगातील श्रीमंत आणि गरीब देशांमधील राष्ट्रीय उत्पन्नाचे जे गुणोत्तर आहे त्याच्या तुलनेत त्यांच्यातील नवीन संशोधनावरील खर्चाचे गुणोत्तर दसपटीने अधिक आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, विकसित देशात निर्माण झालेले नवीन ज्ञान जर का विकसनशील देशात स्थलांतरित झाले नाही तर जगातील आर्थिक विषमता वाढतच जाईल.

शिवाय नवीन संशोधनामुळे जगातील ज्या भागातील अर्थव्यवस्था जुन्या तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रियांवर वा कच्च्या मालावर अवलंबून आहे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत धोक्यात येण्याची शक्यता आहे. उदा. कृत्रिम द्रव्य तंत्रज्ञानातील (मटेरियल टेक्नॉलॉजी) धडामोडींमुळे रबरावर आधारित इंडोनेशियन आणि मलेशियन अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल.

### जागतिकीकरणाच्या सिद्धांतातील फोलपणा

आज भारतातील सर्व प्रसार माध्यमांमध्ये जागीतकी करणाच्या प्रक्रियेबद्दल गवगवा चालू असतो. आज जागतिकीकरणाविरुद्ध बोलणेही पाखंडीपणाचे मानले जाते. पण खरोखरीच जागतिक व्यापार आणि भांडवलामुळे भारताचा फायदा होतो का? या संदर्भात अंतर्गत वाढीचा सिद्धांत आपल्याला काय सांगतो?

आंतरिक वाढीच्या सिद्धांतानुसार नवीन ज्ञानाची निर्मिती ही उच्च तंत्रज्ञान आणि मानवी भांडवल या परस्परक्रियेतून होते. म्हणजे उच्च तंत्रज्ञानाची उपलब्धता ज्ञानाच्या निर्मितीसाठी मानवी भांडवलाइतकीच आवश्यक आहे. कित्येकवेळा हा तंत्रज्ञानाचा मुद्दा पुढे करून जागतिकिकरणाचे समर्थन केले जाते, की परकीय गुंतवणूकीबरोबर परकीय तंत्रज्ञान देशात येईल.

पण वास्तवात तंत्रज्ञानाचा प्रसार इतक्या सहजपणे विकसनशील देशात होत नाही. परकीय भांडवल आले तरी अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील ताबा मात्र विकसित देशांच्या प्रभुत्वाखालील बहुराष्ट्रीय कंपन्यांकडेच असलेला दिसून येतो.

तंत्रज्ञानाचे स्थलांतर म्हणावे इतके न झाल्यामुळे मानवी भांडवलाला ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या संधी त्याचा क्षमतेहून कमी शिल्लक राहतात. जितके मानवी भांडवल अधिक अव्वल दर्जाचे असेल तितकी प्रगत तंत्रज्ञानाची त्याला गरज भासते. म्हणूनच भारतासारख्या मानवी भांडवलाची विपुलता असणाऱ्या देशातून प्रगत तंत्रज्ञान असणाऱ्या अमेरिकेसारख्या देशांकडे तंत्रज्ञांचा आणि उच्चशिक्षित तरुणांचा ओढा वाढलेला दिसून येतो. पण यामुळे निर्माण होणारे ज्ञान भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी तयार न होता अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी तयार होते.

अगदी भारतातील आघाडीच्या सॉफ्टवेअर

कंपन्यांमध्ये जे बहुमोल सॉफ्टवेअर तयार होते ते देखील ९० टक्क्यांहून अधिक अमेरिकन अर्थव्यवस्थेसाठी निर्माण होते. जेव्हा हे ज्ञान उत्पादनप्रक्रियेत वापरले जाते तेव्हा वाढता परताव्याच्या नियमानुसार उत्पादकतेत प्रचंड वाढ होते. कोणी म्हणेल की ज्ञान प्रतिस्पर्धारहित असल्याने आपल्या अर्थव्यवस्थेतील ज्ञानाचा साठाही वाढतोच आहे की! पण या युक्तीवादात एक त्रुटी आहे. ती म्हणजे निर्माण होणारे ज्ञान स्थानिक गरजांना विचारात घेऊन केलेले नसते तर परकीय गरजांसाठी तयार केलेले असते.

मुळात आंतरिक वाढीचा सिद्धांत १९ व्या शतकात मांडलेली रिकार्डोची, व्यापार हा जगातील सर्व देशांच्या आर्थिक वाढीस कारणीभूत आहे, ही कल्पना फेटाळून लावतो. व्यापार हा विविध देशांच्या आर्थिक वाढीच्या केंद्रस्थानी असू शकत नाही. कोणत्याही अर्थव्यवस्थेची वाढ ही आतून व्हावी लागते, व्यापार हा या वाढीला पूरक ठरू शकेल, पण तेच जर आंतरिक वाढ मंदावली असेल तर खुल्या व्यापारामुळे ही परिस्थिती आणखी खालावण्याचीच शक्यता वाढते. त्यामुळे जागतिकीकरण हा अंतिम कल्याणाचा मंत्र न मानता राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक त्याच ठिकाणी ते झाले पाहिजे.

या संदर्भात चीनने परकीय गुंतवणुकीसंदर्भात आखलेले धोरण उल्लेखनीय आहे. आपल्याकडे प्रसारमाध्यमांमध्ये चीनच्या आर्थिक उदारीकरणाचा खूप गवगवा केला जातो. पण चीनने आपल्यासारखे जागतिक भांडवलासाठी मुक्तद्वार उघडलेले नाही. तेथे एखाद्या नवीन तंत्रज्ञानात एकदाच गुंतवणूक करता येते. पुन्हापुन्हा तेच ते तंत्रज्ञान विकण्यालाही परकीय कंपन्यांना बंदी आहे. यामुळे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची प्रक्रीया अधिक वेगाने होण्याची शक्यता वाढते.

**नव्या विकासनीतीच्या शोधात**

जागतिक ज्ञानमय अर्थव्यवस्थेत भारताला खऱ्या अर्थाने सहभागी व्हावयाचे असेल तर एकदम आपल्याला नव्या प्रकारचे कार्यक्रम आणि धोरण मिळणार नाहीत. पण धोरणकर्त्यांनी आणि समाजिक कार्यकर्त्यांनी किमान या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करण्याचा प्रयत्न करायला शिकले पाहिजे. यापैकी काही प्रश्न असे आहेत.

१) परकीय गुंतवणुकीकडे भांडवलाचा स्रोत म्हणून न पहाता तंत्रज्ञानाचा स्रोत म्हणून पाहायला हवे. पद्धतशीरपणे उच्चतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातच परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जावे. उर्वरित क्षेत्रांपैकी ज्या क्षेत्रांमध्ये पर्यावरणाला हानीकारक तंत्रज्ञान प्रकल्पांमध्ये वापरले गेले नसेल तेथे परकीय भांडवल द्यायला हरकत नाही. पण त्यासाठी कोणतेही विशेष शासकीय प्रोत्साहन असू नये.

२) भारताची जैवविविधता जगातील कोणत्याही देशाहून अधिक आहे. आगामी जैविक तंत्रज्ञानाच्या युगात ही संपदा मोलीची ठरणार आहे. त्यामुळे पर्यावरणाला हानी पोचवून जैवविविधतेस धोका निर्माण करेल अशा कोणत्याही देशीविदेशी प्रयत्नाला विरोध करावा.

३) भारताने मानवी भांडवल काही प्रकारच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित क्षेत्रात वाखाणण्याइतके असले तरी देशातील निम्मी जनता निरक्षर आहे. शिक्षण व आरोग्य क्षेत्रात शासकीय खर्च वाढवून देशाच्या प्रचंड लोकसंख्येला प्रचंड मानवी भांडवलात रूपांतरित करण्याला राष्ट्रीय प्राधान्य दिले जावे.

४) अमेरिकेकडे तंत्रज्ञानाच्या तुलनेत मानवी भांडवल तुटपुंजे असल्याने जगभरातील इतर देशांतून विशेषत: भारतातून त्यांनी मानवी भांडवल आयात केले. आजही जर्मनी, जपानसारख्या देशांमध्ये भारतीय सॉफ्टवेअर तज्ज्ञांना मागणी आहे. ज्याप्रमाणे तंत्रज्ञानाची उपलब्धता ज्ञाननिर्मितीसाठी आवश्यक आहे तशीच मानवी

---

भांडवलाचीही आवश्यकता आहे. मात्र या मानवी भांडवलाची किंमत खरेदीदाराचे प्रभुत्व असणाऱ्या बाजारात ठरवली जाते. म्हणूनच त्याची खरी आर्थिक किंमत आपल्याला मिळत नाही. म्हणून सगळ्या आंतरराष्ट्रीय मंचांवर तसेच द्विपक्षीय करारांमध्ये मानवी भांडवलाच्या बदलत्या उच्च तंत्रज्ञानाचे स्थलांतर भारतात करणे सक्तीचे करावे.

५) नवीन ज्ञाननिर्मितीच्या म्हणजेच संशोधनाच्या प्रयत्नांना सर्वोच्च आर्थिक प्राधान्य दिले जावे. याचबरोबर उच्च तंत्रज्ञानाच्या आयातीसाठी देशी उद्योगांना शासकीय प्रोत्साहन द्यावे. तसेच कंपन्यांच्या विलीनीकरणाच्या आजच्या युगात तंत्रज्ञान हस्तगत करण्याचा विलीनीकरण हाही एक प्रभावी मार्ग आहे. सिस्को या आघाडीच्या इंटरनेट हार्डवेअर बनवणाऱ्या कंपनीची आज मायक्रोसॉफ्टला मागे टाकण्याइतकी वाढ, नवीन तंत्रज्ञानावर आधारलेल्या कंपन्या हस्तगत करूनच झाली. या दृष्टीने भारतीय संगणक कंपन्यांची परकीय कंपन्या हस्तगत करण्यावरील निर्बंध उठवण्याची मागणी विचारात घेतली जावी.

६) मानवी भांडवल हा ज्ञानयुगातील अत्यंत महत्वाचा आर्थिक घटक आहे. आजच्या कामगारकपातीच्या धोरणामुळे मानवी भांडवलाची मोठ्या प्रमाणात झीज चालू आहे. यावर त्वरीत धोरणात्मक उपाययोजना आखण्यासाठी नुकत्याच नेमणूक झालेल्या दुसऱ्या श्रम आयोगाला भाग पाडावे. या आयोगाकडे केंद्र सरकारने कामगार कायद्यामध्ये दुरूस्त्या सुचवण्याचे काम दिले आहे. अशी शक्यता आहे की, कंत्राटी कामगारांना राजरोसपणे ठेवून घेण्यास परवानगी दिलीजाईल. यामुळे संघटीत क्षेत्रातील कामगारांवर बेकारीची गदा येऊन या कुशल कामगारांच्या कौशल्याचा ऱ्हास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या कौशल्याचे जतन करून त्यांच्या मानवी भांडवलाचा ज्ञाननिर्मितीच्या कामात वापर करण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

७) भारतातील कितीतरी ज्ञानसंपदा पारंपारिक स्वरूपाची व मौखिक परंपरेने चालत आलेली आहे. आदिवासी आणि ग्रामीण भागातील या ज्ञानसंपदेची लिखित स्वरूपाची नोंदणी करून त्याचे अधिकार समुदायांना मिळतील अशी व्यवस्था करणे. यासाठी आंतरराष्ट्रीय मंचावर सतत आवाज उठवून सध्या चालू असणाऱ्या पारंपारिक ज्ञानसंपदेच्या चोरीला आळा घालणे. यासंदर्भात डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या नेतृत्वाखाली सी.एस्.आय.आर. ने केलेले काम प्रशंसनीय आहे. हळद, बासमती यासारख्या प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय लवादात संघर्ष करून डॉ. माशेलकरांनी या प्रश्नांचे गांभीर्य आपल्या नजरेत आणून दिले आहे. या प्रश्नावर अधिक मोठ्या राष्ट्रीय प्रयत्नांची गरज आहे.

८) ठिकठिकाणी शेतीसंशोधन संस्था स्थापन करून त्या क्षेत्रातील संशोधनावर अधिक भर देण्याची मागणी केली जावी. या संस्थांमधील संशोधनाचा लाभ देशातील शेतकऱ्यांना करून देण्याची मोहीम युद्धपातळीवर हाती घ्यावी. जोपर्यंत येथील शेतकरी ज्ञानाधारित शेती करू लागत नाही तोवर खऱ्या अर्थाने भारताने ज्ञानयुगात प्रवेश केला असे म्हणता येणार नाही.

९) इंटरनेटच्या आगमनामुळे वित्तीय बाजारातील देवाणघेवाणीचा वेग खूपच वाढला आहे. यातील भांडवलाच्या एका देशातून दुसऱ्या देशात जाणाऱ्या प्रचंड प्रवाहामुळे ही समस्या आणखीनच बिकट झाली आहे. यामुळे बाजारात निर्माण होणाऱ्या अस्थिरतेचे धोके २-३ वर्षांखाली द. पूर्व आशियात झालेल्या वित्तीय संकटांमुळे उघड झाले आहेत. केवळ भांडवली गुंतवणूकीच्या बाबतीत रूपया पूर्णपणे परिवर्तनीय नसल्यामुळे या संकटातून भारताची सुटका झाली. तारापोर समितीने केलेली रूपयाच्या संपूर्ण परिवर्तनीयतेची कल्पना रद्द केल्याची घोषणा करण्यासाठी मागणी केली जावी.

**कॅनडातील जनआंदोलन**

आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजारातील धोक्याच्या प्रश्नांवर कॅनडामध्ये एक मोठे जनआंदोलन नुकतेच झाले. या मोहिमेला 'हॅलिफॅक्स इनिशिएटिव्ह' म्हणून ओळखले जाते. तेथील विचारवंत, कामगार चळवळी, सामाजिक संघटना या सगळ्यांनी या प्रश्नांवर जनजागृती करून वित्तीय भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहावर पाव टक्के कर लावण्याची मागणी केली. या करांना 'टॉबिन टॅक्स' म्हणतात. जेम्स टॉबिन या अर्थतज्ज्ञाने १९७२ साली या कराची कल्पना मांडली होती. कोणाला असे वाटणे शक्य आहे की, पाव टक्के कराने काय होणार. पण जगभरातील अब्जावधी डॉलर्सच्या भांडवली प्रवाहाचे मुख्य कारण विविध ठिकाणच्या वित्तीय बाजारात पाव टक्क्यांहून कितीतरी कमी असलेला फरक हे आहे. जरी यामुळे नफा कमी वाटत असला तरी अब्जावधी डॉलर्स एका दिवसात इकडून तिकडे खेळवल्यावर तो बराच मोठा असतो. यातूनच सट्टेबाजीला प्रोत्साहन मिळते आणि एखाद्या देशातून अचानक भांडवल निघून जाण्याची शक्यता वाढते. पाव टक्क्याचा कर लावल्याने जर का पाव टक्क्याहून अधिक फरक दोन ठिकाणच्या नाणेबाजारांमध्ये असेल तरच भांडवलाचे स्थलांतर आर्थिकदृष्ट्या आकर्षक ठरेल.

या उपायामुळे एकीकडे ८०-९० टक्के प्रमाणात सट्टेबाजीला आळा बसेलच पण त्याचबरोबर राष्ट्रीय सरकारांना महसुलाचे आणखी एक साधन मिळेल. तसेच पाव टक्का हे नाममात्र कराचे प्रमाण असल्याने सट्टेबाजीसाठी भांडवल न हलवता खरी दीर्घकालीन गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदाराला त्याचे ओझे वाटणार नाही. या उपाययोजनेमुळे जॉर्ज सोरॉससारख्या जागतिक सट्टेबाजांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होईल. म्हणूनच आंतरराष्ट्रीय नाणेबाजारातील सट्टेबाजांची एक प्रभावी लॉबी या कराच्या विरोधात आहे.

तरीदेखील इतक्या प्रभावी शक्तीशी टक्कर घेऊन कॅनडातील जनतेने तेथील संसदेला टॉबिन टॅक्ससंबंधी कायदा करण्यास भाग पाडले. याचे कारण म्हणजे एका राष्ट्रीय महत्वाच्या प्रश्नावर तेथील चळवळीच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी घडवून आणलेली प्रचंड जागृती. या प्रश्नावर लक्षावधी नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांची पत्रे त्यांच्या त्यांच्या मतदारसंघातील खासदारांकडे गेली आणि राजकीय नेतृत्वाला जनतेच्यानिर्धारापुढे तुकवण्याबाचून पर्याय राहीला नाही.

जगातील सर्वात बलाढ्य भांडवलदारांच्या शक्तीपुढे कॅनडातील जनतेने दिलेला हा लढा अविस्मरणीय आहे. या लढ्यात वापरले गेलेले सर्वात धारदार शस्त्र होते ते म्हणजे ज्ञान आणि त्याचा सार्वत्रिक प्रसार. त्यामुळे ही खऱ्या अर्थाने ज्ञानाधारित चळवळीची सुरुवात आहे असे म्हणायला हरकत नाही. ज्ञानयुगातील मक्तेदारीला यशस्वीपणे मात द्यायची असेल तर त्यासाठी ज्ञानाधारित चळवळींना पर्याय नाही.

पोथीनिष्ठ विचारसरणींना चिटकून न राहता आपल्या जुन्या तसेच नव्याने निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे जगातील बदलत्या तांत्रिक आणि आर्थिक वातावरणाच्या संदर्भात पाहण्यास आपण शिकलो तर आपल्याला या प्रश्नांवरील उपाययोजना आणि त्यासाठी लागणाऱ्या सामूहिक कृतीच्या विषयी नवी दृष्टी लाभू शकेल. प्रभावी ज्ञानाधारित चळवळींसाठी या दृष्टीचीच आज सर्वात जास्त आवश्यकता आहे.

आतापर्यंत आपण जी चर्चा केली ती सर्वांगीण आहे असा अजिबात दावा नाही. या सगळ्या प्रश्नांवर विचारमंथन सुरू व्हावा हा येथे उद्देश आहे.

ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत जो एक मुख्य फायदा आहे तो म्हणजे आपल्याला जगभरातल्या ज्ञानाचा साठा उपलब्ध आहे. ज्ञानाची काही ठळक वैशिष्ट्ये म्हणजे -

---

१) ज्ञानाचा कल पसरण्याकडे असतो. ज्ञानावर कितीही एकाधिकार ठेवले, कायदेकानून केले, विविध मार्गांनी ते गुप्त ठेवण्याचे प्रयत्न केले तरी ज्ञानाच्या अंगभूत गुणधर्माप्रमाणे ते कधी ना कधी, कसे ना कसे पसरल्याशिवाय राहत नाही.

२) एकच ज्ञान एकाच वेळी असंख्य जण असंख्य ठिकाणी वापरू शकता.

३) मानवी कौशल्य किंवा मानवी भांडवल निर्माण करण्यासाठी भरपूर खर्च येतो. तसेच माणसाच्या मृत्यूनंतर त्या माणसाला चिकटलेले कौशल्य नष्ट होते. तसाच कुशल माणूस तेवढाच खर्च आणि परिश्रम करून परत तयार करावा लागतो. ज्ञाननिर्मितीसाठी देखील भरमसाठ खर्च येतो. पण एकदा ज्ञान निर्माण झाले म्हणजे त्याच्या प्रती काढणे आणि त्याचे व्यापक प्रमाणावर जागतिक पातळीवर वितरण करणे सोपे आणि स्वस्त असते.

४) ज्ञानाला ज्ञान जोडत वाढत जाणारा एकूण ज्ञानाचा साठा मानवजातीकडे कायम राहतो. तो नष्ट होत नाही.

यातूनच मागासलेल्या देशांसाठी पुढील मुद्दे फायदेशीर ठरू शकतात

५) ज्ञानाचा हा तयार साठा वापरता आला तर प्रगत देशांप्रमाणे आपल्याला गमभन गिरवत बसायला नको. मागासलेले देश उद्या मारत त्यांना गाठू शकतात.

अर्थात हे सोपे नाही. कारण बडे देश आपल्यावर दबाव आणू शकतात, राज्यकर्त्यांना, नोकरशाहीला विकत घेऊ शकतात. नाकेबंदी करू शकतात. चुकीचे निर्णय घ्यायला लावू शकतात. मागासलेपणाबरोबर आपल्याकडच्या संस्था आणि कार्यपद्धतीदेखील मागासलेल्या आहेत. प्रगत जागतिक विचार आणि सिद्धांत आपल्या परिस्थितीला कसे लागू करावेत, मागण्या कोणत्या कराव्यात, आंदोलने कोणती करावीत ही देखील आव्हाने आहेत.

६) भारतासारख्या मागासलेल्या पण मोठ्या प्रमाणावर शेती करणाऱ्या आणि नैसर्गिक साधन संपन्नता असणाऱ्या देशाला आणखी एक फायदा आहे तो म्हणजे आपल्याकडे व्यापक प्रमाणावर छोटी-छोटी नवी उत्पादन तंत्रे आणि युक्त्या शोधता येतील. त्यासाठी खर्च देखील कमी येईल.

७) रोमरच्या मॉडेलप्रमाणे नवनिर्माणाचे खाजगी पेटंटनी संरक्षण करणे आवश्यक आहे. संशोधकास भरपूर मोबदला मिळणे आवश्यक आहे. हे अमेरिकेसारख्या अती प्रगत देशांना ठिक आहे. भारतात आपण सामूहिक पेटंटसारखी एखादी पद्धती विकसित करू शकतो. आपल्याकडे नवनिर्माण स्वस्त असणे, ते अधिकाधिक लोकांना उपलब्ध असणे आणि त्यातून व्यापक प्रमाणावर उत्पादकता वाढविणे हिताचे आहे.

('ज्ञानयुगाचे आव्हान' हे याच विषयावरील पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर.)

**श्री. अनिल शाळीग्राम**
सायबरस्केप मल्टिमिडीयात मराठी विशेषज्ञ,
शाळीग्राम निवास, सुभाष रोड, ठाणे (प.)-४००६०२

**श्री. प्रशांत देशपांडे**
केमिकल इंजिनियर,
मानव संसाधन विकास विषयाचे विद्यार्थी,
डी-१४/१०१, लोकनगरी, एम्.आय.डी.सी. रोड,
अंबरनाथ (पू.), जि. ठाणे

***

# मानसी तुझ्यासाठी....

श्री. संजय ल. बोरकर

*दूरदर्शनचा प्रभाव हा नवा विषय नाही. माणसामाणसात दुरावा निर्माण करणारे हे माध्यम . या विषयावर ही एक वेगळी पारितोषिक प्राप्त एकांकिका - संपादक*

पात्र :-मानसी, बाई, आई, सौ. वासंती गोखले, हेडमिस्ट्रस, आजी, डॉक्टर

-: प्रवेश पहिला :-

*(रंगमंचाची एक बाजू उजळते. तिथे एका मध्यमवर्गीय घराचा दिवाणखाना. एका बाजूला दिवाण, समोर टी. व्ही. आहे. एका बाजूला फोन, स्वयंपाकघराचा दरवाजा, दुसऱ्या बाजूला प्रवेशद्वार. टी. व्ही. चालू आहे. एक १२ ते १३ वर्षीय मुलगी टी. व्ही. बघण्यात गुंग झाली आहे. ती प्रचंड घाबरलीय. टी. व्ही. वर कुठला तरी हॉरर शो चालू आहे, त्यामुळे पार्श्वसंगीत सुद्धा भयानक. इतक्यात एक विचित्र बाई मागून येते आणि मुलीला घाबरवते आणि जोरात ओरडते.)*

**मानसी** : काय हो बाई, केवढ्यांदा घाबरले मी. (चिडून)

**बाई** : बघा बघा पोरीची गंमत, (हसत) केवढा घाम फुटलाय आन म्हने मी डेंजर प्रोग्राम बघते... हात तुझी...

**मानसी** : (सावरत) घाबरले म्हणजे दचकले. मी काय डरपोक नाहीये. किती पण हॉरर असेल तरी मी बघू शकते, माहितीये.

**बाई** : (सगळा पसारा आवरत) बरं बरं, आता त्यो टी.व्ही. बंद कर आन खाऊन घे काय तरी आन दूध पन पी चल. शाळेतन आल्यापसन टी. व्ही. पुढं बसलीय नीसती. अभ्यास नाय काय, आन कायले हारर का टेरर शो बघतेय. आन काय ग त्या कयेबलवर हये येवढे सतराशे साठ प्रोग्राम असतात आन तू काय त्ये भुता खेताच लावून बसत्ये ग? कोणाचं ना धड ना मुंडक नायतर कोन म्येनासारखं इतालतय भ्यापेक्षा घानच जास्ती वाटतीय. अशी कंदी असत्यात भुत. (आत जाते)

**मानसी** : मंग कशी असत्यात तुमची भुत? (चिडवत) तुम्ही कधी पाहिलीयेत?

**बाई** : (झाडू आणते केर काढते) मंग किती तरी येला. भुतच काय भुतांची आख्खी जत्राच बघितलीपिं. आमच्या गावच्या माळावर कितीतरी येळा येताळाची जत्रा पाहिलीया.

**मानसी** : येताळ म्हणजे? (बाईच्या मागेमागे)

**बाई** : येताळ, येताळ म्हंजी भुतांचा राजा असतुया. त्या येकदम पॉवरफुल आन त्याची पालखीतून मिरवणूक बी काढल्याती भुतं. जखीनी दर अमुशेलाही जंगी जत्रा असतीया.

**मानसी** : जत्रा म्हणजे फन फॅन फेअर? भुतांच पण?

**बाई** : त्ये फन का विन म्हायत नायत, पन फेर धरून नाचतात त्याच्या भवती. समधी भुतं, येका हातात पलीते आन येका हातात खोपड्या आन पाय उलटे.

**मानसी** : बापरे तुम्ही हे सगळं पाहिलेत!

**बाई** : म्याच काय माझ्या बान, आज्यानं, पंज्यान, समद्या गावानं बघीतलया

**मानसी** : तुम्ही जवळून बघितलय काहो भुत? म्हणजे कशी दिसतात ती.

**बाई** : येकदा जवळून न्हाय पन जराशा लांबून बघितलया. आमच्या शेजारच्या इरीत येका बाईनं जीव दिला व्हता. आन मग दर अमोशेला येवून बसायची हिरीच्या कट्ट्यावर. येकदा रात्री अवाज आला म्हणून बाहेर येवून बघितल तर...

**मानसी** : मग कोण होतं?

**बाई** : बघत्ये तर ही बया... कट्ट्यावर बसून येनी फनी करत हुती. कशी म्हायतीये का?

**मानसी** : कशी?

**बाई** : सोताच मुंडक मांडीवर काढून ठेवल होत आन केस इंचरत व्हती. आन गान म्हणत व्हती. 'याग सयांनो' करा गं माझी येनी फनी'.

**मानसी** : मंग.

**बाई** : मंग तीचं माझ्याकडे लक्ष ग्येल. डोले वटारून मला म्हनाली, काय सखू कशी हायस?

**मानसी** : मग?

**बाई** : मी म्हनलं, बेस हाय.

**मानसी** : मग?

**बाई** : मी तिथच थंडगार पडलीया.

**मानसी** : मग?

**बाई** : (डोक्यावर हात मारून) मंग काय? उठले तेंव्हा मी हातरूनात तापान फनफनत पडली व्हते आन आये न बा शेजारी रडत व्हते. कळलं.

**मानसी** : बाई तुमच्याकडे त्यावेळी कॅमेरा पाहिजे होता म्हणजे तुम्हाला तिचा फोटो काढता आला असता.

**बाई** : (उठत) ध्या जित माझं मला सावरेना तिथ फोटु कसला काढतीया. चला बाई लय लेट झालाया. तुझी आये का नाही आली अजून? (आत जाते) (फोन वाजतो)मानसी उचलते...

**मानसी** : हॅलो हॅलो कोण बोलतय? ...बाबा कसे आहात तुम्ही? आणि तुम्ही काल येणार होतात न... हॅलो मोठ्यानं बोला नीट ऐकू येत नाहीये... नाही, आई आली नाही... अजून... तुमची खूप आठवण येते बाबा मला... तुम्ही मागच्या आठवड्यात येणार होतात ना?... मग मग?... मला नाही आवडत हे नवीन घर, खूप बोअर होत... आई मला आपल्या मोठ्या घरी पण नाही नेत. आजी आजोबांकडे...म्हणते इतकी वर्षे तिथेच रहात होतो ना... आता कस जायच सारख सारख तिकडे... मला आजी आजोबांची खूप आठवण येते. (रडकुंडीला येत) बाबा तुम्ही सांगाना तिला.

(आई लॅच कीने दरवाजा उघडून आत येते)

**आई** : कोणाचा आहे ग फोन? (मानसीच्या हातून फोन घेत)

**मानसी** : (रडत) मला बोलायचय. मला बाबांशी बोलायचय.

**आई** : गप्प बस की जरा... हॅलो हं बोला... नाही आत्ताच आले. काल करणार होतात ना फोन?... अच्छा लेकीची आठवण आली... हो... हो बरी आहे... सारखी त्या टी. व्ही समोर बसलेली असते... नाही अभ्यास अजून तरी चांगला आहे. या युनिट टेस्टला सेकंड रँक आहे फस्ट अगदी थोडक्यात गेला. हो हो तुम्ही तुमची काळजी घ्या... हॅलो तो फ्लॅटच्या इंस्टॉलमेंटचा चेक येणार आहे ६ तारखेला लक्षात आहे ना... अहो पण रोज रोज कुठे नेणार तिला त्या... त्या घरी... हॅलो... हॅलो... मोठ्याने बोला... हॅलो... शी कट झाला (फोन ठेवते) काय ग तुला काय रडायला झालं आणि काही अभ्यास वगैरे नाही का. वगाव

तेव्हा नुसतं त्या टी. व्ही. समोर बसलेली असतेस. बंद कर बघू आधी तो...

*(काही बोलत नाही. मान खाली घालून बसते. आईच वैतागून टी.व्ही. बंद करते. मानसी नख कुरतडत बसलीय.)*

**आई** : अग मानसी काय झालयं तुला. तू एक तर ह्या टी.व्ही. समोर बसलेली असतेस नाहीतर ही अशी मान खाली घालून बसतेस. What is your problem? मानसी ते नख कुरतडण बंद कर आधी.

**मानसी** : (रडत) आई मला कंटाळा येतो ग इथे. या घरी मला नाही आवडत. आपण आपल्या मोठ्या घरी जाऊ या ना... आजी आजोबांकडे (आईजवळ जात)

**आई** : झालं पुन्हा तुझं सुरू. हे बघ मानसी तुला एकदा मी सांगितल ना की... (बोलत नाही)

**मानसी** : निदान शनिवार रविवार तरी जाऊयाना. (आई उठून जाते) माझी शाळा सुटल्यावर. मला आजी आजोबांची खूप आठवण येते. तिथे किती किती मजा यायची. सकाळी आजी मला उठवायची. मला दूध, आंघोळ. सगळं ती करायची... जेवण करायची, भरवायची... मग आजोबा मला तयार करून शाळेत न्यायचे परत घ्यायला तेच यायचे ... शाळेतून येतांना मजा असायची माझी... भेळ... चणे घ्यायचे आजोबा माझ्यासाठी... घरी आल्यावर आजी मला फ्रेश करायची. संध्याकाळी तिने केलेला गरमा गरम नाश्ता... मग मी बाहेर खेळायचे बाहेर पळायचे... तिथे माझ्याबरोबर खेळायला किती मुलंमुली असायची. कोमल, पिंकी, ऐश्वर्या, विभव, स्नेहा, चंदू किती धमाल असायची. पुन्हा मग संध्याकाळी आजी बरोबर दिव्या दिव्या दिपत्कार म्हणायचे. मग तू ऑफिसमधून आल्यावर माझा होमवर्क घ्यायचीस. नीट लिहून आणला नसला की ओरडायची सुद्धा... मग आजोबा मध्ये पडायचे... मग रात्री आजी मला जेवण भरवायची आणि मग आजीच्या नाहीतर तुझ्या कुशीत झोपायची. कधीकधी बाबा कामाच्या गावाहून आले की की तर किती किती मजा असायची. त्या दिवशी माझं सगळं तेच करायचे. सकाळी उठवण्यापासून ते नाश्ता, शाळा, संध्याकाळी आपण सगळे तू, मी, बाबा फिरायला जायचो. खूप खूप मजा यायची. मला आठवण येते सगळ्यांची... आई मला आठवण येते सगळ्यांची. आजी, आजोबा, काकू, काका, कोमल, ऐश्वर्या, विभव, स्नेहा, चंदू, सगळे... सगळ्यांची आठवण येते... (रडत रडत हळूहळू झोपते. अंधार पडलाय, फक्त खिडकीतून आत येणारा प्रकाश एवढच. रातकीड्यांचा आवाज. मानसीला झोपेत काही आठवते, घुमणारा आवाज)

**आजोबा** : मानसी चल बघू आता घरात. अंधार बघ किती पडलाय ते... लवकर नाही आलीस तर बागुल बुवा येऊन तुला घेऊन जाईल. चला चला चला...

**मानसी** : बागुल बुवा म्हणजे हो काय आजोबा?

**आजोबा** : हा एवढा माझ्यापेक्षा ही मोठा असतो आणि अंधारात जी मुलं खेळत असतात त्यांना मोठ्या पिशवीत भरून घेऊन जातो.

**मानसी** : काही हरकत नाही. तो आला तर मी तुम्हाला हाक मारीन, आजोबा... आजोबा... आजोबा... *(आवाज घुमतोय मानसी रडत रडत उठते. ती आजोबा... आजोबा करते आहे. बरीच रात्र झालीय. आई शेजारी झोपली आहे. मानसी टी. व्ही. चालू करून पुन्हा पुन्हा टी. व्ही. वर हॉरर शो लावते... बघण्यात गुंग होते. घाबरली आहे तरी पण बघते आणि मग हिप्नॉटीक झाल्यासारखी टी. व्ही. कडे खेचली जाते आणि टी. व्ही. च्या स्क्रीनसमोर अगदी समोर जाऊन बसते. भयानक संगीत चालू आहे आणि अचानक टी. व्ही. च्या स्क्रीनमधून दोन रक्तबंबाळ हात बाहेर येतात आणि मानसीचा गळा पकडतात. मानसी जोरात किंचाळते... प्रवेश संपतो.)*

जे गैरहजर असतात ते नेहमीच चुकत असतात.

-: प्रवेश दुसरा :-

*(मानसी शाळेच्या वर्गात बसलीय. मुलंमुली गप्पा मारत आहेत. विषय टी. व्ही. वरचा कालचा कार्यक्रम शिक्षिका येतात. मुलं शांत बसतात.)*

**गोखले** : मुलांनो आज काय शिकवणार म्हणून मी सांगीतलं होतं?

**मुलं** : बाई, कविता... व

**मुलं** : बाई, गवताचं फूल.

**गोखले** : हो... हो... चला, पान शहात्तर काढा पाहू... कवितेचं नाव आहे गवताचं फूल... तुम्हाला कोणकोणती फुलं माहितेयत? नावं सांगा बघू.

**मुलगी १)** : गुलाब

**मुलगी २)** : ....

**मुलगा ३)** : चंपा

**मुलगी ४)** : चमेली

**मुलगी ५)** : मोगरा

**मुलगा ६)**: कमळ

**गोखले** : ठीक आहे. बस... बस... पण तुम्हाला गवताचं फूल माहितीयेका? बघीतलय कधी गवताचं फूल?

**मुलं** : नाही... नाही... (गलका)

**गोखले** : बर मग आता ऐका, कसं असतं गवताचं फुल. ते कसं फुलतं,नाचतं, खेळतं. (कविता सुरू करत.)

साजिरे गोजीरे गवताचे फूल
इवल्याश्या झुळकीवर नाचणारे मूल

*(बाईंची कविता सुरू आहे. मुलं गुंग होतात, मात्र मानसीवर प्रकाश केंद्रित होतो आणि तिला भोवताली भुतं असल्याचा भास होतो. ती घाबरून किंचाळायला, शेजारच्या मुलामुलींना मारायला सुरूवात करते. सौ. गोखले मानसीला सावरायचा प्रयत्न करतात. प्यूनला हाका मारतात. मानसी बेभान झालीये. प्रवेश दुसरा संपतो.)*

-: प्रवेश तिसरा :-

*(पुन्हा शाळेचाच वर्ग. मानसी आणि तिची आई आलीये बरोबर ती सौ. गोखलेंशी बोलतेय.)*

**आई** : नमस्कार गोखले बाई.

**गोखले** : अरे मानसीच्या आई? कशी आहे आमची मानसी आता?

**आई** : हो. आता ठीक आहे ती. मी म्हटलं आपणच सोडायला जावं आज.

**गोखले** : डॉक्टरांना दाखवलत का तिला? काय म्हणाले ते?

**आई** : हो आमच्या फॅमिली डॉक्टरांना दाखवलं. ते म्हणाले, सारखा टी. व्ही. बघून झालय आणि त्या रात्री तिने टी. व्ही वर कुठला तरी हॉरर प्रोग्राम पाहिला होता उशिरा पर्यंत आणि जागरण झाल्यामुळे मानसिक ताण पडला असावा तिच्यावर.

**गोखले** : मग डॉक्टरांनी काही उपचार केले का?

**आई** : उपचार म्हणजे काय?... गोळ्या लिहून दिल्यात त्यांनी. आता ठीक आहे ती... मी तुमची खूप आभारी आहे.

**गोखले** : कशासाठी?

**आई** : अहो त्या दिवशी तुम्ही सगळ्यांनी जी धावपळ केलीत... डॉक्टरांना बोलवलत... मला ऑफिसमध्ये लगेचच कळवलत... खँच आभारी आहे मी तुमची.

**गोखले** : छे हो आभार कसले त्यात? कर्तव्यच आहे ते

आमचं. वर तुम्ही मानसीच्या बाबांना कळवलत का?

**आई** : हो. जमलं तर येणारेत पुढच्या आठवड्यात.

**गोखले** : हे बघा मानसीच्या आई एक शिक्षिका म्हणून मी माझ्या विद्यार्थिनींसाठी काय वाटेल ती आणि वाटेल तेवढी मदत करायला तयार आहेच. पण त्याही पुढे जाऊन एक माणूस म्हणून तुमची एक शुभचिंतक म्हणून काही मदत लागली तर हक्कानं कळवा. केंव्हाही आणि कधीही हवं तर एक मैत्रिण समजून (आईच्या खांद्यावर थोपटतात).

**आई** : थँक्यू... बरय मी आता निघते. नंतर पालक सभेत भेटूच. (आई जाते. सौ. गोखले मुलांकडे वळून)

**गोखले** : बरं आज आपल्याला निबंध लिहायचाय बरं का?

**मुलं** : कोणता बाई?

**मुलं** : कुठल्या विषयावर बाई? (गलका)

**गोखले** : हो हो हो सांगते. तुमच्या आवडीचा विषय आहे बर का.

**मुलं** : आवडीचा?

**मुलं** : कोणता बाई?

**मुलं** : बाई कोणता?

**गोखले** : मला परी भेटली तर? सांगा काय कराल? तुम्हाला परी भेटली तर? काय मागाल परी राणीकडे? (मुलांचा गलका)

**१)मुलगा:** खूप खूप खेळणी

**२)मुलगी:** चॉकलेट

३) : मोठी बार्बी डॉल

४) : कॉमिक्स

५) : मी पंख मागेन राणीकडे

*(मुलांचे आवाज चालू आहेत. हळूहळू प्रकाश कमी होतो. रंगमंचाची एक बाजू उजळते गोखले निबंधांच्या वह्या तपासत आहेत. एक एक करून बाजूला वह्यांचा गठ्ठा)*

**गोखले** : हं कोण मानसी देशपांडे... मानसी काय मागतेय परीराणीकडे? (वही उघडून वाचतायत. वाचण्याला सुरुवात करतात. मानसीचा रेकॉर्डेड आवाज ऐकू येतो)

**मानसी** : मला परीराणी भेटली तर - मला परी भेटली तर ना मी तिच्याकडे मोठी धारदार, टोकदार लांब नखं मागेन. सुरीसारखी लांब आणि मग माझ्या धारदार नखांनी माझ्या शेजारी चिन्मय बसतो ना त्याला ओरबाडीन. खूप त्रास देतो मला... रिक्षात अमेय, जान्हवी असतात ना त्यांच्या गालावर नखाने ओरबाडीन. परीराणीकडून एक ३ डोक्यांची बाई आणि लांब सुरी मागून घेईन आणि तिला सांगेन, शेजारच्या टॉमी कुत्र्याचं पोट फाडून टाक म्हणजे रोज रोज माझ्या अंगावर भुंकणार नाही तो. त्या दिवशी माझ्या अंगावर धावून आला टॉमी. मी एकटी खेळत होते तेंव्हा. केवढी घाबरले मी. पण आता नाही घाबरणार मी. मी तिला सांगेन, जे मला त्रास देतील ना... मला घाबरवतील ना... त्यांच मुंडकं तू कापून टाक... म्हणजे सगळे बिन मुंडक्याचे फिरतील. आता जे मला मारतील ना, मला ओरडतील ना, त्यांना ना कापून टाकणार. माझ्या लांब लांब धारदार नखांनी कापून टाकणार. फक्त आजी आजोबांना नाही मारायचं. बाबांना फक्त मी लांब नखांनी घाबरवेन, म्हणजे ते कामाच्या गावाहून घरी येतील. आजकाल आई मला ओरडायला लागली आहे. (चिडून) आणि त्या दिवशी तिने मला मारलं पण. (टिचर घाबरून पटकन वही बंद करतात)

*(त्यावेळी रंगमंचाची दुसरी बाजू उजळते. टीचरवरील प्रकाश जातो.)*

---

आयुष्यातले परमोच्च आनंदाचे आणि प्रचंड कर्तबगारीचे दिवस तारुण्यातच असतात.

*(मानसी दचकून जागी झालीय. तिला कसले तरी भास होतायत. विचित्र आकृती तिच्या भोवती नाचतायत. तिचं किंचाळणं सुरू होतं. आई उठते.)*

**आई** : मानसी... मानसी... अग बेटा काय झालं? काय झालं?

**मानसी** : (आईला चिकटते) आई... आई... ते बघ.. ते बघ.. सगळे आले. बघ.. बघ.. बघ.. त्यांच्या हातात केवढे लांब लांब सुरे आहेत. बघ त्यांनी त्या बाईला पकडलं बघ.. बघ.. त्यांनी तिच्या मानेत सुरी खुपसली. आई ती.. ती.. मेली बघ. आई... स्ट्रॉनं रक्त पितायत बघ सगळे. आई... ते माझ्याकडे बघतायत आई.

**आई** : अगं असं काय करतेस राणी. कोणी नाहीये तिथे. हे बघ सगळं स्वप्न होतं. खोटं होतं सगळं. हे बघ घाबरायचं नाही. मी आहे - मी आहे ना तुझ्याबरोबर घाबरायचं नाही हं राणी. पाणी पी, पाणी पी आधी (पाणी देते). शांत हो, शांत हो. हे बघ मी बाबांना फोन केलाय. आज ते म्हणाले, 'मी येणार आहे या विक मधे, माझ्या मानसीला भेटायला, झोप बघू आता शांतपणे'. (आई मानसीला जवळ घेऊन रडू लागते.)

(प्रवेश चौथा संपतो.)

-: प्रवेश पाचवा :-

*(शाळेचे कार्यालय मुख्याध्यापिका, सौ. गोखले, मानसीच्या आई, आजी)*

**मुख्याद्यापिका** : Now its too much मानसीच्या आई आता आमच्या हाताबाहेर जात चाललय. आधी मानसीमुळे फक्त वर्गच डिस्टर्ब व्हायचा पण आता तर अख्खी शाळाच डोक्यावर घ्यायला लागली आहे. आणि आता त्याहीपेक्षा आम्हाला काळजी आहे ती तिच्याबरोबरच्या इतर विद्यार्थ्यांची. अहो ती कधीही बेभान होते आणि शेजारच्या मुलामुलींना मारायला लागते.

**गोखले** : अहो तिच्या जवळच्या मैत्रिणीसुद्धा तिच्या शेजारी बसायलाच काय पण बोलायला सुद्धा धजत नाहीत. तिच्याही वर्गात तिला सगळे हसतात. तिची चेष्टा करतात. ती दिवसेंदिवस एकटी पडत चाललीय एकलकोंडी होत चाललीय आणि हे तिच्यासाठी फार घातक आहे.

**मुख्याद्यापिका** : आणि इतर पालकांकडून काहीतरी अॅक्शन घ्या, असं प्रेशर येतय आमच्यावर. कितीतरी पालकांनी तक्रारी केल्यात आमच्याकडे.

**आजी** : मॅडम अजून काही दिवस सांभाळून घ्या. आम्ही ट्रीटमेंट देतच आहोत.

**मुख्याद्यापिका** : अहो सांभाळून तर आम्ही घेतोच आहोत. एवढंच काय पण आमच्याकडून तिच्या बाबतीत तिचे होमवर्क, तिची बुडलेली परीक्षा याबाबतीत जे काही सहकार्य देता येईल तेवढं देऊच. पण आता...

**आई** : हो. आता आम्ही डॉक्टरसुद्धा बदलतोय.

**मुख्याद्यापिका** : अहो डॉक्टर नको ट्रिटमेंट बदला.

**गोखले** : म्हणजे त्यांना म्हणायचय की मानसीला मानसोपचाराची गरज आहे. हे बघा आम्हाला वाटतं तुम्ही तिला बाल मानसोपचार तज्ञ डॉक्टरांकडे न्यायला हवय.

**आजी** : (चिडून) म्हणजे तुम्हाला काय म्हणायचय? ती वेडी आहे? गोखले टिचर, तुम्ही तुमच्या फर्स्ट रँकच्या विद्यार्थिनीला... तुम्ही वेडी म्हणताय? अहो ती काय वेडी नाहीये हो. अहो तिला फक्त...

**मुख्याद्यापिका** : हे बघा मानसीच्या आजी, नीट समजून घ्या. मानसोपचार तज्ञांना भेटा याचा अर्थ वेडी आहे असं म्हटलं नाही. पण या वयात मुलामुलींची मानसिक स्थिती फार संवेदनक्षम असते. नाजूक असते.

**गोखले** : त्यामुळे या वयात मुलं जे बरं वाईट बघतात, ऐकतात त्याचे त्यांच्या नकळत त्यांच्या मनावरती खोलवर

परिणाम होतात. एखादी लहान सहान घटनासुद्धा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम करून जाते.

**मुख्याध्यापिका :** आणि त्यावर ते कुणाकडे बोलू शकत नाहीत. त्यावर ते आतल्या आत रिॲक्ट होत असतात आणि मग त्या रिॲक्ट होण्याला बाह्यरूप मिळू लागतं आणि मग तेव्हा ते असं वागू लागतात. तेंव्हा प्लीज...

(हळूहळू अंधार होत प्रवेश पाचवा संपतो)

-: प्रवेश सहावा :-

*(मानसोपचार तज्ज्ञांची कन्सल्टींग रूम)*

**आई** : डॉक्टर ती जे सर्व काही सांगतेय ते सर्व हॉरर मालिका. T.V. वर चालू आहेत त्यांच्या काही बघितलेल्या भागांच्या कथा आहेत हो.

**डॉक्टर** : हे बघा मी मानसीच्या आतापर्यंत मी घेतलेल्या टेस्ट वा तिचं मी जे कौंसिलींग केलय त्यावरून तरी मी तुम्हाला ठामपणे सांगू शकतो की हे फक्त टी.व्ही. मुळेच झालेलं नाही. त्यामागे आणखीही बरीच कारणं असू शकतील किंवा आहेत असंच मी म्हणेन.

**आजी** : कारणं... म्हणजे कोणती कारणं.

**डॉक्टर** : म्हणजे बघा की मानसी आता आपल्याला जे काही सांगते किंवा तिला जे काही सर्व भास होतायत यातील बरचसं टी.व्ही. वर पाहिलयं आणि बाकी तिचं इमॅजिनरी काल्पनिक चित्रण आहे. त्याचा तिच्या मनाला प्रचंड छंद लागलेला आहे.

**आजी** : इतक्या भयानक आणि विचित्र कल्पना करण्याचा छंद? डॉक्टर, पण या वयात मुलांचं मनोराज्य किती छान आणि सुंदर असतं. राजा, राणी, पऱ्या अद्‌भूत आणि रम्य गोष्टी, फुलं, पशू, पक्षी यांच्यात रमणारं, फुलपाखरासारखं मन असतं त्यांच.

**आई** : आणि हे सर्व सोडून माझ्या मुलीच्या मनात मात्र भूत-प्रेत बिनमुंडक्यांची माणसं काय आणि लांब सुऱ्यांची नखं असलेली बाई काय? सगळच रक्त रंजीत. How is it possible?

**आजी** : कसं शक्य हे डॉक्टर?

**डॉक्टर** : काय आहे माहितीयेका मानसीच्या आई मुलं त्यांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टींवर एक दहा-बारा ओळींचा निबंध लिहितात वा त्याचं मेमरी ड्रॉइंग काढतात. जे मुलं अगदी छानपणे रंगवतात वा बोलून त्यांच्या भावनांना ते वाट करून देतात. आपल्याकडे तसंच अहो अनेक शंका- कुशंका, प्रश्न त्यांच्या मनात असतात. आपण त्यांच्या सगळ्याच प्रश्नांच, शंकांच निरसन करू शकतो? नाही आणि मग असे अनेक अनुत्तरित प्रश्न त्यांच्या मनात घर करून राहतात.क्षणाक्षणाला त्यांना ते भेडसावत रहातात आणि मग त्यांचे हे अनुत्तरित प्रश्न त्यांच्या वयोमानानुसार होणाऱ्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या आड येऊ लागतात.

**आजी** : डॉक्टर पण एवढे कुठले प्रश्न असतात की जे त्यांच्या व्यक्तीमत्त्व विकासाच्या आड येतात.

**डॉक्टर** : अनेक प्रश्न आहेत. जसं घरातील जवळच्या प्रिय व्यक्तीचा मृत्यू. आई वडीलांचं विभाजन हां आणि एकत्र कुटुंबाच्या विभाजनामुळे होऊ शकतो. एका मोठ्या नाते समूहातून त्यांना बाजूला केलत तरी होतं असं. (आई, आजी एकमेकींकडे बघतात.)

**आजी** : आत्ता तुम्ही जे म्हणालात डॉक्टर, एकत्र कुटुंबाच विभाजन...

**डॉक्टर** : हां हां... त्याचं काय?

**आजी** : (आजी आईकडे बघतात) म्हणजे काय डॉक्टर की आमचं सुद्धा एकत्र कुटुंब होतं. मी, आमचे हे, माझी दोन मुलं, सुना, नातवंड असे सगळेच एकत्र राहायचो. पण काही महिन्यांपूर्वीच...

आई : काही कौटुंबिक कारणांमुळे आम्ही वेगळे झालो. गिरगावातून इथे ठाण्याला शिफ्ट झालो.

डॉक्टर : अहो पण तुम्ही दोघेही तुमच्या नोकरीत अडकले असतांना तिच्याकडे कोण बघणार? याचा विचार नाही केलात तुम्ही वेगळे होण्यापूर्वी? मग काय केलत? तुम्ही तिला पाळणाघरात ठेवलत का?

आई : छे हो पाळणाघरांचा भरवसा कुठे राहीलाय आज काल. पैशांसाठी ढीगभर मुलं सांभाळायला घेतात आणि एकाकडे धड लक्ष देत नाहीत. तुम्ही, तुम्ही ते पाळणाघरात एका लहान मुलाने प्लास्टीकचा चेंडू गिळल्याचे ऐकलत ना? बाईगं...

डॉक्टर : अहो पण...

आजी : मग आम्ही एक बाईच ठेवली तिला सांभाळायला. आमच्या नातेवाईकांच्या ओळखीतलीच आहे ती. म्हटलं मानसीलाही सांभाळेल आणि घरही सांभाळेल यांच्या मागे.

आई : आणि यानंतर सुद्धा मानसीचं जुन्या घरी जाऊया.. जुन्या घरी जाऊया.. असं रडणं चालूच होतं.

डॉक्टर : अहो मग यावरून तुम्हाला समजायला हवं होतं.

आई : काय? म्हणजे आम्ही नाही समजलो.

डॉक्टर : तुम्हाला माहितीय, लहान मुलांमध्ये विशेषत: मुलींमध्ये साधारण बारा ते तेरा वर्षांपासून जो नैसर्गिक बदल होत असतो त्या कालावधीत त्यांची मानसिक स्थिती फार नाजूक असते. त्या कालावधीत खरंतर मुलींकडे विशेष लक्ष पुरविण्याची गरज असते. आणि दुर्दैवाने मानसीच्या दैनंदिन जीवनात एवढा मोठा बदल झाला, तोही याच काळजीवाहू कालावधीत त्यामुळे एवढा मोठा बदल ती ॲडजेस्ट करू शकली नाही. त्यातून तिच्यावर लादलं गेलेलं हे एकटेपण की ज्यामुळे हे सर्व कुणाकडे व्यक्त करू शकली नाही. आतल्या आत कुढत राहिली.

आई : पण डॉक्टर माझ्याने होईल तेव्हा होईल तेवढं लक्ष पुरवतच होते हो.

डॉक्टर : तुमच्यानं होईल तेव्हा, तिला हवं होते तेव्हा नव्हे. मानसीच्या आई तिच्या तशा अवस्थेत तिच्या समोर होता तो फक्त टी.व्ही. जो दिवसाचे २४ तास तिच्याशी बोलायचा. त्याच्या असंख्य चॅनलस्च्या पोतडीतून अनेक गोष्टी तिला दाखवायचा आणि दुर्दैवाने आपल्या मानसीला त्याच्या पोतडीतील हॉरर शो ही गोष्ट आवडली.

आजी : पण डॉक्टर?

डॉक्टर : हा.. हा.. आता हॉरर शोच का? कार्टून नेटवर्क का नाही? तर हा योगायोग झाला, कारण आमच्याकडे असे काही पालक येतात की ज्यांची तक्रार असते की त्यांची मुलं फक्त कार्टून नेटवर्कच बघतात, अभ्यासच करत नाहीत.

आजी : पण डॉक्टर आमची मानसी तर एवढी भित्री आहे की तिला हॉरर शो आवडू शकतो यावर आमचा विश्वासच बसत नाहीये. आणि वर तो कार्यक्रम पुन्हा पुन्हा बघते हे सगळं म्हणजे... (अविश्वासाने)

डॉक्टर : काय माहितीयेका, मुलांचं वर्गात किंवा कुठेही जे कॉमन संभाषण होतं त्यात ते अनेक गोष्टींवर बोलतात आणि त्यात आपण मागे पडू नये म्हणून मग भीती वाटत असली तरी ते कार्यक्रम पाहिले जातात. भीती वाटल्यामुळे ते पुन्हा पुन्हा बघतात. म्हणजे त्यावेळी त्यांना त्याप्रकारची भीती ही वाटतच असते. पण ती भीती ते एंजॉय करतात आणि असं एंजॉय करण्याची त्यांना सवय होते. ते ॲडीक्ट होतात त्या भीती वाटण्याचे...

आई : तुम्ही काय म्हणताय ते मला काही कळत नाहीये. डॉक्टर भीतीचा छंद? सवय? ॲडीक्ट? नीट काय ते सांगा.

**डॉक्टर** : आता अगदी सोप्या भाषेत सांगायचं झालं तर आपण जाएंट व्हीलमध्ये बसतो. जाएंट व्हील जसं जसं वरती जातं तसं तशी आपल्याला प्रचंड भीती वाटते मग भीतीने पोटात गोळा येतो. हात, पाय थंड पडतात. आपण खाली पडतो की काय असं वाटतं. म्हणून मग आपण किंचाळून शेजारच्याला घट्ट पकडतो. पण नंतर मग जसं जसे खाली येतो तस तशी वाटणारी भीती हळूहळू निघून जाते. पोटातला गोळाही गायब होतो. आणि आपण हसायला लागतो, एखाद्या लहान मुलासारखे. मग आणखी एक राऊंड, आणखी एक राऊंड असं करत आपण आपल्यालाच वाटणाऱ्या भीतीची आपण मजा घेऊ लागतो. ती एंजॉय करू लागतो. अगदी असाच प्रकार आहे हा. आपल्याला हे मानसीचं जाएंट व्हील आता थांबवायचंय. अर्थात लगेचच थांबणार नाही ते. वेळ लागेल त्याला. त्यासाठी आपण आपला वेळ आणि आपलं मानसिक बळ तिला द्यायला हवं. तरच या चक्रातून आपण तिला सुखरूपपणे उतरवू शकू.

**आजी** : म्हणजे नक्की काय करायचं आम्ही, डॉक्टर.

**डॉक्टर** : तुम्ही, मानसीच्या आई व तिचे आजोबा, तिच्या मित्र मैत्रिणी, शाळेतले शिक्षक, तिच्या सर्व प्रकारच्या नाते समूहाने जो तिच्या जीवनाशी निगडित आहे त्यांनी सर्वांनी आपला सहवास तिला द्यायला हवा. तिच्याशी बोलायला हवं, खेळायला हवं. तिच्या मनातल्या असंख्य झऱ्यांना वाट करून द्यायला हवी, त्यांना वळण द्यायला हवं. अहो टी. व्ही. वरचा हॉरर शो म्हणजे कावळा बसायला आणि फांदी तुटायला.. तसं एक निमित्त होतं. तुमची कौटुंबिक अडचण काय आहे हे मला माहीत नाही, पण तुमच्या कोणत्याही कौटुंबिक अडचणीपेक्षा तुमच्या मानसीचं सुदृढ आयुष्य मला अधिक महत्वाचं वाटतं. तेव्हा तुम्ही...

**आई** : यस डॉक्टर. मला आमची चूक कळलीय. मी आमच्या वंशवेलीवरचं फुल तोडून आम्हा तिघांच्या आयुष्याची फुलदाणी सजवायला गेलो. पण ती त्या फुलदाणीतच कोमेजून गेली. कोमेजून गेली माझी छोटीशी कळी... (रडू लागते)

**सासू** : अगं तुम्ही एकटेचं का होतात त्या निर्णयात. काही काळजी करू नकोस. आपली कळी आपण पुन्हा आपल्या वंशवेलीवर सजवू. ती पुन्हा मूळ धरेल, वाढेल, बहरेल. तिचा सुगंध सगळीकडे पसरेल. नाही का हो डॉक्टर.

**डॉक्टर** : अहो का नाही. झाडावर कलम केलेली फांदीही बहरते, फळते आणि मानसी तर एक निष्पाप मनुष्यजीव आहे. ती का नाही फुलणार. अहो माळरानावरही एकटी फुलं फुलतात, पण म्हणून तुम्ही बागेतल्या फुलांच्या ताटव्यातील फुलं माळरानावर जाऊन लावलत तर ते एकटं जगेल की नाही हे नाही सांगता येणार आणि तुमच्या फुलाची तुम्हीच जास्त काळजी घेऊ शकता इतर दुसरं कुणीही नाही. तेव्हा प्लीज...

**आई** : होय डॉक्टर, आम्हीच आमच्या कळीची काळजी घेऊ, तिला आमचा सहवास देऊ, तिच्याशी संवाद साधू, तिच्या मनातल्या निर्मळ झऱ्यांना मोकळं करून त्यांना वाट करून देऊ, त्यांना वळण देऊ. पैसा व करिअरच्या मागे लागून आम्ही आमच्या मानसीकडे दुर्लक्ष केले. चूक झाली आमची.

आम्हाला वाटत होतं आम्ही जे काही करतोय ते सर्व तिच्यासाठी, तिच्या सुखासाठीच करतोय. त्यासाठीच आम्ही आमचा सारा वेळ खर्च केला, जो खरंतर आम्ही तिच्या बरोबर घालवायला हवा होता तिच्या सहवासात.

**डॉक्टर** : काही हरकत नाही. मानसीच्या आई अजूनही वेळ गेलेली नाहीये. पण याच्यापुढे मात्र तुम्हाला तिची खूप काळजी घ्यावी लागेल.

---

अंधारच नसता तर चमकणाऱ्या ताऱ्यांना काहीच किंमत उरली नसती.

**आजी** : आम्ही तिला घरी कधी नेऊ शकतो, डॉक्टर?

**डॉक्टर** : तिला दिलेल्या औषधांचा अंमल तिच्यावर आहे अजून. तो उतरला की दुपारी लगेच डिस्चार्ज देतो. मी तुम्हाला काही औषधं लिहून देतो ती तुम्ही बाहेरून आणा आणि दाखवा मला. पुढचे काही दिवस तिला दर आठ दिवसांनी कौन्सलिंगसाठी आणावं लागेल.

**आजी** : तिचा टी.व्ही पहिला बंद कर.

**डॉक्टर** : अहं...हं.हं.हं. एकदम असं करू नका. हळूहळू तिचा टी.व्ही. कमी करा आणि काही ठराविक कार्यक्रम दाखवा. Ok. Wish you all the best. काही काळजी करू नका सगळं ठीक होईल.

**आई** : Thank you Doctor, Thank you very much.

**आजी** : तुमचे आभार कसे मानू हेच कळत नाही डॉक्टर. माझ्या पोरीचा जीव वाचवलात तुम्ही.

**डॉक्टर** : आभार कसले आलेत. माझं काम मी केलय आता पुढचं सर्व तुमच्या हातात आहे. अहो छोट्यांच चुकलं तर मोठ्यांनीच सांभाळून घ्यायचं असतं आई.

(अंधार होतो प्रवेश संपतो)

-: प्रवेश सातवा :-

*(दिव्या दिव्या दिपत्कार.... शुभंकरोती आजी आणि मानसीचा अडखळणारा आवाज. रंगमंच उजळतो. मानसीचं घर... आजी उदबत्ती, धूप घरात फिरवते. मानसी बसली आहे शांत. आई फोनवर बोलतेय मैत्रिणीशी...)*

**आजी** : हं शुभंकरोती झालं ना चला आता अभ्यासाला बसा बघू (मानसी अभ्यासाला बसते. आजीशी बोलणं चालू आहे.)

**आई** : (फोनवर) हो. हो. ठीक आहे ती. सासूबाई पण आल्यात नाही... नाही ते ठीक आहे, पण मला प्रमोशन आणि नोकरी यापेक्षा माझ्या मुलीचं आयुष्य जास्त महत्वाचं आहे... त्याग कसला आलाय? माझ्या मुलीसाठीच करत्येय, मग? ...नाही पश्चाताप बिलकूल वाटणार नाही आणि मी एकटीच कुठे करतेय एडजेस्टमेंट. ते ही करतायत. हो... हो... आज येतायत ते. नाही ना बॉंड संपायला सहा सात महिने आहेत अजून. आता हे तीन महिन्यांसाठी येतायत. नंतर मग कायमचेच इथे येणार सगळं सोडून. इथेच जॉब बघतील नाहीतर. बघू अजून काही ठरवलं नाहीय. पण ते इथे कायमचे येणार आणि मी, मनू आणि घर सांभाळणार एवढं नक्की आणि मानसीचे आजी, आजोबा सुद्धा येऊन जाऊन राहतील. मला माझ्या संसाराची विस्कटलेली घडी नीट बसवायचीय. पुन्हा नव्याने सुरुवात करायचीय. हो... हो... त्यांचीच वाट सगळी बघताय आम्ही. आतापर्यंत फ्लाईट लँड पण झालं असेल. ओके... ओके... थँक्यू.हो ये ना. ओके. बाय... (फोन ठेवते)

**आई** : (मानसीकडे वळून) चला मानसी बेटा, बाबा यायची वेळ झाली. *(इतक्यात डोअर बेल वाजते बाबांचा आवाज मानसी, मानसी बेटा, मी आलो. मना, मनु... बाबांच्या हाका. मानसी, आई, आजी दरवाजाकडे बघतात. मानसी दरवाजाकडे धावते. सर्व फ्रीज. पडदा पडत असतांना बॅकग्राउंडला)*

सर्वात्मका सर्वेश्वरा,
स्वीकार या अभिवादना
तिमिरातुनी तेजाकडे,
प्रभु आमुच्या ने जीवना ......

(टीप : सर्वअधिकार लेखकाकडे. लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय प्रयोग करता येणार नाही.)

**श्री. संजय ल. बोरकर**
३/१६, सत्यभामा अपार्टमेंट, रा. ग. गडकरी पथ,
पंटाळी, ठाणे - ४००६०२.
फोन नं. - ५४१६५२८

०००

# 'मैत्री'

श्री. संजय बोरकर

मैत्री म्हणजे काय ?
मैत्री म्हणजे बर्थ डे पार्टीज, गेट टु गेदर्स, आनंदाने नाचण आणि बागडण ?
हे मैत्री म्हणजे तुझ्या दुःखात संकटांत मी असण आणि माझ्या सुखात 'तु' असण !'
मैत्री म्हणजे काय?
हे मैत्री म्हणजे व्यावहारीक जगातल्या अंधारलेल्या मळभट वातावरणात
अंगावर पडलेली सूर्याची कीरणं असतात लखलखती
ज्यांना असत विश्वासाच तेज आणि उब असते प्रेमाची
खरचं मैत्री म्हणजे काय ?
मैत्री म्हणजे भेटीगाठी, टेलीफोन कॉल्स आणि गेफ्टस् ?
मैत्री असते उभारलेली एक राहुटी
विश्वासाच्या खांबावर उभी आणि दोन्ही बाजुंना तीच्या ओढ असते प्रेमाची
एका बाजुने जरी ओढ कमी झाली तरी ती राहुटी कोसळते
ती कोसळते 'त्या' बाजुवर 'ज्या' बाजुने ओढ जास्त असते.
आणि मला वाटत तिथेच जास्त जखम होते.
अगदी मनापासून सांग खरी मैत्री म्हणजे काय ?
खरी मैत्री ? खरी मैत्री असते बाय हार्ट
नसत स्वार्थ आत पडते फक्त हृदयाची गाठ
तिथे नसते लिंग, वय, स्थान आणि काळवेळांचं बंधन मोकळे घेतात मनांचे पाट
तरी सुद्धा मैत्री म्हणजे नव्हे स्वैराचार
मैत्री म्हणजे 'विश्वास' 'आदर' आणि 'प्रेम' यांनी युक्त असा एक शुद्ध 'आचार'

श्री. संजय बोरकर

*With Best Compliments from*

# CANARA BANK

THANE - NAUPADA BRANCH
[H.O. - BANGALORE]

THE BANK THAT IS
***SERVING TO GROW AND GROWING TO SERVE***

OUR MAIN AND CUSTOMER FRIENDLY SERVICES ARE :

- **Days Banking Facility**
- **Teller System**
- **Extended Business Hour (Upto 1.30 p.m.)**
- **Customer Terminal Service**

OUR OTHER SERVICES INCLUDES :

- Educational Loans
- Vehicle Loans
- Durable Utility Article Loans

AND MANY MORE ....

DO DROP IN FOR MORE DETAILS

**Tel. :** 540 4177, 542 4715, 540 7225 (Fax also)
**Email :** (temporary) dothn@canbank.wipro.net.in
**Postal :** 41/A, Gokhale Road, Naupada, Thane 400 602.

# दिव्यत्वाची जेथ प्रचिती . . .

सौ. सुमेधा कुलकर्णी

*सौ. सुमेधा कुलकर्णी यांनी केरळ-कन्याकुमारी ट्रीपवरून परतल्यानंतर आपली मुलगी सौरभी जी अमेरिकेत असते, तिला या ट्रीपचं वर्णन पत्रातून केलयं. वाचल्यावर आपल्यालाही आपण केरळला फिरतोय की काय असं वाटल्यावाचून रहावत नाही.*

'नेत्रावती एक्सप्रेस -A/C. कंपार्टमेंट' मधून प्रवासाला जाणार म्हटल्यावर कोकण रेल्वेची माहिति असणाऱ्यानी 'वा' म्हटल्यावर आणि येतांना मंगला (खरं मंगलद्वीप) एक्सप्रेसचं रिझर्व्हेशन आहे म्हटल्यावर 'वाम्प्रदा' असं केल्यावर आम्हांला कॉलर ताठ झाल्यासारखी वाटली . एवढा लांबचा प्रवास, पण एर्नाकुलमला गेल्यावर आम्ही ताजेतवाने (पॉश हॉटेल बघून जास्तच). अनिरुद्धच्या स्टुडंटस्नी 'वसंत' आणि 'जगदीश' आणि त्यांच्या कुटुंबियांनी सुद्धा आम्हांला जी मदत केलीय नं ती म्हणजे आपल्या आवडत्या प्रोफेसरसाठी स्टुडंट्स् किती मनापासून आणि शक्य आहेत ते सर्व कसं करतात याचं एक उत्तम उदाहरण आहे.

एर्नाकुलमला (कोचीन) दोन दिवस राहून Back Water Ride, कलाडीचा शंकराचार्यांचा मठ, म्युझियम (तिथल्या राजांची पेंटिंग्ज, त्या काळच्या वेगवेगळ्या वस्तू) आणि Dear पार्क पाहिलं छे छे संवयीन 'पाहिलं' म्हटलं, पण निवांतपणे दोन्ही बाजूच्या हिरव्या हिरव्या गर्द झाडीतून झुलुक् झुलुक् आवाज करीत मंद वाहणाऱ्या पाण्यातून 'केरळ स्पेशल' लांब होडीमध्ये रिलॅक्स होण्याचा अनुभव, शंकराचार्यांच जन्म स्थान, तिथली तेज:पुंज देवी त्यांच्याबद्दलच्या विविध चितारलेल्या कथा, तिथलं शांत, पवित्र वातावरण यांनी भारलेली मनाची अवस्था, डिअर पार्क मधली कितीतरी निष्पाप आणि गोजिरवाणी हरणं आणि मोरानं दिलेला great, great stage performance नाजूकपणे झटका देऊन पिसाऱ्याला दिलेला हेलकावा अन् मग गिरकी घेऊन जगांतील सारं सौंदर्य ल्यालेला दिमाखानं फुलवलेला मयूरपंख पिसारा- वर्णन करायला शब्दांची शक्ती अपुरी पडते म्हणतात ते अशावेळी मनोमन पटतं. पण फोटो-? त्याला बंदी.

तिथून निघालो पहाटे बसनं -मारे बस रिकामी म्हणून खिडक्या पकडून बसलो. पण नंतर ती इतकी खचाखच भरली की एकमेकांची तोंडही दिसेनात. थोडाथोडका नाही सात तासांचा प्रवास ! तरीसुद्धां गंमत म्हणजे वैतागलो नाही, कारण खिडकीबाहेर दिसणारी मिरी, पिंपळी, वेलची, लवंगा यांची झालवेली वातावरण आणि मन दोन्हीही प्रसन्न ठेवत होते आणि दुपारी दोन वाजतां शिरलो 'अरण्यनिवास-टेकडी मध्ये ! ओह ! वातावरणातला गारवा, नजर फिरवावी तिकडे दिसणारा गर्द हिरवा रंग... त्यांत फुलांचे लाल, तांबडे, जांभळे, पिवळे, नारिंगी..... सगळे इंद्रधनुष्याचे रंग कसले उठून दिसत होते ! सगळीकडे सिमेंटच्या भिंती पहाण्याची संवय असलेलं मन.... कसलीशी हलकी अन् तरल संवेदना अनुभवत होतं. पैरिआर नदीत बोटीत बसून सभोवतालच्या घनदाट जंगलात प्राणी न्याहाळतांना मध्ये मध्ये स्फूर्तीची excitement ही जाणवत होती. वाघानी आम्हांला दगा दिला तरी बाकी सर्व प्राण्यांनी 'आमचं' दर्शन घेतलं. हत्तींचे तर कळपच्या कळप. दोन बाजूला दोन हत्ती अन् मध्ये छोटसं पिल्लू. एकमेकांची प्रेमानं काळजी घेत फिरणारी ही छोटीशी Elephant Family पाहिली की आपल्यालाच प्रेमळ मन दिलय' ही भ्रांत फिटते.

अरण्यनिवासचा - पूर्वीच्या popdal भाषेत दु:खद अंत:करणाने निरोप घेऊन वगैरे .. निघालो तो जगदीशच्या

नेम चुकल्यावर फार निराश होऊ नका, नंतरचा लागेल, त्यानंतरचा लागेल, हेच जीवन आहे.

गांवी Palai अरे, कोणाला अभिमान वाटावा नाही आपल्या निसर्गरम्य गांवाचा ? 'टाटा सुमो' चा प्रवास असल्यामुळे दोन्ही बाजूला रबराची झाडं, सर्व हिरवागार परिसर, मध्ये अतिशय टुमदार असे नयनमनोहरी बंगले, थोड्या थोड्या अंतरावर 'धवावा लोटल्या धारा, धबाबा तोयें आदळें असे उसळणारे धबधबे ! तिथून हलूंच नये, रस्ते संपूच नयेत असे वाटणारे ते आणि मुण्णारपर्यंतच्या प्रवासांतील तास ! अमेरिकेतील Yosenity ची खूप वेळा आठवण झाली. असा वैभवसंपन्न निसर्ग तिथेच पाहिला होता पण हे सारं पाहून असं वाटलं की 'हम भी कुछ कम नही !'

मुन्नारच्या 'Suman Motal' मध्ये तर आम्ही जणू ढगावर तरंगतच राहत होतो. 'सर, सर, बरसणाऱ्या पाऊसधारांनी मन कसं चिंब भिजलं होतं. दोन तास स्वऽस्थ खिडकीतून आसमंत न्याहाळला, तर दोन वर्ष आराम केल्यासारखं मन शांतावलं होतं. मुन्नार तर नुसतं पोपटीहिरव्या, आखीवरेखीव चहाच्या मळ्यांनी नटलेलं. चहाच्या process मधील गंमतजंमत केवळ अनिरुद्धमुळेच (त्याच्या कार्डमुळेच फॅक्टरीत जाण्याची परवानगी मिळाली) बघायला मिळाली कॉफी सावलीतच वाढती. म्हणून कॉफीच्या मळ्यात फणसाची झाडं अंगावर ४०-५० फणसाचं ओझं वाळगून जणू कॉफीच्या झाडांवर मायेच्या सावलीची पखरण करतात. जायफळीची फळं, वेलचीचे झाडाच्या बुंध्यालाच लटकलेले केल, मिरीची स्वतंत्र पण झाडाच्या आधाराची अपेक्षा असणारी वेल, तमालपत्राची हिरवी पानं, हिरव्यागार लवंगा.... सजलेला, नटलेला निसर्ग केरळातच पहावा असं वाटावं इतकं डोळ्यांना हिरवं रंगीबेरंगी सुख अन् कानांना धबधब्यांचा 'किती उंचावरून तू, उडी ही घेशीसी खाली जणू व्योमातूनी (आकाशातून) येसी, प्रपाता (धबधबा) जासी पाताळी' अशा धबधब्यांच्या धीर गंभीर असा सुखावणारा नाद..... केशवसुत म्हणतात तेच खरं 'देवळी देवासी बळे आणा, परी रहीं सृष्टीमध्ये राणा' या 'राण्याचे' दर्शन घेता घेता पाडगावकरांचे शब्द मनांत घुमतात ' आनंदयात्री मी, आनंदयात्री'

'अनल अनिरुद्ध, स्फूर्ती यांच्या विमानाचे उड्डान व्हायच्या आधीच आमची बस त्रिवेंद्रमला - तिरुवनंतपुरमच्या 'चैत्रम' मध्ये पोहचली होती. तिथेच चार दिवस मुक्काम ठोकुन 'Everyday tours' नी पद्नाभम् temple, कलवम् Eve's बेचेस्, म्युझियमस्, मार्तंड वर्माचा पॅलेस आणि शेवटी कन्याकुमारी.

मंदिर दक्षिणेकडची म्हणजे अनुपम कलाकुसर. एकेक खांब म्हणजे कोरीवकामाची संपन्नताच. मन आश्चर्याने भरुन जातं अन् नकळतच त्या चित्रकार, शिल्पकारांना सलाम ठोकतं. मूर्तीही अतिशय प्रसन्न, फुलांच्या माळांनी मूर्तींना नटवण्यात दाक्षिणात्य अतिशय वाकबगार ! समुद्रकिनारे अतिशय स्वच्छ-लाटांवर लाटा नुसत्या निरखत रहाव्यात. अन् पायाशी लडिवाळपणे गुदगुदल्या करणाऱ्या पाण्याचं कौतुक करावं.

Last and Best कन्याकुमारी. ज्या खडकावर बसून विवेकानंदानी तीन दिवस तपश्चर्या केली अन् त्यांना साक्षात्कार झाला की स्वदेशवासीयानेच नाही तर सातासमुद्रापलीकडेही राहणाऱ्या सर्वांना वेदान्तांच ज्ञान आणि मानवता हाच खरा धर्म हा संदेश पोहचविण्याच कार्य त्यांना करायचं आहे. तो खडक. सभामंदिर, ध्यानमंदिर, सगळीकडे नीरव शांतता. मंगल, पवित्र वातावरण. आजुबाजुला तिन्ही सागरांचा संगमाच दर्शन... कन्याकुमारी, अतिशय तेजस्वी मूर्ती - पहात रहावं असं लावण्य. आपलंच मन शुद्ध पवित्र झाल्यासारखं वाटतं. एक अवर्णनीय अनुभव, कसलीतरी तृप्ती...

निसर्ग सौंदर्याचे उपासक बालकवी बहुतेक केरळ-कन्याकुमारीच्या यात्रेला मुकले असावेत. नाहीतर 'हिरवे हिरवे गार गालिचे' 'श्रावणमासी हर्ष मानसी' यासारख्या -कदाचित् अधिक सुंदर निसर्गकवितांनी जन्म घेतला असता.

**सौ. सुमेधा कुलकर्णी**

❊❊❊

---

**प्रसंगी थोडे नुकसान झाले तरी चालेल, पण शत्रु निर्माण करू नका.**

With Best Compliments From

**SIDDHAKALA ENTERPRISES**

**DISTRIBUTORS & WHOLESALER**

Shop. No. 9, Ganesh Talkies Bldg., Lalbaug, Mumbai 400 012.

**Dilip T. Khatu**

**Tel. : 470 1017**

हार्दिक शुभेच्छा !

**ऋषीकेश एन्टरप्राईझेस्**

बोरीवली (प.), मुंबई ४०० ०९२.

एक उद्बोधक व उपयुक्त माहिती

# 'मुंबई हार्ट ब्रिगेड'

## हृदयाचा तीव्र झटका आला असता तातडीची उपाययोजना करणारी संस्था

**संजय गुमास्ते**

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात हृदय विकाराचा झटका आलेल्या रोग्याला तात्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध व्हावी अशा तळमळीने मुंबईचे एक सुजाण नागरिक श्री. मनूभाई चावडा यांनी रोटरी क्लबच्या साहाय्याने 'मुंबई हार्ट ब्रिगेड' नावाची एक संस्था स्थापन केली आहे. रोटरी क्लबचा हा सर्वात मोठा प्रोजेक्ट गेली ४ वर्षे उत्तमरित्या चालत आहे. आतापर्यंत आपत्कालीन मदत मिळाल्यामुळे ३ हजार लोकांचे प्राण वाचविले आहेत.

'मुंबई हार्ट ब्रिगेड' ची ही सेवा रोटरी क्लब तर्फे नि:शुल्क उपलब्ध केली जाते. **हृदयविकाराचा तीव्र झटका आलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांनी १०५ या क्रमांकावर दूरध्वनी करायचा.** आपल्या विभागातील मुंबई हार्ट ब्रिगेडच्या हॉस्पिटल स्टेशनमध्ये हा फोन जातो. तेथील ICCU (इंटेन्सिव्ह कार्डीअॅक केअर युनीट) मधील मेडीकल स्टाफ आपला मेसेज उतरवून घेतात आणि आपल्या मदतीसाठी तात्काळ एक अॅम्ब्युलन्स पाठवली जाते. हृदयविकार ग्रस्त व्यक्तींकडे अॅम्ब्युलन्स पोहोचताच त्याला आपत्कालीन प्रथमोचार देऊन रोग्याला अधिक त्रास होणार नाही याची काळजी घेतली जाते. डॉक्टर आपले निदान सांगून रोग्याला त्याच्या नातेवाईकांच्या हवाली करता. आवश्यकता भासल्यास डॉक्टर रोग्याला हॉस्पिटलच्या ICCU विभागात हलवितात. त्यानंतर नातेवाईक त्याच्या आर्थिक स्थितीप्रमाणे रोग्याला अन्यत्र हलवू शकतात. खरंतर 'मुंबई हार्ट ब्रिगेड' चे काम इथेच संपते पण त्याही पलीकडे जाऊन 'मुंबई हार्ट ब्रिगेड' रोग्याला अन्यत्र कुठे हलवावे याचा सल्ला देतात व तिथे हलविण्यासाठी अॅम्ब्युलन्स उपलब्ध करून देतात. ही संपूर्ण सेवा नि:शुल्क आहे.

'मुंबई हार्ट ब्रिगेड' ची ही १०५ क्रमांकाची सेवा भारतातील अशा प्रकारची पहिली सेवा आहे. अशाच प्रकारची सेवा अमेरिका व कॅनडा मध्ये ९११ क्रमांकावर तर इंग्लंडमध्ये ९९९ ह्या क्रमांकावर उपलब्ध आहे. पण इंग्लंड अमेरिकेतील ही सेवा त्या त्या देशातील सरकारतर्फे चालवली जाते व 'मुंबई हार्ट ब्रिगेड' ही सेवा पूर्णपणे नागरिकांतर्फे रोटरी क्लबच्या सहकार्याने चालवली जाते. १०५ क्रमांक दूरध्वनीवरून फिरवताच १५ मिनिटात ही सेवा उपलब्ध होते व हार्टअॅटॅक आल्यापासून ३० मिनिटांत रोग्याला हॉस्पिटलच्या ICCU विभागात हलवला जातो.

मुंबई हार्ट ब्रिगेडची सेवा खालील १६ हॉस्पिटलच्या स्टेशनमध्ये उपलब्ध केली जाते.

जसलोक हॉस्पिटल, जे.जे. हॉस्पिटल, वरूण कार्डीअॅक क्लिनीक (घाटकोपर), बी.ए.आर.सी. हॉस्पिटल (चेंबूर), सुनीता देवी सिंघानिया हॉस्पिटल (ठाणे-, श्रद्धा नर्सिंग होम (मुलुंड), एव्हरशाईन नर्सिंग होम (मालाड-प.), सूचक हॉस्पिटल (मालड-पू.), राजज्योती हार्ट हॉस्पिटल (बोरीवली), लीलावती हॉस्पिटल (वांद्रे), गोयल जनरल हॉस्पिटल (जे.बी. नगर, अंधेरी-पू.), पुनामिया हॉस्पिटल (परळ), वेली व्ह्यू नर्सिंग होम (अंधेरी-प.), नानावटी हॉस्पिटल (विलेपार्ले), एम.जी. एम.हॉस्पिटल (नवी मुंबई)

**संजय गुमास्ते,**
लोकपुरम्-ठाणे, दूरध्वनी : ५३४०३६५

• • •

# .... आणि मी हास्यचित्रकार झालो !!

श्री. विवेक मेहेत्रे

*हास्यचित्रकार, आपण वाचत असलेल्या कोणत्याहि नियतकालिकातील एक महत्त्वाचा वाटेकरी. हास्य चित्रकार कसा घडला याबद्दल आपल्याला उत्सुकता असते. विवेक मेहेत्रेचा लेख त्या दृष्टीने- संपादक*

प्रत्येकाचे तारुण्यातले दिवस मंतरलेले असतात. मोहक क्षणांचे, भावुक शब्दांचे ते दिवस असतात. डोळ्यात स्वप्न असतात. मनात आशा असते. कुणी त्या दिवसांचा उपयोग करून सात मजली महाल रचतो तर कुणी साता समुद्रापार असलेल्या विश्वाचा ध्यास घेतो. माझ्या महाविद्यालयीन जीवनात मात्र अनेक क्षितीजं मला खुणावत होतो. अनेकांप्रमाणे मलाही कविता सुचत होत्या.... त्या कागदावर उतरत होत्या. एखाद्या विषयावर पटकन समर्पक लिहिणं जमत होतं. मी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला होता तेथे मात्र अवतीभवती फुलपाखरी मोहक वातावरण नव्हतं, काहीसं रुक्ष, कंटाळवाणं वातावरणं होतं.

मित्रहो, मी तेव्हा (मुंबईतील व्ही.जे.टी.आय. या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतला होता... वय अवघं १६ वर्षे. साल होतं १९७८. तेव्हा इंजिनियरींगची फार मोजकीच महाविद्यालये महाराष्ट्रात होती. (आजच्या सारखी गल्ली बोळात मेडिकल - इंजिनियरींगची दुकानं तेव्हा शिक्षण महर्षींनी (!) थाटली नव्हती) आणखी एक प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट. तेव्हा माझ्या वर्गात फक्त २ मुली होत्या. बाकी सर्व मुलंच ! (ही परिस्थिती शेवटच्या वर्षापर्यंत होती बरं). आज इंजिनियरींग कॉलेजात अनेकदा मुलांपेक्षा मुलींची संख्या अधिक आढळते. असो. तर तेव्हा फक्त अभ्यास, तोही कठीण वाटणाऱ्या तांत्रिक रुक्ष पद्धतीच्या इंजिजनयरींगच्या इंग्रजी भाषेतून शिकणं एवढंच आमचं विश्व होतं. (नाही म्हणायला, शेजारचं रुईया व खालसा महाविद्यालय ही आमच्या सिनियर मंडळींची आवडती स्थानं होती बरं का !) त्या कंटाळवाण्या सेमिस्टर पद्धतीत विनोदाचा थंडगार शिडकावा करणारे क्षण कधीतरी कचितच असत. स्वतःला 'फार मोठ्ठे' आहोत असे समजणारे' इंजिनियरींगला अॅडमिशन मिळालीय म्हणजे काय!! ' अशी भावना दाखवणारे अनेक जण अवतीभोवती वावरत असत. त्यांच्याशी माझी मैत्री जुळू शकणारी नव्हती. शिवाय वाचनाची प्रचंड आवड असल्याने हाती मिळेल त्याचा वाचून फडशा पाडायचा असा माझा रोजचा कार्यक्रम असायचा. शाळेत असल्यापासून मला विनोदी साहित्य आवडू लागले होते - घरी येणाऱ्या मासिकांतील, दिवाळी अंकातील विनोद व हास्यचित्रे वाचता वाचता आपल्यालाही असे काहीतरी जमू शकेल असा शोध कुठेतरी आतमध्ये जाणवू लागला होता. चांगली व्यंगचित्रे कोणती, वाईट कोणती, तिखट व्यंगचित्रं कशाला म्हणतात, वावट व्यंगचित्र म्हणजे काय हे सारं समजू-उमजू लागलं होतं. बरं-वाईट यातील लक्ष्मणरेषा समजू लागली होती. त्याचवेळी हेही समजलं की 'व्यंगचित्रं कला शिकवणारी एकही शिक्षणसंस्था किंवा शिक्षणक्रम आपल्या देशात नाही' ... म्हणजे आपल्याकडं फार कमी व्यंगचित्रकार असण्याचं कारणही समजलं.

बरं डॉक्टर, वकील, इंजिनियर यांना समाजात मिळणारा भाव, मानाचं स्थान (व Money हो!)

व्यंगचित्रकारांना लाभत नाही हे अवतीभोवती दिसत होतं. त्यामुळे या क्षेत्रात पूर्णवेळ झोकून देण्याचं धाडस आपल्याकडे फार कमी चित्रकार करतात हेही समजलं. पण माझी गोष्ट निराळी होती. खाऊन पिऊन सुखात घर असल्याने झटपट नोकरी/व्यवसाय करण्याची चिंता करण्याची मला नव्हती. १२वी मध्ये मला भरपूर मार्कस् मिळाल्यामुळे इंजिनियरींग व मेडिकल दोन्हीकडे प्रवेशाची दारं उघडी होती. (पण वयाची १७ वर्ष पूर्ण झालेली नसल्याने मेडिकलला प्रवेश मिळूनसुद्धा १ वर्ष थांबण्याची जाचक अट घातली गेली, ती नाकारून मी थेट V.J.T.I. ह्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला). माझ्या १२वी नंतरच्या महाविद्यालयीन जीवनाच्या पहिल्या वर्षातच मिळणाऱ्या भरपूर वेळेचा मी सदुपयोग करू लागलो. सुचतील ते विनोद लिहू लागलो. त्यावर पुन्हा पुन्हा विचार करून व्यंगचित्रे रेखाटू लागलो. त्यामध्ये अधिक खुमारी कशी वाढवता येईल त्याचा शोध घेऊ लागलो. माझ्या हास्यचित्रांची संख्या वाढू लागली. त्यात विविधता येऊ लागली.... पण हे सारं कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय चालू होतं... अगदी एकलव्याप्रमाणे.. !

शेजारी-पाजारी, मित्र, नातेवाईकांना मी सुरुवातीची चित्रं उत्साहानं दाखवू लागलो. त्यांना ती आवडतायत हे त्यांच्या चेहऱ्यावरुन कळू लागलं. पण तरीसुद्धा व्यंगचित्रकार होऊन नाव कमवावं किंवा पैसे मिळवावे हे माझं स्वप्न नव्हतं. आपलं काही चुकत तर नाही ना हे जाणून घेण्यासाठी एखाद्या या क्षेत्रातील जाणकाराची मदत घ्यावी या इच्छेने मी शोध घेऊ लागलो. त्याकाळी म्हणजे सन १९७८ ते १९७९ या काळात मराठीत फार मोजकेच चित्रकार व्यंगचित्रकार म्हणून प्रसिद्ध होते. मुंबईत रहाणाऱ्या एक प्रसिद्ध (!), लोकप्रिय (!!) व्यंगचित्रकाराला मी भीतभीतच फोन केला, माझी ओळख सांगितली, भेटीची वेळ मागितली. २-३ वेळा प्रयत्न केल्यानंतर मोठा उपकार करतोय या भावनेने त्यांनी मला 'या' असं कळवलं.

मी मोठ्या उत्साहाने माझी काही चित्रं घेऊन त्यांच्या घरी गेलो. त्यांना आदरपूर्वक नमस्कार करुन माझी मला आवडलेली काही व्यंगचित्रं दाखवली. त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटतंय का म्हणून आशेने त्यांचा चेहरा निरखू लागलो. टेबल लॅम्पच्या प्रकाशात त्यांच्या चेहऱ्यावर हसू दिसण्याऐवजी कपाळावर एक-दोन आठ्याच उमटलेल्या दिसल्या. थोडा वेळ शांततेत गेला....

'' काय नाव तुझं! '' त्या जेष्ठ चित्रकारानं विचारलं

प्रत्यक्षात मी त्यांच्या हाती दिलेल्या प्रत्येक हास्यचित्राच्या चौकटीत तळाला माझं नाव स्पष्ट दिसत होतं.. मला थोडं आश्चर्यच वाटलं, तरी मी आत्मविश्वासपूर्ण आवाजात नाव सांगितलं

'विवेक मेहेत्रे'

'' खरं की टोपण नाव?'' त्यांचा प्रश्न

''??'' (म्हणजे मी नाही समजलो)

''खरचं ! तेच माझं नाव आहे'' माझं उत्तर देण्याचा बापुडवाणा प्रयत्न.

'तुला ठाऊक आहे का या क्षेत्रात काही दम नाही, तू दुसरं काही तरी कर !!'

पण का ? असा प्रश्न विचारावासा वाटला, अगदी ओठांवरच आला होता, पण मी नाही विचारला.

'मी इंजिनियरींगचा विद्यार्थी आहे, त्याच क्षेत्रात मला चांगला भविष्यकाळ आहे' या वरच ते 'महान' चित्रकार भर देऊन बोलू लागले. पण तेवढ्याने तेव्हा तरी मी निराश झालो नाही.

माझी इच्छा होती की ज्या हास्यचित्रकाराची छापील चित्रं आपण आतापर्यंत पाहत आलोय, त्यांची एखादी मूळ प्रत (Original Cartoon) पहायला

---

मिळावी... म्हणजे ते कोणत्या प्रकारचा कागद वापरतात, कसलं पेन वापरतात हे तरी समजेल. म्हणून मी त्यांना तशी विनंती केली. त्यावर ते चेहरा वाईट करीत म्हणाले, 'मी चित्र रेखाटून घरात ठेवीत नसतो. मी चित्र रेखाटलं की लगेच छापायला जातं... सध्या मराठी साहित्य क्षेत्रात सर्वाधिक मनाधन मागणारा म्हणून माझी ख्याती आहे वगैरे.. वगैरे'' (मला समजत होतं की हे काही खरं नाही) तरीही मी पुन्हा म्हटलं की 'तुम्ही चित्र रेखाटण्यासाठी काय साहित्य वापरता, कधी चित्र रेखाटता, आधी कच्चं रेखाटनं करता का? शाई कोणती वापरता ?'' माझे प्रश्न ऐकून त्यांनी पाठच फिरवली, मला वाटलं की आतून काही सामुग्री आणून दाखवायची असेल किंवा आपल्या पत्नीला माझ्यासाठी चहा ठेवायला सांगायला गेले असतील... पण कसचं काय?....

थोड्यावेळाने बाहेर आले रिकाम्या हाताने म्हणाले, ' घरातले चित्र रेखाटयाचे कागद संपलेयत, पुन्हा कधीतरी या, मग दाखवीन'.

मी खिन्न झालो. माझ्या मनातील एक आदरस्थान माझ्यासमोर निखळलं जात होतं. त्याच क्षणाला ठरवलं की नाही ! मी व्यंगचित्रकारच होईन, नाव कमावीन, मिळाला तर पैसाही या कलेतून मिळवीन, पण माझ्याकडे सल्ला मागायला येणाऱ्या धडपडणाऱ्या चित्रकाराचा हिरमोड मात्र कधीही करणार नाही...

घरी येताना मला एकलव्याची गोष्ट आठवत होती... पण मी एकलव्याप्रमाणे त्या 'महान' चित्रकारांच्या चित्रांचा आदर्श डोळ्यापुढे न ठेवण्याचं ठरवलं.... माझी ओळख सांगणारी स्वत:ची स्वतंत्र रेषा मी निर्माण करीन या जिद्दीने मी कामाला लागलो. अखंडपणे वाचन, चिंतन, मनन करतानाच अनेक हास्यचित्रकारांच्या कल्पना सुचू लागल्या, त्या पटापट कागदावर उतरवून त्यांना मूर्त स्वरूप देऊ लागलो. त्याचवेळी एक आणखी विलक्षण लाभदायक गोष्ट घडली.

मी ज्या कॉलेजात शिकत होतो, तेथेच एक प्रसिद्ध विनोदी लेखकही नोकरीला आहेत असं मला कोणीतरी सांगितलं. त्यांचं नाव मी पूर्वी अनेकदा वाचलं होतं. ते म्हणजे श्री. वि.आ. बुवा.

आमच्या कॉलेजात एका टोकाला असलेल्या रसायनशास्त्र विभागाच्या स्टोअर्स डिपार्टमेंटमध्ये ते काम करीत. मी लांबूनच त्यांचं दोन-तीन वेळा दर्शन घेतलं, पण आमची ओळख नव्हती. या पूर्वी एका महान 'प्रसिद्ध' व्यंगचित्रकाराच्या घरी आलेला कटु अनुभव गाठीशी होता, त्यामुळे पुन्हा तसंच घडलं तर, ही अनाठायी भिती होती.

पण एके दिवशी ठरवूनच मी माझी काही निवडक व्यंगचित्र घेऊन श्री. बुवांना भेटायला गेलो. मधल्या सुट्टीची वेळ होती ती. बुवांनी हसतमुखाने माझं स्वागत केलं. मला समोर बसायला सांगितलं. कामाचं स्वरूप विचारलं... मी त्यांना माझी काही हास्यचित्रं दाखवली. त्यांना ती बहुदा आवडली असावीत... 'ही चित्र प्रसिद्धीसाठी का पाठवत नाही तुम्ही?' बुवांनी मला विचारलं... 'तुम्ही?'.. म्हणजे मी फक्त १७ वर्षांचा होतो, पण ज्येष्ठ लेखक बुवा माझा उल्लेख एकवचनी न करता आदरार्थी करत होते.

''छापली जातील का ही चित्रं?'' मी दबकतच विचारलं.

''हो प्रयत्न तर करा, हवं तर आधी 'किशोर' सारख्या मुलांच्या मासिकांकडे चित्र नेऊन द्या.'' बुवा म्हणाले. त्यांच्या शुभेच्छा मिळाल्या. पुढेही श्री. वि. आ. बुवांचे आशीर्वाद वेळोवेळी मिळाले. ... आणि काय सांगू... त्या नंतर खरोखरच अतिशय वेगाने मराठी साहित्याच्या दुनियेत माझी वेगवान घोडदौड सुरू झाली.

मराठीतील सर्व आघाडीची मासिकं, विविध वर्तमानपत्रं, 'श्री' साप्ताहिक, विवेक साप्ताहिक, असंख्य

दिवाळी अंक इत्यादीमध्ये माझी हास्यचित्रं प्रसिद्ध होऊ लागली.

ज्या महान हास्यचित्रकाराने मला कार्टून्स रेखाटू नका असा सल्ला दिला होता, त्यांची हास्यचित्रे त्या वर्षी ज्या दिवाळी अंकांमधे प्रसिद्ध झाली होती त्या सर्वच्यासर्व दिवाळी अंकांत त्या वर्षी माझी चित्रे प्रसिद्ध झाली... (म्हणजे अगदी मांडीला मांडी लावून पंक्तीला बसल्यासारखाच प्रकार की!) आज ते 'महान' व्यंगचित्रकार ही घटना कदाचित पूर्ण विसरलेही असतील. गेल्या २२ वर्षात मी अनेकदा त्यांना भेटलो, तेही माझ्याकडे अनेकदा आले, माझ्या कार्यक्रमांना, पुस्तक प्रकाशन समारंभाला येऊन गेले, आजही भेटतात. पण मी त्यांना कधीही त्या घटनेचे स्मरण करुन दिले नाही.

गेल्या २२ वर्षात या कलेने मला भरभरुन दिलं. पैसा, प्रसिद्धी, नाव सारं सारे लाभलं... पण त्याहून अधिक मोलाचं म्हणजे देश-विदेशातील असंख्य वाचक (केवळ मराठीच नव्हे तर अन्य भाषेतील ही!) माझ्यावर जो प्रेमाचा वर्षाव करतात तो सुखद आहे, अवर्णनीय आहे.

माणसाला असं पुढे येण्यासाठी कोणीतरी डिवचावं लागतं, ते महान कार्य माझ्याबाबतीत त्या 'महान' व्यंगचित्रकारांनी केलं. अन्यथा आज मी फक्त अभियंता म्हणूनच वावरलो असतो. माझी स्वतंत्र ओळख पत्रकार, संपादक, इंटरनेट अभ्यासक, लेखक व कवी म्हणून घडण्यासाठीही असेच काही प्रसंग घडत गेले पण त्याविषयी नंतर कधीतरी लिहीन!

**श्री. विवेक मेहेत्रे**
कदंब २४, रश्मी कॉम्प्लेक्स, मेंटल हॉस्पिटलजवळ,
ठाणे ४०० ६०२.

❋❋❋









व्यायाम ही एक अमृतवल्ली आहे.

With Best Compliments From

*Omkar Enterprises*

***Builder & Developers***

Thane

*With Best Compliments from*

**Falcon Aerofit Centre**

**Thane**

# 'नात्यांचा गोफ' - 'प्रपंच'

सौ. विशाखा देशपांडे

*प्रपंच या मालिकेवर एक नितांत सुंदर कार्यक्रम ठाण्यात 'आपुलकी'च्या मित्रमैत्रिणींनी आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाचा हा वृत्तांत. - संपादक*

जागेचा अभाव, व्यवसायानिमित्त केलेले स्थलांतर, वैयक्तिक मतभेद, पिढ्या पिढ्यांमधील वैचारिक तफावत किंवा यासारख्या इतर कोणत्याही कारणास्तव, हल्ली विभक्त कुटुंबपद्धती प्रचलित होऊन एकत्र कुटुंबपद्धती जवळ जवळ संपुष्टात आली आहे. हे जरी सत्य असलं तरी आजही समाजातील प्रत्येकाच्या मनामध्ये, मनातील कोणत्यातरी कोपऱ्यात, मोठ्यांकडून केली जाणारी आपल्याबद्दलची काळजी, आपल्याबद्दलची माया, भावंडांबरोबर घालवता येईल असा वेळ, मोठ्यांकडून मार्गदर्शन व मिळणारा सल्ला, एकमेकांबद्दलची आस्था, प्रेम, जिव्हाळा, हे सगळं हवहवंसं वाटत असतं. या सगळ्याची मनामध्ये नकळत आस असते. पण हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात, या सगळ्या भावना व्यक्त करायला लोकांना वेळच नसतो. प्रत्येकाची धडपड असते ती या जीवनातील स्पर्धेमध्ये पुढे पुढे सरकण्याची, धावण्याची. विज्ञान खूप पुढे गेले आहे. हे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. कॉम्प्युटर सगळ्या गोष्टींना पुरा पडतोय. पण कॉम्प्युटर तुम्हाला भावना देतो का? कॉम्प्युटर नाही देऊ शकत तुम्हाला तो भावनेचा ओलावा, तो स्पर्श. मग तो तुम्हाला मिळतो, तो उत्तम नाटकातून, उत्तम संगीतातून, उत्तम मालिकेतून. अशीच तुम्हाला भावनेत गुंतून ठेवणारी, प्रत्येकाच्या मनातील भाव जागृत करणारी, प्रत्येक घरातीलच जणू कथा सांगणारी एक सुरेख मालिका सध्या अल्फा टी.व्ही. मराठी वर 'प्रपंच' या नावाने चालू आहे. या मालिकेचे वैशिष्ट्य असे की यातील प्रत्येक व्यक्तिरेखेचा स्वभाव, विचार, बोलणं हे सगळं आपलच वाटतं. यात मालिकेच्या लेखिका-दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी यांचच कौतुक आहे.

'प्रपंच' या यशाचं शिखर गाठणाऱ्या मालिकेच्या सर्व 'देशमुख कुटुंबियांना' भेटून त्यांच्याशी या मालिकेसंदर्भात गप्पा-गोष्टी करण्याचा योग घडवून आणला तो 'आपुलकी' या संस्थेने. दि. ३० सप्टेंबर २००० रोजी सरस्वती क्रीडा संकुलात रात्री ८ वाजता या सर्वांना भेटण्याचा योग आला. देशमुख कुटुंबातील आण्णा - श्री. सुधीर जोशी, श्री. बाळ कर्वे, सौ. सुहास जोशी, कल्पिताची भूमिका करणारी शर्वरी पाटणकर, आक्का - रेखा कामत, अलका - रसिका जोशी, जानकी - भार्गवी चिरमुले, प्रशांत- सुनील बर्वे, स्वत: लेखिका -दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी व या मालिकेच्या निर्मितीची सर्व सूत्रं शिताफिने हाताळणारी, जिला प्रतिमाताई या मालिकेच्या संदर्भात आपला उजवा हात समजतात ती, सुवर्णा मंत्री — ही सारी मंडळी या गप्पांमध्ये प्रेक्षकांशी संवाद करायला हजर होती. सरस्वती क्रीडा सभागृह तुडुंब भरलं होतं. प्रेक्षकांच्या वतीने प्रश्न विचारायला, प्रातिनिधिक रूपात सूत्र-संचालिका मंगला खाडिलकर हजर होत्या. 'आपुलकीच्या' वतीने रविंद्र मांजरेकरने सर्वांचे स्वागत केले. प्रथम श्री. सुधीर जोशींच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले आणि मग मंगलाताईंनी गप्पांची सूत्रे हाती घेतली.

**मंगलाताई :** प्रतिमाताई, मालिकेचं जेव्हा लेखन करायला घेतलं त्यावेळेला, या प्रकारची कौटुंबिक मालिकाच लिहिण्यामागे काय उद्दिष्ट होतं? हल्ली एकत्र कुटुंबपद्धती फारशी उरलेली नसताना, या एकत्र कुटुंबाची कहाणी मांडतांना, नेमका कोणता विचार मनामध्ये होता?

---

गणिताच्या अरण्यातून जातांना सूत्रांची बंदूक हाती घ्यावी लागते.

**प्रतिमाताई :** ही कथा अगदी साधी-सरळसोट आहे. परंतु ती आजच्या प्रत्येक घरातली कहाणी आहे. नेहमी आपण सिनेमा किंवा मालिकांमध्ये तेच तेच बघतो, की ताटातूट झाली आहे, कॅन्सर झाला आहे, खून, खंडणी, पळवून नेणे, वृद्धांना छळ, वगैरे. हे खरं वास्तवात असं काही घडणारं नसतं. हे सगळं खोटं असतं. मग हे सारं खोटं जर प्रेक्षक बघू शकतात तर माझ्या कथेत तर एकत्र कुटुंब, त्यांच्या समस्या वगैरे या चांगल्या आणि आदर्श वाटणाऱ्या गोष्टी आहेत. अगदी आपण त्या खोट्या आहेत असं धरून चाललो तरी, प्रेक्षक जर इतर गोष्टी खोट्या बघू शकतात तर मग हे 'आदर्श खोटं' का नाही बघणार?

**मंगलाताई :** पण प्रत्यक्षात असं आदर्श कुटुंब असतं का? जे संतुष्टपणे एकत्र रहातात?

**प्रतिमाताई :** नसावं! म्हणून म्हटलं की खोटं असलं तरी हे एक 'आदर्श खोटं' आहे आणि ते प्रेक्षकांना आवडेल.

**मंगलाताई :** या मालिकेने इतका मोठा प्रेक्षक वर्ग कसा काय खेचला?

**प्रतिमाताई :** यातल्या अस्सलपणामुळे. या मालिकेतील प्रत्येक पात्र हे प्रत्यक्ष प्रेक्षकाच्या मनातलं बोलतात. त्यातली सर्व माणसं ही खूप खूप खरी आहेत.

सुधीर जोशींना पुढील प्रश्न :-

**मंगलाताई :** 'आण्णा' या भूमिकेबद्दल काय वाटतं? खऱ्या खुऱ्या जीवनात कोणी 'अण्णा' अशी हाक मारून एखादी लहान वयाची व्यक्ती प्रश्न किंवा समस्या घेऊन विचारायला येतात का?

**सुधीर जोशी :** आजपर्यंत वेगवेगळ्या भूमिका केल्यामुळे त्या त्या वेळेला त्या त्या भूमिकेच्या नावाने लोक हाक मारतात. 'भिकाजी करोडपती' होतो तेव्हा लोक त्या नावाने हाक मारत होते. पण आण्णांचं काम करतअसतांना खूप बरं वाटलं. आम्ही जेव्हा सेटवर येतो तेव्हा सर्वच जण माहेरी आल्यासारखे येतात, आनंदात, खुशीत येतात.

कोणी सल्ला विचारायला समस्या घेऊन येतात का? असं विचारल्यावर सुधीर जोशी म्हणाले की, हे सांगणं फार डेंजरस आहे, कारण उद्यापासून सर्वच जण माझ्याकडे समस्या घेऊन येत राहतील. पण या मालिकेमध्ये सर्व लहान व्यक्ती ज्या माझ्याकडे समस्या, प्रश्न घेऊन येतात ते सर्वच अतिशय हुशार आहेत. त्यांची हुशारी पाहून मनाला बरं वाटतं. मालिकेमध्ये त्यांचे प्रश्न उलगडताना आनंद वाटतो. कारण ही हुशार मंडळी प्रत्यक्षात माझ्या आयुष्यातील प्रश्न सोडवतात.

**मंगलाताई :** तुमच्या सर्वांच्या अकृत्रिम अभिनयामागे तुमचे सर्वांचे आतले जुळलेले सूर व लेखन यांचा जवळचा संबंध असल्यासारखं वाटतं.

**सुधीर जोशी :** याचं कारण चांगलं आत्मसात करण्याची वृत्ती. आपल्या शेजारच्या घरात जरी एखादी चांगली गोष्ट घडली तरी ती आपल्याला आवडते, आमच्यातल्या कोणीही एकत्र कुटुंबात रहाणं हे अनुभवलेलं नाही. तेव्हा या सिरियलमध्ये काम करतांना, आपण एकत्र कुटुंबात असायला हवं होतं असंच वाटतं. कलाकारांमध्ये नुसतच अभिनय कौशल्य असून उपयोग नाही. त्याच्याकडे कुशाग्र बुद्धी असणं अतिशय महत्वाचं आहे. कारण त्यामुळे त्याला त्याची भूमिका उत्तम प्रकारे पोर्ट्रेट करता येते. जे फार फार महत्वाचं आहे. पूर्वी असं म्हणत की, ज्याला काही होता येत नसेल त्याने अॅक्टर व्हाव. हे चुकीचं आहे.

मुळात या मालिकेच्या लिखाणातच ताकद आहे. कारण जेव्हा कलाकार स्वत:ची भूमिका एंजॉय करतो तेव्हाच प्रेक्षक पण ती एंजॉय करतो.

या मालिकेची Co-ordinator सुवर्णा मंत्रीला पुढील प्रश्न असा होता :-

**मंगलाताई :** या मालिकेतील कलाकार हे सर्व अत्यंत व्यस्त कलाकार आहेत. तीव्हा या सगळ्यांना एकत्र आणून एक तरी, एकदा तरी सगळ्यांचा एकत्र सीन घेता, हे कसं काय शक्य होतं?

**सुवर्णा :** त्यासाठी महिनाभर आधी प्लॅनींग करावं लागतं. सगळ्यांना सूचना देऊन त्या सीनसाठी तयारी करावी लागते. सर्व साधन-सामग्री एकत्रित करावी लागते आणि मग सर्व कलाकार एकत्र येण्यासाठी चांसच बघत असतात. संधी मिळाली की सर्वजण येतात.

इथे प्रतिमाताईंनी सुवर्णाच्या परिस्थिती हाताळण्याच्या शिताफीचे तोंड भरून कौतुक केले व सांगितले की, 'सर्व तांत्रिक बाबी सुवर्णाच हाताळते. ते मला जमत नाही'.

सुहास जोशींना पुढला प्रश्न होता :-

**मंगलाताई :** तुमच्या भूमिकेच्या बाबतीत बोलायचे, तर संसारात गुंतून पडलेल्या गृहिणीची, Centrally confined भूमिका तुम्हाला दिली, त्याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

**सुहास जोशी :** खरं तर हा सर्व सिरियल्सचा दोष आहे. कोणत्याही सिरियलमध्ये कलाकाराला समाधान मिळेल, असे रोल लिहिलेच जात नाहीत. पण प्रतिमाचे आणि माझे वीस वर्षांपासूनचे मैत्रीचे संबंध आहेत. त्यामुळे मी तिला नाही म्हणूच शकत नव्हते.

**मंगलाताई :** लेखन हातात असून, उत्तम अभिनेते हातात असून, ही भूमिका व्यवस्थित वठवण्याचा चांस असतांना, प्रतिमाताईंनी ही भूमिका (सुहास जोशींची) व्यवस्थित का वठवली नाही.

**प्रतिमाताई :** कारण ही ५४ episode पुरतीच मर्यादित होती. जर मालिकेला जास्त episode ची परवानगी मिळाली तर ती चांगली खुलवता येईलही. कारण तसा उल्लेख त्या पात्राच्या बोलण्यामध्ये यापूर्वी आलेला आहे.

यावर मंगलाताई म्हणाल्या की, या मालिकेला इतकं यश मिळालयं की ५०० episode ला सुद्धा परवानगी मिळेल. त्यावर प्रतिमाताई म्हणाल्या की, मग त्यांना आयुष्यभर 'प्रपंच'च करावी लागेल.

मालिकेच्या coasting बद्दल थोडासा वाद होता. त्याला उत्तर देतांना प्रतिमाताई म्हणाल्या की, याच्यामध्ये वय लक्षात न घेता coasting केलेलं आहे. उदाहरणार्थ बाळ कर्वे हे सुधीर जोशींपेक्षा मोठे असूनही आण्णांची भूमिका सुधीर जोशींना दिली गेली. कारण त्या त्या कलाकाराचे spirit, mannerisms, चालण्या-बोलण्याची ताकद ही वेगवेगळी असते. एखादी दिसायला सुंदर असलेली मुलगी एका मॉडेलच्या भूमिकेमध्ये दहा मिनिटं सुंदर दिसू शकते पण ती त्या मॉडेलच्या भूमिकेची पूर्ण नाटकभर किंवा मालिकाभर ताकद पेलू शकणार नाही कदाचित.

**मंगलाताई :** सुधीर जोशी, 'आण्णांच्या' चैतन्याचं रहस्य काय?

**सुधीर जोशी :** प्रत्येक माणसाच्या आत, मनामध्ये एक माकड असतं आणि ते कमी जास्त प्रमाणात सतत उड्या मारत असतं. माझ्यातील माकड जरा जास्तच उड्या मारतं. ते माझ्या स्वभावातच आहे. म्हणूनच मी चैतन्यमय आहे.

यावर सुहास जोशी म्हणाल्या की, रात्रीच्या Shooting च्या वेळी सुधीर जोशी सर्वांना इतक्या छान प्रकारे आनंदी ठेवतात. त्यांच्या तोंडून सरस्वती बोलत असते जणू.

---

चांगली सुरुवात करणे म्हणजे अर्धे कार्य झाल्याची पावती आहे.

पुढचा प्रश्न रसिका जोशीला :-

**मंगलाताई :** 'अलका' आणि 'रसिका' यांच्यामध्ये किती साम्य आणि किती विरोधाभास आहे?

**रसिका :** साम्य काहीही नाही.

**मंगलाताई :** उत्तम अभिनेत्री बनायचं असेल तर सर्व अंगांची उत्तम प्रकारे माहिती असावी लागते. त्या दृष्टीने काय प्रयत्न करत असतेस? का फक्त अभिनयामध्येच लक्ष केंद्रित केलय?

**रसिका :** त्या दृष्टीने मी तसे प्रयत्न करते. अनेक शिबिरे केलीत. Body Language वर ट्रेनिंग केलं. गाणं शिकते आहे. त्याचा मला खूपच फायदा होता. आणि तसं नकळत निरीक्षणातून अनेक गोष्टी शिकता येतात.

मालिकेतील 'आक्का', रेखा कामत यांना त्यांच्या आयुष्यात आलेले एकत्र कुटुंबाचे अनुभव काय? ते विचारले. 'आक्का' या पात्राची कथेतील समस्या जी आहे ती आजही खऱ्या खुऱ्या आक्कांचीच आहे. तेव्हा प्रत्यक्ष 'आक्का' तुमच्याकडे समस्या घेऊन येतात का?

**रेखा कामत :** एकत्र कुटुंबाबद्दल बोलायचं झालं तर आमचा प्रेम विवाह झाला, परंतु मी 'नटी' म्हणून पहिल्यापासूनच माझ्याबद्दल सगळ्यांच्याच मनात अढी होतीच. मला इतकी वर्ष बरच काही सहन करायला लागलं.

'देशमुख' कुटुंबातली लाडकी 'कलिका', शर्वरी पाटणकर तिच्या भूमिकेबद्दल विचारले असता ती म्हणाली-

**शर्वरी :** याचं लेखनच इतकं छान आहे की ते सहजपणे अभिनय करवून घेतं. वेगळं असं काही आम्हाला करावं लागत नाही.

**मंगलाताई :** तुझी भूमिका (कलिकेची) त्या वयाच्या मुलींना पटली का?

**शर्वरी :** हो, कारण बऱ्याचदा रस्त्यात थांबवून लहान, मोठे आणि त्या वयाचे सांगतात की तुझं काम खूप छान आहे. वयस्क लोक सुद्धा स्तुती करतात आणि कधी कधी त्यांच्या सांगण्यामध्ये Nostalgic tone असतो की, बघा आम्ही जे तुम्हाला सांगत होतो किंवा सांगतो ते बरोबरच असतं.

म्हणजे आता वस्तुस्थिती ही आहे की, ही सगळी जीवनमूल्य जपण्यासाठी मालिकांकडे वळावं लागतं आहे!

'जानकी'च काम करणाऱ्या भार्गवी चिरमुले हिला, 'तुला निवडण्यास सांगितलं असतं तर तु कुठली भूमिका निवडली असतीस?' असं विचारले असता तिने सर्व भूमिका चांगल्या आहेत असं सांगितलं. मोठ्या कलाकारांबरोबर काम करायला दबदबा वाटतो, Tension येतं, पण सर्वच जण मन मिळून व चांगले आहेत त्यामुळे आता काही वाटत नाही.

प्रशांत - सुनील बर्वेला पुढील प्रश्न :-

**मंगलाताई :** 'जानकी' समजुतदार असल्यामुळे तुला ती आवडली का? (मालिकेमध्ये)

**सुनील बर्वे :** कदाचित प्रशांत समजुतदार नसल्यामुळे त्याला ती आवडली असणार!

**मंगलाताई :** आत्ताची जी प्रशांतची धडपड आहे, धडपडीचा काळ आहे, अशा तुझ्या खऱ्या खुऱ्या धडपडीच्या काळात तुला घरातल्या लोकांनी सावरलं होतं का?

**सुनील बर्वे :** हो. मला माझे आई-वडिल व सासु-सासऱ्यांनी खूप प्रोत्साहन दिले. मी एकत्र कुटुंबपद्धती आदर्श मानणाऱ्यातला आहे. माझं एक स्वप्न आहे, मोठ्या घराचं — भाऊ-वहिणी एकत्र रहाण्याचे. ते अजून पूर्ण करायचं आहे.

---

दुःखी माणसाला समोरचा माणूस सुखी आहे असे वाटत असते.

बाळ कर्वे आपलं मनोगत व्यक्त करतांना म्हणाले-

**बाळ कर्वे :** मालिकेच्या लेखन दिग्दर्शनाबद्दल वाद नाही. पण अलिकडे एकत्र कुटुंबपद्धत बघायला मिळत नाही. ते इथे पडद्यावर दिसतं, हे याच्या यशाचं कारण आहे. इथे melodramatic काही नसून सरळसोट जे रोज घडतं ते होतय म्हणून लोकांना आवडतंय. तुमच्या आमच्या घरात घडणाऱ्या गोष्टी साधारणपणाने लिहून व सादर करून घेणे यात सिंहाच्यापेक्षा जास्त वाटा असेल तर तो प्रतिमाचा.

रंगवलेल्या भूमिकेबद्दल येणाऱ्या काही प्रतिक्रिया अगदी बोलक्या असतात.

'लतिके'च्या भूमिकेबद्दल (सोनाली पंडीतच्या) बोलतांना, तिचे पात्र पूर्णपणे पटत नाही. कारण 'लतिका' ही एकत्र कुटुंबात राहून, सगळ्यांशी मिळतं जुळतं घेऊन, सगळ्यांना सामावून घेण्याचं बाळकडू तिला मिळालेलं असून पण ती इतक्या लवकर नवऱ्याला सोडून परत येते. म्हणजे दोघांच्यातील compatibility जोखण्यासाठीचा अवधीपण तिला दिलेला नाही. हे प्रेक्षकांच्या मनाला अजिबात पटत नाही.

**प्रतिमाताई :** याचं कारण मालिकेचे ५२ भाग. या मिळालेल्या भागांमधून घटस्फोटाची समस्या अधिक प्रकर्षाने मांडायची होती. त्यामुळे 'आमच्या दोघांत संवादच होऊ शकत नाही' या लतिकेच्या वाक्यातूनच त्यांच्यात असलेला संबंध प्रस्थापित होतो.

**मंगलाताई :** ज्या प्रकारच्या नाटकांची वा मालिकांची अभिरूची प्रेक्षक दाखवतायत त्याबद्दल तुम्हाला काय वाटते?

**सुहास जोशी :** खंत वाटते! खंत वाटते ती याची की एक जोरदार जोष मिळायला पाहिजे तो मिळत नाही. याबद्दल बराचसा दोष प्रेक्षकांचा आहे. त्यांना धकाधकीच्या जीवनात विचार करायला वेळ नाही. ज्या पठडीतलं नाटक आहे ते त्या पठडीत ते नाही enjoy करत. त्यामुळे मनोरंजन म्हणून सवंग विनोदाला प्रचंड हसतात. मराठी नाटक करण्याचा criteria, हा कंपनीच्या बसवर मावेल तितक्याच सामानावर अवलंबून असतो.

रसिका जोशी हिने प्रेक्षकांना मनापासून भावलेल्या 'सुरणाच्या भाजीचे' गाणे सादर करून प्रेक्षकांच्या आनंदाला जणू फोडणीच दिली.

तर मंडळी अशा या नात्याचा घट्ट असा, नेहमीचा पीळ असणारा, पण तरीही आगळा वेगळा, भावनांमध्ये गुंतून पडणाऱ्या, 'प्रपंच' मालिकेतील सर्व कलाकारांना सुयश चिंतून, माझा प्रश्नोत्तराचा विणलेला गोफ पूर्ण करते.

**सौ. विशाखा देशपांडे**
१५, जीवनसरिता, स्टेट बँकेजवळ,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

•••

With Best Compliment From

**MR. R.R. SUBRAMANYAM**
**&**
**SONS**

With Best Compliment From

**M/s. KUNAL PACKAGNG**

205, Tirupati Indk. Premises,
Co-op. Society Ltd.
Subhash Nagar, Bhandup (W)
Mumbai 400 028.
Tel. : 564 1483

**MFG. OF METAL LIDS CAP SEALS,**
**METAL COMPONTENTS.**

With Best Compliments From

**Hirect Employees co-op.**
**Credit Socitry**

Laje Road, Bhandup
MUMBAI 400 078.

With Best Compliment From

**SAIRAJ ENTERPRICES**

*Manufacturer of*
Computer Contineous Forms
Multicolour Pre-printed Forms
Copier Paper & other stationary

*Office*
1/19, Anand Bhuvan,
Indira Nagar, Kanjurmarg (E.),
Mumbai 400 042.

*Works*
A-2, Promise No.1,
Gautam Chemical Compound,
I.B. Patel Road, Goregaon (E.)
Mumbai 400 063.

*Telephone*
Off. 577 15 36, 517 30 68
Pager : 9602 -174971

With Best Compliment From

**Allied Aluminium**

440. Duncan Road,
Next to Dena Bank
Mumbai 400 004.

घरातल्या वातावरणाचा लहान मुलांवर मोठा परिणाम होतो.

# त्रिकोणमितीय गुणोत्तरांचे अध्यन

सौ. विशाखा देशपांडे

*'त्रिकोणमितीय गुणोत्तरांचे अध्ययन' या शैक्षणिक साधनाची निर्मिती करणाऱ्या सुहासिनी पवार यांच्याबद्दल -संपादक*

इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या नवी मुंबई हायस्कूल, वाशीच्या विज्ञान शिक्षिका सौ. सुहासिनी विलास पवार यांनी 'त्रिकोणमितीय गोणोत्तरांचे अध्ययन' या शैक्षणिक साधनाची निर्मिती केली. या निर्मितीला कळवा येथे आयोजित १९९८-९९ या वर्षाच्या ठाणे तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले व जिल्हा स्तरावर निवड झाली.- संपादक



सौ. सुहासिनी पवार

वाडा येथे ठाणे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन १९९८-९९ मध्येही त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळून ठाणे जिल्ह्याच्या वतीने राज्य स्तरावर निवड करण्यात आली. त्यांच्या याच निर्मितीला इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित आर्यभट्ट विज्ञान मार्गदर्शक शिक्षकाचा बहुमानही प्राप्त झाला.

खामगाव, जिल्हा बुलढाणा येथे १९९८-९९ या वर्षाच्या २४ व्या महाराष्ट्र राज्य विज्ञान प्रदर्शनात त्यांनी ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. त्यातही त्यांच्या या निर्मितीला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले व त्यांची पश्चिम भारत विज्ञान जत्रेसाठी निवड करण्यात आली.

मुंबई मराठी विज्ञान परिषदेनेही २५ एप्रिल १९९९ रोजी हरिभाऊ मोटे पारितोषिक देऊन त्यांना सन्मानित केले.

नेहरू सायन्स सेंटर, मुंबई येथे दि. ७ ते ११ डिसेंबर १९९९ या कालावधीत भरविण्यात आलेल्या इंटेल सायन्स टॅलेंट डिस्कव्हरी फेअर १९९९-२००० (पश्चिम भारत क्षेत्र) मध्ये त्यांना प्रथम पारितोषिकाचा बहुमान प्राप्त झाला असून त्यांची १३ फेब्रुवारी २००० मध्ये दिल्ली येथे नॅशनल कौन्सिल ऑफ सायन्स म्युझिअमस् द्वारा आयोजित करण्यात येणाऱ्या इंटेल नॅशनल सायन्स टॅलेंट डिस्कव्हरी फेअर २००० (अखिल भारतीय विज्ञान जत्रा-२०००) साठी निवड करण्यात आली.

नॅशनल सायन्स सेंटर, दिल्ली येथे नॅशनल कौन्सिल ऑफ सायन्स म्युझिअमस् व इंटेल यांच्या विद्यमाने १३ ते १६ फेब्रुवारी २००० मध्ये भरविण्यात आलेल्या इंटेल इंटरनॅशनल सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग फेअर्स यांच्याशी संलग्न इंटेल सायन्स टॅलेंट डिस्कव्हरी फेअर २००० (अखिल भारतीय विज्ञान जत्रा) येथेही तृतीय क्रमांकाचा बहुमान प्राप्त झाला व सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले.

यासंदर्भात नंतर इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशन, इंडियन एज्युकेशन सोसायटी, संस्कारभारती

आदी संस्थांनी देखील विशेष सन्मान केला.

या त्यांच्या यशाबद्दल 'दिशा'तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन! त्यांनी सादर केलेल्या प्रकल्पासंबंधीची माहिती विद्यार्थी व अध्यापकांच्या अध्ययनासाठी देत आहोत.

**शैक्षणिक उद्दिष्टे :-**

१) त्रिकोणमिती दृश्य स्वरुपात स्पष्ट करून संकल्पना दृढ करणे.

२) त्रिकोणमितीचे उपयोजन विद्यार्थ्याला करता यावे म्हणून त्रिकोणमिती अध्ययनाचा पाया पक्का करणे.

३) संकल्पना, गुणोत्तरांच्या किंमती, कर्ण स्थिर ठेवल्यास कोन व गुणोत्तरे यातील संबंध स्पष्ट करणे.

४) मनोरंजक पद्धतीने विषय दृढ करण्याच्या उद्देशाने अध्यापन करणे.

**वैज्ञानिक सिद्धांत :-**

30°-60°-90° च्या काटकोन त्रिकोणात 30° च्या कोनासमोरील बाजू कर्णाच्या निम्मी असते, तर 60° च्या कोनासमोरील बाजू कर्णाच्या √3/2 पट असते.

दुसऱ्या शब्दात x अक्षाशी 30° चा कोन करणाऱ्या रेषेवरील आरंभबिंदूपासून r अंतरावर असलेल्या बिंदूचे निर्देशक (√3/2 r, r/2) असतात.

**उपयोजित साहित्य :-**

सोबतच्या आकृतीत दाखविलेले शैक्षणिक साहित्य आकार 30" X 30"

**साहित्यात वापरलेल्या वस्तू :-**

नायलॉनचा दोरा, दोलक, खिळे, मणी, 30" X30" चा 6 mm चा प्लाय, किंवा ४ रंगी कापडाची खोळ, पुठ्ठा, स्टॅण्ड, दोरा, दोलक, ड्रॉइंगपिन्स याखेरीज मूळ संकल्पनेचा विचार कायम ठेऊन उपलब्धतेनुसार विविध प्रकारे साहित्याची मांडणी करता येईल.

**अप्रत्यक्षवापरलेल्या वस्तू :-**

ऑईलपेंट, ॲल्युमिनियम, फ्रेम-पट्टी, ब्रश, स्क्रूज, हुक्स इ.

**सोबतचे तक्ते :-**

त्रिकोणमितीय गुणोत्तरांच्या विविध कोनासाठीच्या किंमती, समीकरणे व सूत्रे व्यक्त करणारे 18" X 12" चे 8 तक्ते.

**रचना :-**

आकृतीत दाखवल्याप्रमाणे 30" X 30" च्या 6mm प्लायवर X व Y अक्षांवर 5cm=1 एकक याप्रमाणे 0,1,√2,√3,2,2√2,3,2√3,4,3√2,5,3√3,4√2,6...... याप्रमाणे या अंकांची स्थापना केलेली आहे व अनुक्रमे 0°,30°,45°,60°,90°,120°,135°,150°,180°,........ असे आकृतीत दाखविल्याप्रमाणे या अक्षांवर 2 एकक, 4 एकक व 6 एकक अंतरावर बारीक खिळे ठोकलेले आहेत. आरंभबिंदू (0,0) वर छिद्रातून नायलॉनची दोरी वर काढून त्यावर अनुक्रमे 1, 2, 3 ......., 13, 14, 15 एकक अंतरावर मणी घट्ट बसविलेले आहेत. प्रत्येक मणी एकक अंतर व्यक्त करतो. त्यामुळे X व Y अक्षांव्यतिरिक्त नायलॉनच्या दोरीवर देखील एकके व्यक्त होतात, त्यामुळे कर्णाची लांबी निश्चित करता येते. याच नायलॉनच्या दोरीच्या दुसऱ्या टोकाशी दोलक जोडलेला आहे. त्यामुळे दोरीच्या सहाय्याने सरळ रेषा स्पष्ट होतात.

(0,0) या आरंभबिंदूतून अशाच प्रकारे आणखी एक नायलॉनची एकके व्यक्त करणारी दोरी घेतल्यास sin(A+B) च्या किंमती काढणे देखील या साधनाद्वारे शक्य होऊ शकेल.

---

**कार्यशैली :-**

गुणोत्तर म्हणजे काय? तसेच √2 व √3 लांबीचे रेषाखंड काढण्याच्या पद्धतीचे पूर्वज्ञान विद्यार्थ्याला आहे हे जाणून घेतल्यानंतर काटकोन त्रिकोणातील एका लघूकोनाला Ø° चा कोन असे संबोधल्यास त्या अनुषंगाने त्या कोनाच्या बाजूंना कोणती संबोधने द्यावीत हे विद्यार्थ्यांकडून जाणून घेऊन त्रिकोणमितीच्या सहाही गुणोत्तरांची ओळख विद्यार्थ्यांना करून देता येईल. त्यानंतर प्रस्तुत शैक्ष. साधनाचा वापर करता येईल. नायलॉनच्या दोरीने X अक्षाशी 30° चा कोन कायम ठेवून अनुक्रमे 2, 4, 6 एकक अंतरावर असलेल्या खिळ्यांवर दोरी अडकवली असता दोरीवर कर्णाची लांबी तर X व Y अक्षांवर समोरील बाजू व लगतची बाजू यांच्या किंमती मिळतात. अशाप्रकारे त्रिकोणमितीच्या सर्व गुणोत्तरांच्या किंमती विशिष्ट कोनासाठी स्थिर कशाप्रकारे येतात हे स्पष्ट करता येते.

याशिवाय कर्ण स्थिर ठेवला तर जसजसा कोन कमी किंवा अधिक होतो तसतसा त्रिकोणमितीच्या सर्व गुणोत्तरांच्या किंमतींवर होणारा परिणाम आणि कोन व गुणोत्तरे यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करता येतो. हे स्पष्ट करतांना पुस्तकातील प्रचलित आकृत्यांतून एकापेक्षा अनेक त्रिकोण डोळ्यासमोर दिसत असल्याने संबोध स्पष्ट होण्यास अडचण निर्माण होते. या उलट प्रस्तुत साधनाचा वापर करून बदलत जाणारा परंतु एकावेळी एकच त्रिकोण दाखविता आल्याने ही संकल्पना स्पष्ट होण्यास अधिक मदत होते.

0°, 90° कोनांच्या बाबतीत गुणोत्तरांच्या किंमती काढताना त्रिकोण काढता येत नसल्याने दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करता त्यांना अमूर्त कल्पना मूर्त स्वरूपात डोळ्यासामोर आणता येत नाही. अशावेळी या साहित्याद्वारे 0° व 90° ची त्रिकोणमितीय गुणोत्तरे स्पष्ट करता येतात. उदा. cot90°, tan0°, Ø° इ.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, ज्या खिळ्यावर दोरी अडकवून काटकोन त्रिकोण तयार करतो त्या खिळ्याच्या बिंदूच्या X व Y निर्देशकांच्या सहाय्याने गुणोत्तराचे अध्यापन करता येते. तसेच हे शैक्षणिक साधन 360° पर्यंतच मर्यादित न ठेवता तसेच sin(A+B) वगैरे गुणोत्तर यासारख्या Advanced Trignometry Teaching साठीही वापरता येते.

त्रिकोणमितीची सर्व समीकरणे व सूत्रे यांच्या सहाय्याने अधिक प्रभावीपणे शिकवता येतात.

**उपयोग व महत्त्व :-**

१) त्रिकोणमिती दृश्य स्वरूपात दाखविता आल्याने संकल्पना अधिक दृढ करता येते.

२) Ø° च्या कोन स्थिर ठेवल्यास गुणोत्तरांच्या किंमती स्थिर येतात हे स्पष्ट करता येते.

३) कर्ण स्थिर ठेवून कोन बदलत गेल्यास विविध गुणोत्तरांच्या किंमती कशाप्रकारे बदलत जातात हे प्रभावीपणे स्पष्ट करता येते.

४) गुणोत्तरे व त्रिकोणमितीय सूत्रे व समीकरणे परिणामकारकरीत्या अभ्यासता येतात.

५) विद्यार्थ्याला स्वत:ला देखील मदतीसाठी हे साहित्य घरच्या घरी टाकाऊ वस्तूंच्या सहाय्याने पुठ्ठ्यावर देखील करता येईल.

६) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना निर्देशक पद्धतीचा वापर करून Advanced Trignometry Teaching साठी देखील या साहित्याचा वापर करता येतो.

७) पाया पक्का झाल्याने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्रिकोणमितीचे उपयोजन करणे सोपे जाईल.

८) शिक्षकांना हे साधन सहजरित्या उपलब्ध होणारे असल्याने अधिक मनोरंजक पद्धतीने अध्यापन करता येईल.

९) अमूर्त कल्पना मूर्त करणे म्हणजेच दृश्य स्वरूपात आणणे सहज शक्य झाल्याने संकल्पना दृढ करण्यासाठी हे शिक्षकांना वापरता येईल.


१०) शालेय विद्यार्थ्यांच्या मनातील त्रिकोणमिती या विषयाची अकारण भीती वेळीच नष्ट झाल्याने पुढे त्रिकोणमिती त्यांना आवडीने अभ्यासता येईल.

**सौ. सुहासिनी विलास पवार यांचा पत्ता**
आय.ई.एस. नवी मुंबई हायस्कूल, वाशी,
नवी मुंबई, वाशी -४००७०३,
घरचा पत्ता :
RH-I, L-21, Sector-7, Vashi.
Phone No.: 782 0995

**सौ. विशाखा देशपांडे**
१५, जीवनसरिता, स्टेट बँकेजवळ,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

***

# त्रिकोणमितीय गुणोत्तरांचे अध्ययन



हसण्यात वेळ घालावा. कारण हास्य आत्म्यांचे संगीत आहे.

With Best Compliment From

**Mr. Shringarpure**

With Best Compliments From

**AMARSHI J. KARIA**
(SPECIAL EXECUTIVE OFFICER)

*PRESIDENT :*
SUGAR NOMINEE ASSOCIATION
*PRESEDENT :*
MARUTI GRAIN ASSOCIATION
*CHAIRMAN :*
MAYUR CONSUMER'S CO.OP. SOC.
*JT. SECRETARY :*
FEDERATION OF GRAIN DEALERS ASSOCIATION & CONSUMER CO-OPERATIVE

***OFFICE***
"GANESH SMRUTI",
MAHARASHTRA NAGAR, BHANDUP,
MUMBAI 400 078.
TEL. : (O) 590 5011 / 590 5012 (R) : 541 2103

With Best Compliment From

**A.P. Taraporewala & Sons Pvt. Ltd.**
**Exchange Brokers**

Navsori : K.K. Chambers, Gr. Floor,
Purushattamdas Thakardas Marg,
Off. D.N. Road, Fort,
Mumbai 400 001.

With Best Compliment From

**Vrajlal Thakkar**
**&**
**Co.**

Prakash Chmabers, 1st floor,
77, Nagindas Master Road,
Mumbai 400 023.

**Phones : 2652005, 2651158,**
**2631553, 26331554**

नामस्मरण हा भक्तीचा अत्यंत सोपा प्रकार.

# परिसर वार्ता

**सौ. विशाखा देशपांडे**

पावसाळा संपतो संपतो असा फक्त आभास निर्माण झाल्याचं जाणवलं. परंतु मधून मधून झोडपून काढणाऱ्या जोरदार सरी, दिवसभराचा जीवघेणा उकाडा दूर सारत येणारा संध्याकाळचा गारवा आणि ते अनुभवत असतांनाच पटकन सरूनही गेलाला गणेशोत्सव व शारदीय नवरात्रोत्सव! हे दोन्ही उत्सव इतके पटकन येऊन पटकन संपले की समजलं सुद्धा नाही. आता दिवाळीच्या आगमनाची लोक वाट पाहातायत. पूर्वी, आमच्या लहानपणी, पावसाळ्यात गणेशोत्सव पार पडायचा, पावसाळा, पितर पक्षापर्यंत संपला की शरद ऋतुच्या 'गर्मी का चटका' जाणवत प्रसन्नपणे नवरात्र उभे राहायचे. ते संपते न संपते तो शरद पौर्णिमा साजरी करण्यासाठी जागराची तयारी. विविध कार्यक्रम, खेळ यांची आखणी आणि तो उत्सव संपतो न संपतो तोच कडाक्याच्या पण आल्हाददायक अशा थंडीत दिवाळीचे स्वागत व्हायचे.

हल्लीच्या वेगवान जमान्यात सगळ्याच गोष्टी इतक्या गतिमान झाल्या आहेत की कुठल्याही गोष्टींसाठी रेंगाळायचे नाही. जे आहे ते स्वीकारून पुढे चालायचे, मग तो जीवनात आनंद फुलवणारा अनुभव का असेना. त्याचा मन भरून आस्वाद घेण्याची सवयच या मानवाची मोडलीय जणू. मग या वेगवान युगात ऋतुचक्राने ही आपला नंबर लावून मानवाच्या जीवन पद्धतीप्रमाणे स्वतःला 'मोल्ड' करून घेतले आणि कुठेही न रेंगाळता आपली गति मानवीजीवन शैली प्रमाणे सिंक्रोनाइज केली.

ऋतुचक्र, आपली जगण्याची गति, याला अनुसरून परिसरात घडत असलेला गेल्या काही दिवसांचा हा आढावा -

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इं.मि. स्कूल**

* मैत्रेयी शेवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार जिल्हा बहुविध क्रीडा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय पोहण्याच्या स्पर्धेत सौ. आनंदीबाई केशव जोशी इं.मि. शाळेचा विद्यार्थी कु. संजय वलेकर, इ. ८ वी याने नेत्रदीपक यश मिळवले.

    १) १०० मि. ब्रेस्ट स्ट्रोक - प्रथम क्रमांक
    २) २०० मि. ब्रेस्ट स्ट्रोक - प्रथम क्रमांक
    ३) २०० मि. इंडिव्हिज्वल मिडले - द्वितीय क्रमांक

    अशी बक्षिसे मिळवून राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी नाशिक विभागातून त्याची निवड झाली.

* रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थने ४/९/२००० रोजी आयोजित केलेल्या शिक्षक दिनाच्या दिवशी शाळेच्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले व शाळेच्या शिक्षिका तेजस्विनी तेलंग यांना आदर्श शिक्षिक पुरस्कार मिळाला. तसेच ब्राह्मण सेवा संघाने आयोजित केलेल्या शिक्षक दिनाच्या दिवशी शाळेतील शिक्षिका कमल महेश्वरी यांना आदर्श शिक्षिक पुरस्कार मिळाला.

* विद्याप्रसारक मंडळाने ५/९/२००० रोजी आयोजित केलेल्या शिक्षक दिनी १० वर्षे सेवा पूर्ण केल्याबद्दल सौ. स्मिता पिंगळे यांचा सत्कार करण्यात आला तर विद्याप्रसारक मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी सौ. अपर्णा भोळे यांची निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

* मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये झालेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत शाळेतील मुलांनी भाग घेतला.

---

पदवी म्हणजे ज्ञानाचा पुरावा नव्हे.

* आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत शाळेच्या संघाने तालुका पातळीवर प्रथम क्रमांक मिळवला व जिल्हापातळीसाठी संघाची निवड झाली. संघाचे नेतृत्व इ. ९वी 'अ' मधील विद्यार्थी सौरभ गायकवाड याने केले.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभाग**

* डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभाग, सौ. विनोदिनी सं. राणे यांनी दिलेल्या माहितीनुसार 'कुमार कला केंद्र' तर्फे आंतरशालेय विविध गुणदर्शन स्पर्धा-२००० चे आयोजन सप्टेंबर महिन्यात करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षी सुद्धा अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्साहाने भाग घेतला होता. त्यापैकी खालील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उज्वल यश संपादन केले.

**विविध वेशभूषा स्पर्धा**

प्रथम क्रमांक :- श्रद्धा कुंभार

प्रथम क्रमांक :- अजिंक्य कुंभार

**गीत गायन स्पर्धा**

द्वितीय क्रमांक :- चैत्राली मुसळे

**वक्तृत्व स्पर्धा**

प्रथम क्रमांक :- अजिंक्य कुंभार

द्वितीय क्रमांक :- अजित साळुंखे

* 'स्त्री कल्याण संघटना', ठाणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा हनुमान व्यायाम शाळा येथे झाल्या. वक्तृत्व स्पर्धेत विभागातील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन यश संपादन केले. स्पर्धेत दिलेल्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. स्पर्धेतील विजयी विद्यार्थी पुढीलप्रमाणे :-

१) अनिश राणे, २) अमोल पवार, ३) सोनल दावके.

* दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षीही गणेश उत्सव प्राथमिक विभागातर्फे साजरा करण्यात आला. गणेश मूर्तीचे आगमन ढोल-ताशे वाजवून करण्यात आले. माध्यमिक विभागातील मुले लेझीम खेळत होती. संस्थेच्या 'विद्यालंकार' हॉलमध्ये श्री गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. गणेश मूर्तीची सकाळ संध्याकाळ पूजा करून आरती म्हणण्यात येत होती. ह्या वेळेस विभागातील शिक्षकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता ४ थी च्या विद्यार्थ्यांकडून अथर्वशीर्ष म्हणून घेण्यात आले. दीड दिवसांनी गणेश मूर्तीचे विसर्जन केले.

* ह्यावर्षी प्रथमच प्राथमिक विभागात शारदोत्सव साजरा करण्यात आला. आश्विन शुद्ध प्रतिपदा या दिवशी 'सरस्वतीची मूर्ती' स्थापन करण्यात आली. सकाळ व दुपार विभागातील शिक्षकांनी दर दिवशी देवीपुढे सुंदर आरास केली होती. विविध फुलांची रांगोळी देवीपुढे काढण्यात येत होती. प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थी ठरवून दिलेल्या दिवशी आरती करण्यास एकत्र जमत होते. आरतीनंतर विद्यार्थ्यांना प्रसाद वाटला जात होता. शारदोत्सवातील एक सांस्कृतिक उपक्रम 'भोंडला' दि. ४/१०/२०००, बुधवार रोजी साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थी इयत्तेप्रमाणे हॉलमध्ये एकत्र जमले. सुरुवातीस मुलींनी फेर धरून भोंडल्याची गाणी म्हटली, नंतर मुला-मुलींचा रासगरबा घेण्यात आला. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना खिरापत वाटली.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर, माध्यमिक विभाग**

* २ ऑगस्ट २००० रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त हस्ताक्षर स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. वक्तृत्व स्पर्धेत इ. ५ वीतून अनुराधा ओगले, सागर चांदे, इ. ६ वीत सायली संजीव श्रोत्री, इ. ७ वीत दुर्गेश देशपांडे, इ. ८ वीत सिद्धिका घैसास, इ. ९ वीत प्रेरणा काब्रा यांना प्रथम पारितोषिके प्राप्त झाली.

* टिळक पुण्यतिथीचे औचित्य साधून श्री. वि. ह. भूमकर यांचे व्याख्यान आयोजित केले गेले. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'व्याख्याने तुम्हाला सर्वकाही देऊ शकतात. तुमची ऐकण्याची तयारी हवी. स्वातंत्र्य

मिळवण्यासाठी अनेक लोकांची आहुति गेली. त्या लोकांचे आपण देणं लागतो. त्यांचे नुसते स्मरण करून, त्यांच्या फोटोला हार तुरे घालून काम होणार नाही. तर त्यांचे कार्य पुढे नेणे, त्यांचे विचार आचरणात आणणे हे करून देशाचे देणे परत करायला हवे. सामान्य असाल तर असामान्यांचे अनुयायी व्हा. षंढ, नामर्द होऊ नका. निर्भय बना. सत्याची कास धरा. स्वराज्याचा पाया लो. टिळकांनी घातला. स्वराज्य मिळालं पण ते सुराज्य करणं आपल्या हाती आहे. आपले कर्तव्य आहे. ते पार पाडलं पाहिजे.' जाता जाता ते असंही म्हणाले की, 'लहानपणचे संस्कार अत्यंत महत्वाचे. खोड्या अशा करा की त्याचा आपल्याला त्रास होईल व दुसऱ्यांना आनंद मिळेल.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. निर्मला वाघ व स्वागत सौ. सुनंदा गोतावळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक श्री. प्र. बा. कुळकर्णी यांनी करून दिला व आभार प्रदर्शन सौ. उज्वला ताम्हणे यांनी केले.

* सालाबादप्रमाणे याहीवर्षी इ. ९ वी 'अ', 'ब' च्या विद्यार्थिनी येऊर येथील विवेकानंद बालकाश्रमात रक्षाबंधन कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. प्रास्ताविक व स्वागत तेथील कार्यकर्त्या सौ. जया वैद्य यांनी केले. ईषस्तवन, गुरूचरित्राच्या १४ व्या अध्यायाचे सामूहिक पठण व दत्तात्रय स्तोत्राच्या पठणाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आपल्या शाळेतील शिक्षिका सौ. ज्योती सोमण यांनी केले. सुरुवातीला मा. श्री. भगवानराव पटवर्धन व आश्रमातील कार्यकर्ते यांचे स्वागत करण्यात आले. आपल्या शाळेतील शिक्षिका कै. सौ. शुभदा दाते यांनी या कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवली तो आजतागायत चालू आहे व पुढेही चालू राहील अशी शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांतर्फे ग्वाही देण्यात आली. ९ वी 'अ' तील आश्लेषा बेरेकर हिने याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. सौ. मंजिरी दांडेकर यांनी एकात्मता गीत सादर केले व इतर मुलांनी त्याचे समूहस्वरात गायन केले. यानंतर निवृत्त शिक्षक श्री. सुहास साठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व आश्रमास देणगी जाहीर केली. बालकाश्रमातील दत्ता सांगोळका यानेही उत्स्फूर्तपणे आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर रक्षाबंधनाचा व उपस्थितांचा सत्कार असा समारंभ झाला. समारोपप्रसंगी मा. श्री. भगवानराव पटवर्धन यांनी प्रार्थनेचे महत्व सांगून 'दूरदर्शनच्या विळख्यात अडकू नका. दूरदर्शनवरील चांगले तेवढे घ्या व आचरणात आणा' असे सांगितले. आभार प्रदर्शन पर्यवेक्षक श्री. प्र. बा. कुळकर्णी यांनी केले.

* विवेकानंद केंद्रातर्फे उतारा पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. त्या स्पर्धेत आपल्या शाळेतील पुढील विद्यार्थी बक्षिसपात्र ठरले :- अनुराधा ओगले (५ अ) प्रथम क्रमांक, दिपिका पाटील (६ अ) तृतीय क्रमांक, विराज दामले (५ अ) उत्तेजनार्थ.

* ठाणे जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे पावसाळी क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यात १४ वर्षाखालील मुलींचा संघ कबड्डी स्पर्धेत तालुका स्तरावर उपविजयी ठरला तर १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने तालुका स्तरावर रोमहर्षक विजय प्राप्त केला. यांना श्री. गवई, श्री. गदरी, श्री. पांचाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

* ३१ ऑगस्ट २००० रोजी गणरायाचे वाजत गाजत लेझिमच्या तालावर आगमन झाले. सजावटीची बाजू डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा. वि.) ने सांभाळली. दि. २ सप्टेंबर २००० रोजी सामूहिक आरती, अथर्वशीर्ष पठण घेऊन शिस्तबद्ध रीतीने गणरायाचे विसर्जन झाले.

* हिंदू जागृती गणेशोत्सव मंडळाने यंदा नृत्य, नाट्य, गायन, वादन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धांमध्ये नृत्य स्पर्धेत कु. तेजस्वी दावके हिला प्रथम पारितोषिक, वादन स्पर्धेत कु. हिमांशू भिडे यास द्वितीय पारितोषिक

दिव्याची काच लख्ख असून भागत नाही, आत ज्योत ही हवीच.

प्राप्त झाले. नाट्यस्पर्धेत रोहन टिल्लू यास स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप आहे.

* याच मंडळातर्फे ठाण्यातील अष्टविनायक दर्शन सायकल मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत आपल्या शाळेतील सचिन भाईदास पाटील (१० वी 'ब') यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रू. ७५१/- व प्रशस्तीपत्र प्राप्त झाले.

* कुमार कला केंद्र, मुंबई आयोजित वक्तृत्व स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. दिपिका पाटील (६ वी 'अ'), रोहन शास्त्री (८वी 'क'), नीता फाटक (१० वी 'अ') हे विद्यार्थी सर्वप्रथम आले. कीर्ती सुरपूर (७ वी 'अ') हिला उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक प्राप्त झाले.

* डोंबिवली येथे आंतरशालेय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत आपल्या शाळेतील शशांक केतकर (१० वी 'ब') यास १०० मी. बॅकस्ट्रोक, २०० मी. बॅकस्ट्रोक, २०० मी. वैयक्तीक मिडले या प्रकारात द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले व नाशिक येथे होणाऱ्या जिल्हास्तरावरील स्पर्धेसाठी निवड होऊन तेथेही वरील प्रकारात द्वितीय क्रमांक प्राप्त होऊन आता पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

* आय. पी. एच्. संस्थेतर्फे इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांकरता मनोविकासावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रम छोटे संवाद व तक्ते यांच्या माध्यमातून सादर करण्यात आला.

* डेव्हलपमेंट डिसिप्लीन डायनामिझम तर्फे घेण्यात आलेल्या ऑल इंडिया फुल कॉन्टॅक्ट कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत कु. प्राजक्ता चंद्रराव हिस रौप्य पदक प्राप्त झाले. तसेच रॉयल टायगर कराटे मार्शल आर्ट असो. या संस्थेतर्फे यलो बेल्ट व ग्रीन बेल्ट ही प्राप्त झाला.

* दि. २३ सप्टें. २००० रोजी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिका व हस्तलिखितांचे प्रकाशन वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. अ. धों. टिल्लू यांच्या हस्ते झाले. भित्तीपत्रिकांचे विषय पुढील प्रमाणे :- आविष्कार (मराठी) - पु.ल. देशपांडे विशेषांक, नवनीत (हिंदी) - प्रदूषण(जल, वायू), बर्डस् अॅण्ड फ्लॉवर्स (इंग्रजी) - रशियन पाणबुडी कर्स्क (द कर्स ऑफ कर्स्क), विज्ञान - जनुके. हस्तलिखितांसाठी :- माझे शालेय जीवन (५ वी), पर्यावरणाचा वारसा (६/७ वी), गुणवत्ता यादीला पर्याय असावा की नसावा (८ ते १० वी 'अ', 'ब'), बदलते ठाणे (८ ते १० वी 'क', 'ड', 'इ').

आपल्या भाषणात श्री. टिल्लू सरांनी हस्तलिखिते कधीपासून सुरू झाली, त्याचा विकास कसा झाला, याचा थोडक्यात आढावा घेतला व 'लिहिते व्हा' असा संदेश दिला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. गावित यांनी केले. सौ. सोमण यांनी संपादकीय मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख मुख्या. सौ. सविता केळकर यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. प्र. बा. कुळकर्णी यांनी केले.

**कलामंडळाचा उद्घाटन समारंभ**

* कु. शिल्पा ल. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार सालाबादप्रमाणे यंदाही बा. ना. बांदोडकर महाविद्यालयातील कला मंडळाचा उद्घाटन समारंभ १० ऑगस्ट २००० रोजी संपन्न झाला. वर्षभर होणाऱ्या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांची ही नांदी होती. विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना सादर करण्यासाठी एक उत्कृष्ट असं व्यासपीठ उपलब्ध झालय.

यावर्षीच्या कलामंडळाचं, 'आकांक्षाचं' उद्घाटन प्राचार्य सी. जी. पाटील यांनी दीप-प्रज्वलन करून केले. त्यानंतर प्राध्यापक डॉ. आठल्ये यांनी यावर्षीचे कल्चरल सेक्रेटरी व जॉइन्ट सेक्रेटरी यांची नावे जाहिर केली. यावर्षीचा 'कल्चरल सेक्रेटरी' क्लिफर्ड जॉर्ज तर 'जॉइन्ट सेक्रेटरी'

शिल्पा पै झाले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. स्वागत गीत मानसी गलगलीने सादर केले. स्वागत गीतानंतर फॅशन शो सारखा बहारदार कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम यशस्वी ठरवण्यात शिल्पा लेलेचा मोठा वाटा होता. त्यानंतर स्वप्ना आणि श्रुपचे 'कही करता होगा वो मेरा इंतजार' हे नृत्य सादर झाले. तसेच ज्योती भंडारीने कुचिपूडी नृत्यातील कलकी अवतार व मत्स्य अवतार सादर केले.

या नृत्यानंतर हिंदी तसेच मराठी गीतांची सुरेख मैफल सजली. यात पंछी नदिया पवन झोके आणि बीजूरीया, ही गाणी सागर बद्री याने सादर केली तर शारद सुंदर चंदेरी राती आणि ये मेरा दिल प्यार का दिवाना, ही गाणी मानसी गलगलीने सादर केली. तसेच चांदणे शिंपीत जा तू... हे गाणे दर्शनाने सादर केले.

या मैफलीनंतर सम्रक थरवळकरचा एकपात्री प्रयोगही अतिशय सुंदर झाला. तसेच प्राजक्ता केळकरनेही 'मीसेस दंतेंचा' एकपात्री प्रयोग सादर केला.

या एकपात्री प्रयोगानंतर वैभव जाधवने फुयशन नृत्य सादर केले. या नृत्यामध्ये सर्वांच्या हृदयावर राज्य करणाऱ्या ऋतिक रोशनच्या नृत्याचाही समावेश होता. त्यामुळे काही वेळ खरोखरच न्युझीलंडमधील पबमध्ये गेल्यासारखे वाटले.

या कार्यक्रमाचा शेवट 'हंगामा' या आणखीन एका बहारदार कार्यक्रमाने झाला. तसेच या कार्यक्रमाचे निवेदन शिल्पा पाटील हिने केले.

हा कार्यक्रम संपतांना प्रेक्षकांच्या मनात काहीशी हुरहुर निर्माण झाली होती. पण वेळेच्या बंधनामुळे कार्यक्रम संपवणे अपरिहार्य ठरले.

## कु. मानसी गलगली

* बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात तृतीय वर्षात (गणित-पदवी वर्गात) शिकत असणारी मानसी गलगली मुंबई विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन शास्त्रीय संगीत स्पर्धेत प्रथम क्रमांकावर आली आहे. विद्यापीठ विद्यार्थी भवन येथे १९ सप्टेंबर रोजी झालेल्या स्पर्धेत ३५ ते ४० महाविद्यालये सहभागी झाली होती. स्पर्धेचे हे ३३ वे वर्ष होते. स्पर्धेत परीक्षक म्हणून श्रुती सडोलीकर, विद्याधर व्यास व चंद्रकांत लिमये यांनी काम पाहिले. मानसीने राग बिहाग सादर केला होता. ती पंडीत राम देशपांडे यांच्याकडे शिक्षण घेत आहे.



कु. मानसी गलगली

मानसीची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी झालेली निवड आम्हाला निश्चितच अभिमानास्पद आहे, असे सांगून महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी तिचे अभिनंदन केले.

याच वर्षी आंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक (सुगमसंगीत स्पर्धेत) मानसीला मिळाले. याशिवाय विद्यापीठाच्या या स्पर्धात बांदोडकर महाविद्यालयास 'सारीपाट' एकांकिकेसाठी

---

असे जगावे की आपण मरतांना हसतमुख रहावे आणि जगाने आपल्यासाठी रडावे.

तिसरे, वैयक्तिक अभिनयासाठी प्राजक्ता केळकरला दुसरे, तर व्यक्तीगत स्पर्धेत दिनेश पेडणेकर याला तिसरे पारितोषिक मिळाले.

'दिशा' तर्फे सर्वांचे अभिनंदन!

**V.P.M's Institute of Management Studies**

दि. १०/०९/२००० रोजी आमच्या संस्थेतर्फे सकाळी ९.०० ते सायं. ५.०० या वेळात 'Advertising & Campain Planning' या विषयावर मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



'Advertising & Campain Planning'

कार्यशाळेची सुरूवात डॉ. वेडेकर यांच्या भाषणाने झाली. त्यानंतर ॲडव्होकेट श्री. फडके यांनी Communication Barriers या विषयावर आपली मते मांडली. तसेच श्री. बी. बी. कुलकर्णी (Trainer & Adviser - Banking & Finance) यांनी Sales Advertisment या विषयावर भरपूर उदाहरणे देऊन आपले विचार व्यक्त केले.

कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रात प्रा. राजयोग यांनी Advertising of Products या विषयावर Practical Session आयोजित केले होते. यामध्ये उपस्थित विद्यार्थ्यांचे गट पाडून Client Indentification, Ad-Show, Ad-Desining यासारखे उपक्रम उपस्थित विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सादर केले गेले व यातूनच त्यांना जाहिरात विषयासंदर्भात मार्गदर्शन केले गेले. विद्यार्थ्यांनी देखील या उपक्रमांना चांगला प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सांगता आमची विद्यार्थिनी कु. बिना भंडारी हीने केलेल्या आभार प्रदर्शनाने झाली.

दि. १३/०९/२००० रोजी आमच्या संस्थेतर्फे पदवीधर तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'Group Discussion & Techniques of Interview' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केले गेले.

दु. ३.०० ते रात्री ८.०० पर्यंत असलेल्या या चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात Toyo Engineering Ltd. चे Sr. Asso. Director श्री. जी. वाय. वानोडकर यांनी 'Techniques of Interview' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पदवीनंतर विद्यार्थ्यांपुढे मुलाखतीस सामोरे जाण्याचे आव्हान असते. आजच्या स्पर्धा युगात नोकरी मिळणे अत्यंत कठीण आहे. अशा परिस्थितीत मुलाखतीस सामोरे जाताना त्यांचा वेश कसा असावा, त्यांनी कसे वागावे, बोलावे, त्याचप्रमाणे प्रश्नानुरूप उत्तरे कशी द्यावीत इ. गोष्टींबद्दल महत्वपूर्ण सूचना त्यांनी दिल्या.

दुसऱ्या सत्रात आमच्या संस्थेचे संचालक श्री. वी. एन्. लाड यांनी नोकरीसाठी अर्जीत पदासाठी निवडप्रक्रीया किंवा M.M.S., M.B.A. सारख्या अभ्यासक्रमांसाठीच्या निवडप्रक्रीयेतील Group Discussion या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यानंतर प्रात्यक्षिकही घेण्यात आले. बारा मुलांचा जमाव करून त्यांना 'आजची शैक्षणिक परिस्थिती' या विषयी आपली मते लिहीण्यास सांगून नंतर त्याबद्दल खुली चर्चा करण्यात आली. या चर्चेनंतर आढावा घेतांना प्रा. लाड यांनी मुलांना पटवून दिले की, सध्याची पदवीपर्यंतची शिक्षणपद्धती कोणतीही क्षमता निर्माण करत नाही. म्हणूनच स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यासाठी

व्यवस्थापन तंत्राचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण यापुढे केवळ पदवीपर्यंतच्या शिक्षणाने रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळणे अशक्य आहे.

तिसऱ्या सत्रात प्रा. जे. वाय. मानकामे (Sr. Personnel Manager - Gharda Chemicals) यांनी व्यवस्थापन क्षेत्रात संधी व मुलांनी मुलाखतीला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याविषयी मार्गदर्शन केले.

चौथ्या सत्रात श्री. तुंगारे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धायुगात आत्मविश्वासाने वावरण्याविषयी मार्गदर्शन केले व आमच्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी, गणवेश, लेखन साहित्य व वह्या यांचा व्यवसाय करून मिळवीलेला अनुभव आणि त्यातून निर्माण झालेला आत्मविश्वास याविषयी माहिती दिली व यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये या Innovation Programme बद्दल उत्कृकता निर्माण झाली.

पाचव्या व शेवटच्या सत्रात श्री. राजयोग यांनी विदयार्थ्यांनी स्वत:मधले गुण ओळखून स्वत:च्या व्यक्तीमत्व विकासावर भर द्यावा याबद्दल आपली मते मांडली.

आमच्या संस्थेचा विद्यार्थी बीनू थॉमस याने केलेल्या आभार प्रदर्शनाने चर्चासत्राची सांगता झाली.

* सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात नगर जिल्ह्यातील अकोला, संगमनेर व कोपरगांव तालुक्यात पदवीधर बेरोजगारांसाठी Management Awareness चे आयोजन आमच्या संस्थेतर्फे करण्यात आले. आमच्या संस्थेचा विद्यार्थी महेंद्र व श्री. अरविंद यांनी नगर जिल्ह्यातील कॉलेजमध्ये जाऊन तेथील पदवीधरांचे पत्ते घेऊन त्यांना पत्रे पाठवीणे, कार्यक्रमाची प्रेस पब्लिसीटी करणे व याद्वारे १७० विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी जमवून अतिशय उत्तम प्रकारे कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. लाड व श्री. तुंगारे यांनी व्यवस्थापन अभ्यासक्रमाची



नाशिक येथील करिअर फेअर मधिल संस्थेचा सहभाग

आवश्यकता व V.P.M's I.M.S. तर्फे चालवले जाणारे सर्व अभ्यासक्रम यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

तालुका पातळीवर अशा प्रकारचे कार्यक्रम प्रथमच झाले, अशी प्रतिक्रीया तेथील प्राध्यापकांनी व्यक्त केली.

नाशिक येथे आयोजित केलेल्या 'करिअर फेअर' मध्ये देखील संस्थेने सहभाग घेतला.

* V.P.M's Institute of Management Studies मार्फत कर्जत तालुक्यातील चौधरीवाडी-धामणी या गावी स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी व आदिवासी लोक उपस्थित होते. येथील आदिवासी शाळेतील शिक्षक श्री. किसन दारोडा यांनी, सध्याच्या दहशतवादाच्या परिस्थितीत आपले स्वातंत्र्य कसे टिकवून ठेवले पाहिजे हे तेथील नागरिकांना पटवून दिले. स्वातंत्र्य दिनानिमित्त आदिवासी मुले व नागरिकांना बुंदीचे लाडू वाटण्यात आले. तसेच मागासवर्गीय कातकरी विभागातील १२० मुलांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.

---

प्रत्येक पिढी समजते की, मागची पिढी खुळी आणि आपण तेवढे शहाणे आणि पुढची पिढी बहकलेली.



कर्जत येथे साजरा केलेला स्वातंत्र्यदिन

**विधी महाविद्यालय, ठाणे.**

• **भावी वकीलांची शिक्षकांना मानवंदना :**

ठाणे विधी महाविद्यालयात ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला. भावी वकीलांनी शिक्षकांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.



ठाणे लॉ कॉलेज ५ सप्टेंबर रोजी साजरा झालेल्या शिक्षक दिना निमित्त

मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. नवरे मॅडम यांनी दीप प्रज्वलन करून केले. भक्ती या विद्यार्थीनीने सुरेल गीतातून शिक्षकांना मानवंदना दिली. आपल्या भाषणात प्राचार्या नवरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या भावी कारकीर्दीला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिक्षकांसाठी संगीतखुर्ची आणि प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे दाद देऊन कार्यक्रमात रंगत आणली.

नवरे मॅडम, श्रीविद्या मॅडम आणि गीता कुवसट मॅडम यांच्या संघाने प्रश्नमंजुषेचे विजेतेपद पटकाविले. संगीतखुर्ची स्पर्धेत प्रा. गद्रे यांनी बक्षिस मिळविले. उत्कृष्ट शिक्षक म्हणून प्रा. डॅनीयल तर उत्कृष्ट शिक्षिका म्हणून नवरे मॅडम यांना गौरविण्यात आले.

जनरल सेक्रेटरी दिलीप आस्वानी, विद्यार्थी प्रतिनिधी हेमंत ससाणे, नितू सावला, प्रिती बोंद्रे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. दीपक सोनावणे, राणे, रहीम खान, दिलीप आस्वानी यांनी शिक्षकदिनी शिक्षकांची भूमिका बजावली.

• **मैत्रीचे बंधन :** २८ ऑगस्ट रोजी विधी महाविद्यालयातर्फे 'फ्रेंडशिप डे' साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थी प्रतिनिधींतर्फे शिक्षकांना 'फ्रेंडशिप रिबीन' बांधून मैत्रीचे धागे घट्ट केले. विद्यार्थ्यांनी देखील एकमेकांना रिबीन बांधून आपल्या मित्रत्वाच्या भावना व्यक्त केल्या.

**तंत्रनिकेतन**

• आपल्या विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी एक 'सर्च परिषद' १८ ते १९ ऑगस्ट या दोन दिवशी आयोजित केली होती. ही परिषद महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ व TTTI, भोपाळ यांच्या संयोगाने आयोजिली होती.

चांगली गोष्ट पसरायला वेळ लागतो, पण वाईट गोष्ट मात्र चटकन पसरते.

या परिषदेस विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर व कार्याध्यक्ष श्री. टिळू यांनी उपस्थित राहून परिषदेस पाठिंबा दर्शविला. कोअर ग्रुपमधील प्राचार्य मुजुमदार, श्री. ओक (विभागप्रमुख, केमिकल इंजिनिअर), श्री. नवले, सौ. शानी, सौ. ए. जोसेफ हे सदस्य उपस्थित होते.

अभ्यासक्रमातील बदल/पुनर्रचनेसाठी वेगवेगळ्या रासायनिक कारखान्यांच्या गरजेनुसार हा बदल करावा, असे योजिले व त्यासाठी वेगवेगळ्या रासायनिक कारखान्यांशी संपर्क साधला गेला. यासाठी १५ रासायनिक कारखान्यांतून प्रश्नावली भरून घेण्यात आली. त्यापैकी ८ ते १० रासायनिक कारखान्यांचे प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित होते. त्यांची नांवे व कंपनी देत आहे:-

१) श्री. के. वाय्. मोहिते : Bayer India Ltd.

२) श्री. आर. जी. नेने : M/s S. H. Kelkar Co. Ltd.

३) डॉ. एच्. व्ही. डॉक्टर : Reliance Ind.

४) श्री. आर. आर. कुलकर्णी : Deepak Fertilisers & Petrochem Pvt. Ltd.

५) श्री. एच्. एस्. जगदाळे : Eureka Chemical

६) श्री. डी. व्ही. सौख्या : Dalal Consal

७) श्री. एम्. एस्. सावंत : D. M. C. Co. Ltd.

विशेष म्हणजे या परिषदेच्या मार्गदर्शनासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाचे सचिव श्री. डी.एम्. भाकोणे व सहाय्यक सचिव श्री. बी. डी. काळे उपस्थित होते. याशिवाय TTTI मधील निरिक्षक श्री. खंबायते व श्री. अगरवाल हेही उपस्थित होते.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेतून अभ्यासक्रमातून अनावश्यक असे काही विषय गाळून त्याऐवजी रासायनिक कारखान्यांत काम करणाऱ्या पदविधारक विद्यार्थ्याला/कामगाराला आवश्यक असणारे विषय समाविष्ट करण्यासाठी सांगोपांग विचार करण्यात आला आहे.

अशा अजून २ ते ४ परिषदा आयोजित करून त्यात केमिकल इंजिनिअरींगसाठी पुनर्रचित अभ्यासक्रम ठरवून त्याची अंमलबजावणी पुढील वर्षापासून करण्याची उमेद महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाने बाळगली आहे.

* * *

With Best Complimetns from

**Co-Op. Bank employees Union**

**Unit - Vaishya Sahakari Bank Ltd.**

Girgaon,
Mumbai 400 004.